नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १४४ * ✻ अकोला ✻ गुरुवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कोठडीतील मृत्यू अस्वीकार्य : सुप्रीम कोर्ट

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :** सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, पोलिस कोठडीत होणारे मृत्यू हे व्यवस्थेवर डाग आहेत आणि आता देश ते सहन करणार नाही. त्याचबरोबर न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्राकडून पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्हीबाबत अहवाल सादर न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने सांगितले की, जर १६ डिसेंबरपर्यंत अहवाल आला नाही, तर संबंधित राज्यांचे मुख्य सचिव आणि केंद्रीय संस्थांच्या संचालकांना न्यायालयात स्वतः हजर राहावे लागेल आणि विलंबाचे कारण सांगावे लागेल. राजस्थानमधील कोठडीतील मृत्यूवर सुनावणीवर कोर्टाने हे भाष्य केले.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# मुंबई की बॉम्बे

महाराष्ट्राची राजधानी मुंबई आहे. इंग्रजांनी भारतावर राज्य केले त्यांनी भारतातील अनेक शहरांची नावे त्यांच्या सोयीनुसार बदलली. मुंबईला इंग्रजांच्या नाव बदलाचा तसा काही उपद्रव तेव्हा तरी नव्हता. पण महाराष्ट्राचा स्वाभिमान मुंबई नावासह जोडलेला आहे. भारताची आर्थिक राजधानी मुंबई आहे असे म्हणतात. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये नेहरूंनी यशवंतराव चव्हाण यांना तेव्हा विचारले होते की, आपण संयुक्त महाराष्ट्र दिला नाही तर काय होईल. तेव्हा यशवंतराव चव्हाण यांनी अगदी बाणेदारपणे उत्तर दिले होते. 'संयुक्त महाराष्ट्र दिला नाही तर महाराष्ट्रात काँग्रेस अजिबात निवडून येणार नाही आणि हा निर्णय महाराष्ट्र म्हणजे केवळ महाराष्ट्र नाही तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, कारण ही महाराष्ट्राच्या अस्मितेची बाब आहे.' त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली. या मुंबईला इंग्रजांनी ठेवलेले बॉम्बे हे नाव मराठी माणसांना अजिबात पटत नव्हते. त्यानंतर जनमानसाचा विचार करून केंद्र सरकारने बॉम्बे ऐवजी मुंबई हेच नाव कोणत्याही भाषेसाठी वापरावे असा निकाल दिला. त्यानंतर हिंदीतील बंबई आणि इंग्रजी मधील बॉम्बे ही सगळी नावे बाजूला पडली आणि बहुतांश नावे बॉम्बे ऐवजी मुंबई करण्यात आली. पण त्यातही हायकोर्ट किंवा आयआयटी यासह इतर केंद्रीय संस्थांच्या नावात असलेल्या बॉम्बे हे नाव अजून पर्यंत कायम आहे. याबद्दल केंद्रीयमंत्री जितेंद्र सिंह यांनी आय आय टी मधील आपल्या भाषणामध्ये या ठिकाणी आयआयटीने मुंबई ऐवजी बॉम्बे ठेवले तेच बॉम्बे हे नाव आवडले असे म्हटले आहे. आता प्रश्न असा आहे की हे केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री ज्या राज्याचे आहेत त्या राज्यांमधील एखाद्या गावाचे इंग्रजाळलेले नाव बदलले तर त्यांना आनंद होईल की दुःख होईल? त्याचप्रमाणे १०८ हुतात्म्यांचा प्राण अर्पण करून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य बनलेले आहे आणि त्यामध्ये मुंबई हा शब्द महाराष्ट्रातील जनतेला आपला मराठमोळा शब्द वाटतो. त्या शब्दाशी संपूर्ण महाराष्ट्राचे जिव्हाळ्याचे नाते आपोआपच जोडले जाते असे असेल तर महाराष्ट्राच्या जनतेला काय वाटते हे महत्त्वाचे आहे की, जितेंद्र सिंह यांना महत्त्वाचे काय वाटते याचा विचार या जितेंद्रसिंह नावाच्या केंद्रीय मंत्र्यांनी केला पाहिजे. एखादी व्यक्ती केंद्रीय मंत्री आहे म्हणून त्यांच्या हो ला... हो करावा, असे अजिबात शक्य होत नाही आणि त्यामुळे. जितेंद्र सिंह यांना आमची विनंती आहे की कृपा करून तुमच्या आवडी-निवडी या फक्त तुमच्या राज्यापुरत्या मर्यादित ठेवा. नाहीतर उरलीसुरली बॉम्बेची नावे लंबी होतील कारण, तसे करण्यासाठी महाराष्ट्र तुफान वेगाने समर्थ आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या सौजन्याने बॉम्बे हे मुंबईत सध्या कुठेतरी ओएसिस म्हणून कायम राहिलेले आहे, याचे विनाकारण भांडवल करू नका. मंत्री झालेला प्रत्येकजण हुशार आणि विद्वान असतो सर्वगुण संपन्न असतो. हे आता त्यांच्या पक्षातील जवळजवळ सर्वांनाच मान्य झालेले समीकरण आहे. जितेंद्र सिंह साहेब कृपा करून विनाकारण अशा प्रश्नांमध्ये वाद-विवाद करून आपला वेळ वाया दवडू नका. तुम्हाला जे चांगले वाटते त्याचा मनातल्या मनात चांगला जप करा पण महाराष्ट्राला विनाकारण नवीन आंदोलने करण्याच्या फंदात पाडू नका. आधीच महाराष्ट्राचे बरेच नुकसान झालेले आहे. त्याची चर्चा पुन्हा कधीतरी करू, तूर्तास एवढेच !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## २०३० च्या राष्ट्रकुल खेळांचे

# यजमानपद भारताला

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. २६ :** भारताला २०३० च्या कॉमनवेल्थ गेम्सचे यजमानपद मिळाले आहे. बुधवारी स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे कॉमनवेल्थ स्पोर्ट्स एक्झिक्युटिव्ह बोर्डाच्या बैठकीनंतर अहमदाबादला यजमान शहर म्हणून घोषित करण्यात आले.



भारत १५ वर्षांनंतर कॉमनवेल्थ गेम्सचे यजमानपद भूषवत आहे. यापूर्वी २०१० मध्ये नवी दिल्लीत या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भारतीय खेळाडूंनी ३८ सुवर्ण पदकांसह एकूण १०१ पदके जिंकली होती.

ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा कार्यकारी मंडळाच्या बैठकीनंतर अहमदाबादला अधिकृतपणे यजमान शहर म्हणून घोषित करण्यात आले.

हे पहिल्यांदाच घडेल जेव्हा कोणताही मोठा आंतरराष्ट्रीय मल्टी-स्पोर्ट्स इव्हेंट दिल्लीबाहेर आयोजित केला जाईल. यापूर्वी भारताने २०१० च्या कॉमनवेल्थ गेम्स, १९५१ आणि १९८२ च्या एशियन गेम्सचे यजमानपदही भूषवले आहे. हे तिन्ही मोठे मल्टी-स्पोर्ट्स इव्हेंट दिल्लीत झाले होते. २०१० मध्ये भारतात नवी दिल्ली येथे कॉमनवेल्थ गेम्स आयोजित करण्यात आले होते. ज्यावर सुमारे ७० हजार कोटी रुपये खर्च झाले होते.

कॉमनवेल्थ संघाने दोनदा गुजरातचा दौरा केला आहे, जिथे त्यांनी अहमदाबादच्या पायाभूत सुविधा आणि तयारीची पाहणी केली. ७ जून २०२५ रोजी भारतीय शिष्टमंडळाने लंडन ३ सादरीकरणानंतर सरकारशी चर्चा केली. यानंतर केंद्र सरकारने २०३० च्या कॉमनवेल्थ गेम्ससाठी बोली लावण्यास मंजुरी दिली.

२९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हर्ष संघवी, पीटी उषा आणि इतर अधिकाऱ्यांनी लंडनमध्ये अधिकृत बोली सादर केली. बोलीमध्ये अहमदाबादला एक आधुनिक, कॉम्पॅक्ट आणि उच्च-मानक क्रीडा शहर म्हणून सादर केले आहे. अखेर ही मान्यता मिळाली.

# तीन अपघातात १३ ठार





■ **वृत्तसंस्था**
**चांपा/लखीमपूर/कलबुर्गी, दि. २६ :** छत्तीसगड, उत्तरप्रदेश आणि कर्नाटक राज्याच्या विविध भागात झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला. एका अपघातात एक आयएएस अधिकारीही ठार झालेत.

छत्तीसगडमध्ये जांजगीर-चांपा जिल्ह्यातील सुकली गावात ट्रक आणि स्कॉर्पिओ यांच्यात समोरासमोर झालेल्या धडकेत पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर तीन जण गंभीर जखमी झाले. मृतकांमध्ये राजेंद्र कश्यप (२७) आणि पोमेश्वर जलतारे (३३) हे भारतीय लष्कराचे जवान होते.

या अपघातात जीव गमावणारे सर्व मृत नवागड येथील सडक पारा आणि शांती नगरचे रहिवासी होते. हे सर्वजण वरात घेऊन नवागडला परत येत होते, तेव्हा सुकलीजवळ हा अपघात झाला. माहिती मिळताच जांजगीर पोलीस घटनास्थळी पोहोचले. अपघातात जखमी झालेले सत्य नारायण साहू (३५), संतोष साहू (३०), दीपक केवट (२५) यांच्यावर बिलासपूरच्या सिम्स रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघातात जीव गमावलेले सर्व पाच लोक एकाच भागातील रहिवासी होते. ते त्यांचे मित्र जयराम देवांगन यांच्या लग्नात पंतोरा येथील वरातीत सहभागी झाले होते.

### कार कालव्यात कोसळली

लखीमपूर खेरी येथे विवाह सोहळ्याहून परतणारी ऑल्टो कार ३० फूट खाली शारदा कालव्यात कोसळली. या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला. कारचे दार लॉक झाले होते, असे सांगितले जात आहे. कार कोसळल्याचा आवाज ऐकून आजूबाजूचे लोक धावत घटनास्थळी पोहोचले. मृतांमध्ये जितेंद्र (२३), घनश्याम (२५), लालजी (४५) आणि सुरेश (५०) यांच्यासह एका अनोळखी तरूणाचा समावेश आहे. हे बहराइच येथील गंगा बॅरेजचे कर्मचारी होते.

कर्नाटकातील कलबुर्गी जिल्ह्यात झालेल्या अपघातात वरिष्ठ आयएएस अधिकारी महंतेश बिलागी यांच्यासह तीन जणांचा मृत्यू झाला. महंतेश बिलागी हे कर्नाटक राज्य खनिज महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक होते. ते एका कौटुंबिक लग्नात सहभागी होण्यासाठी रामदुर्गहून कलबुर्गी येथे जात असताना त्यांच्या कारला अपघात झाला.

त्यांच्या कारसमोर एक कुत्रा आल्याचे वृत्त आहे. कुत्र्याला वाचवण्याचा प्रयत्न करताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि ती उलटली. या अपघातात महंतेश बिलागी, त्यांचा भाऊ शंकर बिलागी आणि इराना शिरसांगी यांचा मृत्यू झाला.

# ६९ नक्षल्यांचे आत्मसमर्पण

■ **वृत्तसंस्था**
**नारायणपूर/बीजापूर, दि. २६ :** छत्तीसगड मधील नक्षलवादविरोधी मोहिमेला आणखी मोठे यश मिळाले असून नारायणपूर जिल्ह्यात ८९ लाख रुपयांच्या एकूण इनामी रकमेसह २८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यात १९ महिला आणि ९ पुरुषांचा समावेश आहे.

अलीकडील दोन दिवसांत सुकमा आणि नारायणपूर मिळून ४३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याने बस्तरमधील दहशतवादाची पकड अधिकच ढिली होत असल्याचे चित्र दिसत आहे.

आत्मसमर्पणासाठी आलेल्या २८ जणांमध्ये मॅड डिव्हिजनमधील डीव्हीसीएम सदस्य, पीएलजीए कंपनी क्रमांक ६ मधील लष्करी कार्यकर्ते, तांत्रिक व पुरवठा पथकातील सदस्य, लष्करी प्लाटून, जनता सरकारशी संबंधित सदस्य अशा अनेक पातळ्यांवरील कार्यकर्त्यांचा समावेश होता. यांपैकी तीन नक्षलवादी एसएलआर, आयएनएसएएस आणि ३०३ रायफल्ससह पोलिसांसमोर उपस्थित झाले.

### एन्काउंटरच्या भीतीने ४१ नक्षलवाद्यांची शरणागती

बिजापूरमध्ये एकाच दिवशी तब्बल ४१ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली असून त्यातील ३२ जणांवर मिळून १ कोटी १९ लाख रुपयांचे मोठे बक्षीस जाहीर होते. बिजापूर येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केलेल्या या गटात १२ महिला नक्षलवाद्यांचाही समावेश होता.

जिल्हा पोलीस अधीक्षक जितेंद्र कुमार यादव यांनी सांगितले की सरकारच्या पुना मार्गेम म्हणजेच पुनर्वसन व समाजात पुनर्समावेशकता वाढविणाऱ्या उपक्रमाचा प्रभाव या प्रक्रियेत ठळकपणे जाणवतो. नक्षलवाद सोडून नव्या जीवनाची संधी देणारे हे धोरण आतापर्यंत अनेकांना हिंसाचाराचा मार्ग टाकून द्यायला प्रवृत्त करत आहे.

अलीकडील पोलिस कारवायांमध्ये अनेक महत्वाचे माओवादी कमांडर ठार झाले किंवा अटक झाले असून उर्वरितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिलासपूर पोलिसांनी सर्व उर्वरित नक्षलवाद्यांना हिंसक विचारसरणीचा त्याग करत सुरक्षित भविष्याच्या दिशेने पाऊल टाकण्याचे आवाहन केले आहे.

## ९ नवीन भाषांमध्ये संविधान प्रकाशित



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :** संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये बुधवारी १५० वा संविधान दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संविधान ९ नवीन भाषांमध्ये, म्हणजे मल्याळम, मराठी, नेपाळी, पंजाबी, बोडो, काश्मिरी, तेलुगु, ओडिया आणि आसामीमध्ये जारी केले. राष्ट्रपती म्हणाल्या, संसदेने महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने एक मोठे आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे.




# मी चुकलो, त्यामुळे माफी मागतो, अजित पवारांची खुली दिलगिरी

■ **महासागर प्रतिनिधी, अकोट, दि. २६ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज अकोला जिल्ह्यातील अकोटमध्ये घेतलेल्या सभेत मोठे विधान केले. अंबाजोगाई येथील सभेत जीभ घसरल्याने झालेल्या वादावर त्यांनी अखेर सार्वजनिक प्रतिक्रिया देत माफी मागितली.

सभेत बोलताना एखादा शब्द चुकीचा निघू शकतो, पण त्या शब्दाने लोकांची भावना दुखावली असेल तर त्याबद्दल क्षमा मागणे माझे कर्तव्य आहे, असे म्हणत अजित पवारांनी वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला.



अजित पवारांनी स्पष्ट केले की, अंबाजोगाई येथे मी जे बोललो ते शहरातील अस्वच्छतेविरोधात होते. मात्र, वापरलेला शब्द योग्य नव्हता, माध्यमांनी त्या शब्दाचा मुद्दा मोठा केला, पण ती चूक माझीच होती, अशी कबुलीही त्यांनी दिली.

## द. आफ्रिकेकडून भारताला क्लीन स्वीप

# कागदी शेर ढेर

■ **वृत्तसंस्था, गुवाहाटी, दि. २६ :** गुवाहाटी कसोटीत दक्षिण आफ्रिकेने भारताचा ४०८ धावांनी पराभव केला. कोलकाता कसोटीत संघाने भारताचा ३० धावांनी पराभव केला होता. दक्षिण आफ्रिकेने २५ वर्षांनी भारताला त्यांच्या घरच्या मैदानावर क्लीन स्वीप केले आहे.

२००० च्या सुरुवातीला त्यांनी दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताचा २-० असा पराभव केला होता. पहिल्या सामन्यात जसप्रीत बुमराहने दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाला बुटके म्हटले होते.

बुधवारी बारसापारा स्टेडियमवर ५४९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ १४० धावांवर बाद झाला. दुसऱ्या डावात भारताकडून रवींद्र जडेजाने सर्वाधिक ५४ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरने सर्वाधिक ६ बळी घेतले.

मंगळवारी, चौथ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेने आपला दुसरा डाव २६०/५ वर घोषित केला. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून पहिल्या डावात ४८९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारताचा पहिला डाव २०१ धावांवर संपला आणि भारतासमोर कसोटी जिंकण्यासाठी ५४९ धावांचे लक्ष्य ठेवले होते.



दक्षिण आफ्रिकेने दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताचा २-० असा धुव्वा उडवला आहे. गुवाहाटी कसोटीच्या पाचव्या दिवशी ५४९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाने आपल्या दुसऱ्या डावात १४० धावांत सर्व गडी गमावले.

दक्षिण आफ्रिकेने हा सामना ४०८ धावांनी जिंकला. भारताला आपल्या ९३ वर्षांच्या कसोटी इतिहासात पहिल्यांदाच ४०० पेक्षा जास्त धावांच्या फरकाने पराभव पत्करावा लागला आहे.

गेल्या एका वर्षात भारतीय संघाचा घरच्या मैदानावर ७ कसोटी सामन्यांमधील हा पाचवा पराभव आहे. या काळात भारताला दोनदा घरच्या मैदानावर क्लीन स्वीप व्हावे लागले आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये न्यूझीलंडने भारताला तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत ३-० असे हरवले होते. आता दक्षिण आफ्रिकेने क्लीन स्वीप दिला.

## दिल्ली स्फोट प्रकरणात

# सातवी अटक

बॉम्बर उमरच्या साथीदाराला पकडले

■ **वृत्तसंस्था, फरिदाबाद, दि. २६ :** दिल्ली स्फोट प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणेने आत्मघाती हल्लेखोर दहशतवादी डॉ. उमर नबीचा साथीदार शोएब याला अटक केली आहे. शोएब फरिदाबादमधील धौज गावाचा रहिवासी आहे. तो अल-फलाह विद्यापीठात वॉर्ड बॉय होता. दहशतवादी उमरला सामान आणण्यात -घेऊन जाण्यात त्याने मदत केली, असा त्याच्यावर आरोप आहे.

शोएबनेच नूंहमध्ये उमरला त्याची मेहुणी अफसाना हिच्या घरी खोली भाड्याने मिळवून दिली होती. १० नोव्हेंबर रोजी दिल्ली स्फोटापूर्वी १० दिवस उमर याच घरात राहिला होता. स्फोटाच्या दिवशी तो नूंह येथूनच दिल्लीसाठी निघाला होता. दिल्ली स्फोट प्रकरणात ही सातवी अटक आहे.

दुसरीकडे, दहशतवादी मॉड्यूलमध्ये सामील असलेल्या डॉ. मुजम्मिल शकीलच्या माहितीनंतर आता तपास यंत्रणा ठकअ डॉ. आदिल अहमद आणि डॉ. शाहीन सईद यांना अल-फलाह विद्यापीठात आणणार आहे. आतापर्यंतच्या तपासात समोर आले आहे की डॉ. आदिल आणि डॉ. उमर नबी यांच्यात अनेक वर्षांपासून मैत्री होती.

# मुंबई नको बॉम्बेच हवे!

## केंद्रीय मंत्र्यांच्या वक्तव्याने राजकारण तापले : शहर ताब्यात घेण्याचा प्रयत्न : राज ठाकरे यांचा आरोप



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मुंबईच्या ओळखीचा मुद्दा पेटला आहे. आयआयटी मुंबईच्या कार्यक्रमात केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी केलेल्या विधानामुळे वाद निर्माण झाला आहे.

त्यांनी आयआयटीच्या नावात बॉम्बे हे नाव तसेच राहिले, त्याचे मुंबई झाले नाही हे चांगले झाले, असा उल्लेख केला. या एका वाक्याने मराठी जनतेमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे. मुंबईचे नाव मराठी इतिहास, मराठी संस्कृती आणि या भूमीच्या मूळ देवी मुंबाशी जोडलेले आहे. त्यामुळे मुंबईऐवजी बॉम्बेचा आग्रह व्यक्त करणे ही महाराष्ट्राच्या अभिमानावर घाला असल्याची भावना राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

या वादाला उत्तर देत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी थेट प्रहार केला आहे. त्यांनी सोशल मीडियावरून भाजप नेतृत्वावर आणि केंद्रीय मंत्र्यांवर जोरदार टीका केली. राज ठाकरे म्हणाले की, जितेंद्र सिंह यांचं विधान हे केंद्र सरकारच्या मानसिकतेचं दर्शन घडवतं. मुंबई जी मराठी माणसाची आहे, तिला महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा डाव आजही शिजतोय.

त्यांनी इशारा दिला की काही शक्ती मुंबई व आजूबाजूचा एमएमआर परिसर गुजरातमध्ये जोडण्याचे प्रयत्न करत आहेत. केंद्र सरकारने अलीकडेच चंदीगडचा मुद्दा उचलून धरण्याची आठवण देत राज ठाकरे यांनी मराठी लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले.

राज ठाकरे यांनी जितेंद्र सिंह यांच्या मूळ प्रदेशाचा उल्लेख करत म्हणाले, त्यांचा मुंबईशी, महाराष्ट्राशी काहीही संबंध नाही. तरीही ते येऊन मुंबईच्या नावावर भाष्य करतात. फक्त दिल्लीतील नेतृत्वाची मर्जी ठेवण्यासाठी ही वक्तव्ये केली जातात. त्यांनी केंद्रावर आरोप केला की मुंबई नेहमीच डोळ्यात खुपते, कारण ही महाराष्ट्राची आर्थिक राजधानी असून इथे मराठी ओळख दृढ आहे. सुरुवातीपासूनच काही जण मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा प्रयत्न करत आले आहेत. परंतु महाराष्ट्रातील जनतेने तो प्रत्येकवेळी हाणून पाडला आहे. मुंबई ही मराठी माणसाचीच आहे, आणि राहणार, हे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

आयआयटीप्रमाणेच अनेक राष्ट्रीय संस्थांच्या नावात बॉम्बे, मद्रास अशी जुनी नावे कायम आहेत. मात्र, मुंबईच्या नावाचा संदर्भ आल्यानंतर नेहमीच राजकीय वादंग निर्माण होतो. मराठी ओळख, भाषा आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी हा संघर्ष कायम आहे. त्यामुळे या विधानाने महाराष्ट्रातील मराठी जनतेला जणू पुन्हा एकदा सज्जतेचा इशारा मिळाला आहे. मुंबई आपलीच आहे आणि राहील, हे संदेश अनेकांनी दिला आहे.

## 'स्थास्वसं' निवडणुकीत आरक्षणाची मर्यादा ओलांडता येणार नाही



■ **मुंबईः** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अनेक ठिकाणी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक होतेय .राज्यात होवू घातलेल्या निवडणुका त्यामुळे लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.अशात आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत बसवावी लागेल. हे करीत असतांना प्रत्येक वंचित वर्गाला राजकीय आरक्षणाच्या चौकटीत योग्य प्रतिनिधित्व मिळेल; याची काळजी राज्य सरकारला घ्यावी लागेल, असे प्रतिपादन इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी केले.

राज्यातील जवळपास ५७ नगर पालिका आणि नगर परिषदेत आरक्षण मर्यादा ओलांडली जातेय. ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण देता येणार नाही. न्यायालयाने हे स्पष्ट केले असल्याने, आरक्षणाच्या या कळीच्या मुद्द्यावर घटनापीठ स्थापन करून सर्वोच्च न्यायालय सुनावणी घेण्याची शक्यता पाटील यांनी वर्तवली. संसदेपासून महापालिकेपर्यंत कुठेही ५० टक्क्यांवरील आरक्षण देता येत नाही. सरकारने स्थापन केलेल्या बाठिंया आयोगाचा अहवाल अजूनही न्यायप्रविष्ठ आहे. आयोगाच्या अहवालापूर्वी प्रचलित असलेल्या स्थितीनूसार 'स्थास्वसं' निवडणुका घेतल्या जावू शकतात, असे मत न्यायालयाने नोंदवले होते. परंतु, ठाणे, नंदूरबार, गडचिरोली, नागपूर सह अनेक ठिकाणी आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असल्याने निवडणुकांचे भविष्य अधांतरी असल्याचे पाटील म्हणाले. मर्यादा ओलाडंलेल्या ठिकाणी ओबीसी, एससी आणि एसटींचे प्रमाण किती ? याची माहिती राज्य सरकारला न्यायालयात सादर करायची आहे. या मुद्द्यावर लवकरात लवकर तोडगा निघावा, यासाठी सरकारने योग्य आणि अभ्यासपूर्ण बाजू मांडावी आणि वेळकाढूपणा न करतात तात्काळ निवडणुका लागतील या अनुषंगाने युक्तिवाद करावा, असे आवाहन पाटील यांनी केले.

## टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना अहमदाबादलाच का?



■ **मुंबईः** आगामी टी-20 विश्वचषक 2026 च्या वेळापत्रकाची घोषणा झाली असून, या स्पर्धेतील अंतिम सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार असल्याची अधिकृत माहिती जाहीर झाली आहे. याबाबत आदित्य ठाकरे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रत्येक मोठा सामना अहमदाबादलाच का? मुंबई, कोलकाता, चेन्नई, मोहाली अशी ऐतिहासिक, पारंपारिक आणि क्रिकेटसाठी ओळखली जाणारी मैदानं असताना अहमदाबादलाच विशेष महत्त्व का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. क्रिकेटचा इतिहास आणि विक्रमांना साक्षी असलेल्या वानखेडे स्टेडियमला अंतिम सामना देण्यास काय हरकत आहे? असा सवाल त्यांनी केला.

मुंबईत एक उपांत्य सामना मिळाला असला, तरीही तो अंतिम सामन्यासारखा गौरवशाली नसतो. दुसरा उपांत्य सामना कोलकाता किंवा श्रीलंकेतील कोलंबो इथे होणार आहे. त्यामुळे भारतातील क्रिकेटमधील राजधानी मानल्या जाणाऱ्या मुंबईलाच कमी महत्त्व दिल्याची भावना महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. शिवाय, अनेक तज्ज्ञांचे मत आहे की मोठे सामने अशा ठिकाणीच खेळवावेत, जिथे क्रिकेटला परंपरा आहे आणि प्रेक्षकांची उत्स्फूर्त उपस्थिती असते.

आदित्य ठाकरे यांनी पुढे अपेक्षा व्यक्त केली की, आयसीसीने राजकारणापासून दूर राहावे. क्रिकेट हा खेळ आहे आणि तो सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर चालू नये. देशातील सर्व राज्यांना समान संधी मिळाली पाहिजे. विशेषतः ज्या मैदानांनी क्रिकेटला जागतिक मान्यता मिळवून देण्यात भूमिका बजावली आहे, त्यांच्यावर अन्याय होता कामा नये.

त्यांच्या या वक्तव्याने पुन्हा एकदा क्रिकेट आणि राजकारणाचा संबंध चर्चेत आला आहे. आता आयसीसी या टीकेवर काय प्रतिक्रिया देणार आणि अंतिम आयोजनाबाबत काही बदल केला जाणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मच्छिमारांसाठी हवामान विभागाचा इशारा

■ **मुंबईः** हवामान विभागाने मुंबई शहर जिल्ह्यातील मच्छिमारांना पुढील पाच दिवसांसाठी महत्त्वपूर्ण सूचना जारी केल्या आहेत. केरळ किनारपट्टी, लक्षद्वीप, मालदीव लगतचा समुद्रप्रदेश, कोमोरिन परिसर आणि मन्नारचा आखात येथे ३५ ते ४५ किमी प्रतितास ते ५५ किमी प्रतितास वेगाचे वारे वाहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. काही ठिकाणी वाऱ्याचा वेग ६५ किमी प्रतितासपर्यंत पोहोचू शकतो.

२७ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत या समुद्रक्षेत्रात परिस्थिती प्रतिकूल राहण्याचा अंदाज असल्याने मच्छिमारांनी या भागात मासेमारीसाठी जाऊ नये, असा सल्ला हवामान विभागाने दिला आहे. सतत बदलत्या हवामान परिस्थितीची दखल घेत मच्छिमारांनी सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अजित पवारांचा राजीनामा घ्या, अन्यथा दिल्ली गाठणार!

### अंजली दमानियांचा अल्टिमेटम



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :** पुण्यातील वादग्रस्त जमिनीच्या व्यवहारावरून राज्याच्या राजकारणात मोठा गदारोळ निर्माण झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पूत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन या व्यवहारातील तथाकथित गैरव्यवहार उघड केला. दमानिया यांनी सांगितलेल्या तपशीलानुसार, पुण्यातील ४० एकर सरकारी जमिनीसंदर्भात अमेडिया कंपनीने डेटा सेंटर सुरू करणार असल्याचे खोटे दाखवून फक्त ५०० रुपयांत स्टॅम्प ड्युटी माफी मिळवली, असा आरोप करीत त्यांनी अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. अंजली दमानिया यांनी ठामपणे सांगितले की, अमेडिया कंपनीकडून सबमिट केलेल्या लीज डीड आणि कागदपत्रांमध्ये डेटा मायनिंग, आयटी सेवा व सायबर सुरक्षा प्रकल्प उभारण्याचा उल्लेख आहे. यामध्ये ९८ लाखांची गुंतवणूक असल्याचेही नमूद करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात हा व्यवहार जमीन विकत घेण्यासाठीचा असल्याचा संशय आहे. बाजारमूल्य शेकडो कोटी असलेल्या जमिनीवर फक्त 500 रुपयांत व्यवहार करण्याचे कट कारस्थान असल्याचा आरोप त्यांनी केला. एवढे मोठे प्रकरण जिल्हाधिका?यांनी पुण्याचे पालकमंत्री असलेल्या अजित पवारांना न सांगता झाले, हे कसे? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

या मुद्द्यावरून अंजली दमानिया यांनी राज्य सरकारला चव्हाट्यावर आणले आहे. त्यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात तातडीने कारवाई करावी आणि अजित पवारांचा उपमुख्यमंत्री व पालकमंत्री पदाचा राजीनामा त्वरित घ्यावा. राजीनामा घेतला नाही तर मी सर्व पुरावे घेऊन अमित शहा यांची भेट घेईन, असा थेट इशारा दमानिया यांनी दिला. तसेच या प्रकरणात नेमलेल्या एसआयटीवरही अविश्वास व्यक्त करून, त्या समितीला बरखास्त करण्याची मागणी त्यांनी पुढे केली. तपास पथकात जिल्ह्याचे अधिकारी मोठ्या प्रमाणात असणे हा तपासावर परिणाम करू शकतो, असे त्या म्हणाल्या.

## शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारीला

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा ८ फेब्रुवारी ऐवजी २२ फेब्रुवारी रोजी राज्यभर एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) तर्फे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) देखील ८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. राज्यातील अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सीटीईटी परीक्षेला बसणार असल्याने त्यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार हा बदल करण्यात आला आहे.

## मुंबई मेट्रोची सवलत की दिव्यांगांची चेष्टा?

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :** मुंबई मेट्रोमध्ये दिव्यांग प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलतीचा गाजावाजा झाला, पण प्रत्यक्षात या सवलतीतच मोठा भेदभाव लपल्याचा आरोप केला जात आहे. दिव्यांग प्रवाशांना सध्या केवळ मासिक पासावरच सूट दिली जात असून एकल प्रवास करणाऱ्यांना कोणताही लाभ मिळत नाही. त्यामुळे इस्पितळात उपचारासाठी कधीतरी जाणाऱ्या किंवा अधूनमधून मेट्रो वापरणाऱ्या दिव्यांगांना या योजनेचा काहीही उपयोग होत नाही.

याचबरोबर, सवलत मिळवण्यासाठी स्मार्टफोन असणे बंधनकारक करण्यात आले आहे. फोन नसेल तर सवलतीचा प्रश्नच नाही. त्यातही केवळ मोबाइल असला तरी उपयोग नाही–त्यात खास ॲप डाउनलोड करणे आवश्यक आहे. म्हणजेच स्मार्टफोन नाही = सवलत नाही असा प्रत्यक्ष नियम लागू होताना दिसतो.

तसेच मेट्रोचे फिजिकल कार्ड अजूनही सुरू झाले नसल्याने तंत्रज्ञान न वापरणाऱ्या किंवा वापरता न येणाऱ्या मोठ्या दिव्यांग प्रवासी वर्गाला व्यवस्थेने थेट दाराबाहेर ठेवले आहे, अशी टीका होत आहे.

या सर्व नियमांमुळे सवलत नावाखाली दिव्यांगांना अधिकच अडचणीत ढकलले जात असल्याचा आरोप वरिष्ठ पत्रकार आणि दिव्यांगांच्या न्याय हक्कांसाठी लढा देणारे दीपक कैतके यांनी केला आहे.

कैतके म्हणतात, दिव्यांग प्रवाशांच्या सोयीसाठी सवलत जाहीर झाल्याचे सांगितले जाते, पण प्रत्यक्षात या अटी हीच सर्वात मोठी गैरसोय आहे. हे दिव्यांगांबरोबर केलेला सरळसोट अन्याय आणि चेष्टाच आहे.

## क्लोरीन सिलिंडर लीक एकाचा मृत्यू, १८ रूग्णालयात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :** पालघर जिल्ह्यातील वसई शहरात मंगळवारी दुपारी भीषण अपघात घडला आहे. दीवानमन परिसरातील पाणी टंचाई केंद्राजवळ ठेवलेला जुनाट क्लोरीन सिलिंडर अचानक लीक झाला आणि परिसरभर गॅसचा प्रसार झाला.

गॅसच्या वाढत्या प्रमाणामुळे वातावरणात श्वास घेणे अवघड झाले. अनेक नागरिकांना उलट्या होऊ लागल्या तर काहींना भोवळ येऊन ते जमिनीवर कोसळले. या घटनेने परिसरात चांगलीच धावपळ उडाली. या अपघातात देव कांतिलाल पारदीवाल नावाच्या ५९ वर्षीय नागरिकाचा मृत्यू झाल्याची पुष्टी प्रशासनाने केली आहे. याशिवाय 18 जण गॅसच्या विषारी परिणामामुळे बाधित झाले आहेत.

यात महिला, वृद्ध व्यक्ती आणि काही किशोरवयीन मुलांचाही समावेश आहे. श्वसनाचा त्रास जाणवू लागल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. यामध्ये पाच दमकल दलाचे जवानही आहेत. गॅसचे प्रमाण वाढत असल्याने दुर्घटनेच्या ठिकाणी हलकल्लोळ माजला आणि अनेक रहिवाशांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर केले.

घटनेची माहिती मिळताच माणिकपूर पोलिस स्थानकाचे अधिकारी तसेच वसई-विरार महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे पथक तेथे दाखल झाले. दमकल कर्मचा?यांनी घटनास्थळावर पोहोचताच क्लोरीनच्या गॅसपासून जनतेचा बचाव करण्यासाठी परिसर सील केला. काही जवानांनी लीक होत असलेल्या सिलेंडरवर सतत पाण्याचा मारा करत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला तरीही धुरामुळे आणि वायूंच्या परिणामामुळे त्यांनाही श्वास घेण्यास अडचण निर्माण झाली आणि काही जवान तिथेच बेशुद्ध पडले.

## संविधान दिनी राजभवन येथे राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :** भारतीय संविधान दिनानिमित्त राजभवन येथे राज्य घटनेच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राजभवनातील अधिकारी, कर्मचारी यांच्यासमवेत राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. यावेळी राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, राज्यपालांचे परिसहायक, अभयसिंह देशमुख तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## संभाजीनगरात मतदार याद्यांमध्ये गंभीर चुका



■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. २६ :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिध्द झालेल्या प्रारूप मतदार यादीवरून मोठा वाद निर्माण झाला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने या मतदार याद्यांमध्ये गंभीर चुका झाल्याचा आरोप करत मनपा आयुक्त व प्रशासक यांच्याकडे अधिकृत निवेदन सादर केले आहे. यावेळी विधान परिषदचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ मनपा मुख्यालयात दाखल झाले.

मतदार याद्यांतील चुकांमुळे हजारो नागरिकांचा मतदानाचा अधिकार धोक्यात आला असून प्रशासनाची ही मोठी बेपर्वाई असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर शिष्टमंडळाने आयुक्तांना पाच प्रमुख मागण्या केल्या आहेत. सर्व प्रभागांतील मतदार याद्यांची पुन्हा तपासणी करावी, चुकीच्या प्रभागात गेलेली नावे मूळ प्रभागात परत आणावीत, नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी मदत केंद्रे सुरू करावीत, या चुकांसाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी आणि सुधारित मतदार याद्या तत्काळ पुन्हा प्रसिध्द कराव्यात.

या मागण्या तातडीने पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देखील यात देण्यात आला आहे.

## शालेय विद्यार्थ्यांसाठी एसटीची हेल्पलाईन




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :** शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींना घरातून शाळेला जाताना अथवा शाळेतून घरी येताना एसटी प्रवासात काही अडचण आल्यास अथवा एसटी बसेस वेळेवर न आल्यास, अचानक रद्द करण्यात आल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी, यासाठी एसटी महामंडळाची 1800 221 251 या क्रमांकाची हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

राज्यभरातील लाखो विद्यार्थी - विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी व तेथून घरी येण्यासाठी एसटी महामंडळ बस फेऱ्या उपलब्ध करून देत असते. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना घरातून शाळेला जा - ये करण्यासाठी मासिक पासमध्ये ६६.६६ टक्के सवलत दिली जाते. तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत मासिक पास दिला जातो.

मंत्री सरनाईक यांनी धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली असता, तेथे उपस्थित असणाऱ्या शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींनी अनेक समस्या व तक्रारी त्यांच्यासमोर मांडल्या. अनेक शालेय बसेस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बसेस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार काही विद्यार्थ्यांनी केली. संध्याकाळच्या वेळी शाळा - महाविद्यालय सुटल्यानंतर किमान एक तासात मुले आपल्या घरी जाणे अपेक्षित असते. परंतु, बसेस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास उशीर होतो.

शालेय विद्यार्थी -विद्यार्थिनींना घरुन शाळेत जात असताना अथवा शाळेतून घरी येत असताना बसेस उशिरा सुटणे, त्या अचानक रद्द होणे, बस नादूरूस्त झाल्याने घरी पोहोचण्यास अडचण निर्माण झाल्यास त्यांनी तातडीने एसटीच्या हेल्पलाइन क्रमांक वर संपर्क करून मदत मिळावी, या हेतूने 1800 221 251 हा हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात आलेला आहे.

या क्रमांकावर विद्यार्थी - विद्यार्थिनींनी संपर्क साधावा, जेणेकरून त्यांना तातडीने मदत उपलब्ध करून देता येईल, त्याचबरोबर, संबंधित शाळा, महाविद्यालयांना ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे दुरध्वनी संपर्क क्रमांक देण्यात येत आहेत, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्राचार्य, मुख्याध्यापक, विद्यार्थ्यांना संपर्क साधता येईल.

## संविधानातील मूल्ये आचरणात आणावीत



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :** संविधान दिनानिमित्त क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी मंत्रालय परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी त्यांनी संविधानातील मूल्ये आचरणात आणावीत असे आवाहन नागरिकांना केले.

या वेळी क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. त्यांनी सांगितले की, संविधान हे देशाच्या सर्वसमावेशक विकासाचे दिशादर्शन करणारे मार्गदर्शक तत्व आहे. कार्यक्रमाला पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

## भायखळ्यात गवळी विरुद्ध गवळी!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :** भायखळा प्रभाग क्रमांक २०७ मध्ये आगामी बीएमसी निवडणुकीत गवळी विरुद्ध गवळी अशी धडकी भरवणारी लढत आकाराला येत आहे. माजी आमदार अरुण गवळी यांची कन्या योगिता गवळी आणि त्यांची वहिनी, माजी नगरसेविका वंदना गवळी यांनी एकाच प्रभागातून उमेदवारी जाहीर करताच टशन उसळले आहे.

तुरुंगातून सुटल्यानंतर अरुण गवळी सक्रिय राजकारणात सहभागी नसल्याचं स्पष्ट झालं असलं तरी, त्यांची अखिल भारतीय सेना मात्र मुलगी गीता गवळी यांच्या नेतृत्वाखाली महापालिका निवडणूक लढवणार आहे. दोन्ही बहिणी गल्लोगल्ली प्रचाराचं जोरदार वातावरण तयार करत आहेत, तर योगिता पहिल्यांदाच निवडणुकीच्या मैदानात उतरून प्रभागाला नवा चेहरा देण्याचा दावा करत आहे.

प्रभाग २०७ चे आरक्षण जाहीर झाल्यानंतर दोन्ही गटांनी उमेदवारीची घोषणा करण्यास विलंब केला नाही. भायखळ्याच्या विकासासाठी मी इच्छूक उमेदवार आहे, असे योगिताचे निवेदन येताच, वंदना गवळी यांनीही सोशल मीडियावरून थेट मीही रिंगणात असा संदेश देत मुकाबल्याला अधिक धार दिली.

दरम्यान, निवडणूक सुरू होण्याआधीच मतदारयादीतील गोंधळामुळे भाजपसह सर्व पक्षांनी नाराजी व्यक्त केली आहे. एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात, तर काही ठिकाणी ग्रामपंचायतीतील मतदारांचे नाव शहरात जोडल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. अनेक जण मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# वाहतुकीत शिस्त आणा; अंडरपास लवकर नागरिकांसाठी खुला करा:जिल्हाधिकारी वर्षा मीना

▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
शहरातील बसस्थानक परिसरातील अंडरपासबाबत असलेली समस्या त्वरित निकाली काढून अंडरपास नागरिकांसाठी लवकर खुला करावा. शहरातील वाहतुकीत शिस्त निर्माण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.त्या रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत बोलत होत्या.




अपर पोलीस अधिक्षक बी. सी. के रेड्डी, प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता अविनाश धोंडगे, कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, शहर वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक मनोज बहुरे, मनपा शहर अभियंता नीला वंजारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,जिल्हा परिषद प्रतिनिधी उपस्थित होते.

शिवणी विमानतळासमोरील रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करावे. चुकीच्या दिशेने उड्डाण पुलावरून प्रवास करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. वारंवार अपघात होणाऱ्या रस्त्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने अपघातप्रवण स्थळ असा फलक, रिफ्लेक्टर्स पुरेशी प्रकाशव्यवस्था आदी उपाययोजना करावी. सार्वजनिक रस्त्यांवर बेकायदेशीरपणे पार्किंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले.

ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान अकोला शहरातील मुख्य रस्त्यावर विनापरवानगी लावण्यात आलेले १४७ होर्डिंग्ज निष्कासित करण्यात आले असून ४८ हजार रुपये दंड मनपाच्या वतीने वसूल करण्यात आला.

प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने एप्रिल ते ऑक्टोबर दरम्यान नियमांचा भंग करणाऱ्या १४६ ऑटो रिक्षा,१५० खाजगी प्रवासी बसेस यांच्यावर कारवाई केली तर हेल्मेट न वापरणाऱ्या ५६९ वाहन धारकावर कारवाई केल्याची माहिती परिवहन विभागाने दिली.

## थकित करापोटी पुर्व झोन येथील मालमत्तावर सीलची कारवाई

अकोला महानगरपालिका
जनहित सर्वतोपरी

▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पुर्व झोन अंतर्गत तापडीया नगर, सावली अपार्टमेंट मधल्या वार्ड क्रं. अे -२ मालमत्ता क्रं. २९११, व्ही.एन.आर.जवाहरलाल दळवी भोगवटदार मोहन पांडे यांचेकडे २०१६-१७ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये १,२९,६७४/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या फ्लॅटला सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईत सहा.कर अधिक्षक राजेश सोनाग्रे, कर वसुली लिपिक दीपराज महल्ले, संतोष पांडे, राजेश साळुंके, गणेश पदमने, सोतोष वेले, विटोबा दाडू, दादाराव सदाशिव, सुरक्षा रक्षक संगीता शिंदे आदींची उपस्थिती होती.

# राज्यात पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा

## कुटुंब नियोजनात पुरुषांनी पुढाकार घेण्याचे आरोग्य विभागाचे आवाहन

▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पुरुष नसबंदी पंधरवडा साजरा केला जात असून, कुटुंब नियोजनात पुरुषांनी पुढाकार घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

आरोग्य विभागाकडून राज्यात २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा साजरा केला जात आहे. या उपक्रमाचा उद्देश पुरुष नसबंदीबाबत असलेले गैरसमज दूर करणे, कुटुंबनियोजनात पुरुषांचा सहभाग वाढवणे तसेच आरोग्यदायी आणि आनंदी कुटुंबाची जाणीव समाजात पोहचवणे हा आहे.अकोला जिल्ह्यात या मोहिमेचे नियोजन जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, उपसंचालक सुशीलकुमार वाकचौरे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले आहे. पुढील अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत पवार यांनी सांभाळली आहे.स्वस्थ व आनंदी कुटुंबाचे स्वप्न पुरुषांच्या सहभागातून साकार असे यंदा मोहिमेचे घोषवाक्य असून, मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत आहे. पुरुष नसबंदीबाबत जनजागृती वाढवण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम राबवले जात आहेत.आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, समाजसेवक यांच्या माध्यमातून घराघरात माहिती पोहचवली जात आहे. तसेच पोस्टर, बॅनर्स, हस्तपत्रिका, सोशल मीडिया या सर्व माध्यमांतून प्रचार करण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये,जिल्हा स्त्री रुग्णालय,जिल्हा रुग्णालय येथे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया मोफत करण्यात येते. शिवाय लाभार्थ्यांना १ हजार ४५० रु. आर्थिक प्रोत्साहन दिले जात आहे. पुरुष नसबंदी ही सुरक्षित, सोपी आणि प्रभावी पद्धत असून महिलांवरील कुटुंबनियोजनाचा भार कमी करण्याचा उत्तम मार्ग आहे. तरुणांनी पुढाकार घेऊन या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केले आहे.

### पुरुष नसबंदीचे प्रमुख फायदे

- **अत्यंत प्रभावी आणि सुरक्षित गर्भनिरोधक पद्धत आहे.**
- **शारीरिक संबंधांवर कोणताही परिणाम नाही - फक्त शुक्राणूंची बाहेर पडण्याची प्रक्रिया थांबते.**
- **कमी गुंतागुंत व कमी वेदना होतात. स्कॅल्पल मार्क्स किंवा टाक्यांची गरज नाही.संक्रमणाचा धोका जवळजवळ नसतो.**
- **अत्यंत कमी वेळात रिकव्हरी - काही दिवसात दैनंदिन कामे सुरू करता येतात कमी खर्चिक आणि सोपी प्रक्रिया**
- **एनव्हीएस ही कायमस्वरूपी गर्भनिरोधक पद्धत मानली असली, तरी काही वेळा व्हॅसेक्टोमी रिव्हर्सलद्वारे ती उलट करता येते. मात्र यशाची शक्यता विविध घटकांवर अवलंबून असल्याने ती कायम स्वरूपी पर्याय म्हणूनच पाहावी.**

# काळे झेंडे दाखवण्याआधीच रयत शेतकरी संघटनेचे खोडके अटकेत

## पण उपमुख्यमंत्री त्याच दहिहंडा-फाटा ते गोपालखेड 'मृत्यू मार्गावरून'..!



▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
जिल्ह्यातील दहिहंडा-फाटा-गोपालखेड हा खड्डेमय, जीवघेणा आणि 'मृत्यू मार्ग' म्हणून ओळखला जाणारा रस्ता आज राजकीय संतापाचा केंद्रबिंदू ठरला आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आजच्या जिल्हा दौऱ्यात रयत शेतकरी संघटनेकडून काळे झेंडे दाखवून निषेध केला जाणार असल्याची घोषणा संघटनेचे विदर्भ विभागीय युवा अध्यक्ष पूर्णाजी खोडके यांनी आधीच केली होती.

मात्र आंदोलन काळे झेंडे दाखवण्या अगोदरच सुरू होण्याआधीच सकाळी अंदाजे ९ ते १० वाजताच्या दरम्यान खोडके यांना दहिहंडा पोलिसांनी ताब्यात घेत अटक करून नजरकैदेत ठेवले. त्यामुळे परिसरात प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली आहे.

शेकडो जीव धोक्यात म्हणून आंदोलन अपरिहार्य स्थानिक नागरिकांनीही प्रतिक्रिया देताना सांगितले दररोज अपघात, जखमी आणि मृत्यूः तरी अधिकारी शांत! आता संघर्ष वाढणार.दहिहंडा-फाटा-गोपालखेड रस्त्याचे दर्जेदार नव्याने डांबरीकरण निष्क्रिय अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई तातडीची बैठक आणि अंतिम निर्णय होणार आहे.

### काम शून्यः आश्वासने मात्र ढिगाने! : खोडके

**ताब्यात घेण्यापूर्वी खोडके म्हणाले -**
**अनेक महिन्यांपासून निवेदनं, अल्टिमेटम, बैठकांमध्ये आश्वासनेः पण प्रत्यक्षात रस्ता एक इंचही पुढे नाही! प्रशासन झोपेत आहे की मुद्दाम जनतेला त्रास देतंय? म्हणून आम्ही काळे झेंडे दाखवणार होतोः पण आवाज दाबण्यासाठी अटक? हा लढा शांत बसणार नाही पुढचा टप्पा म्हणजे महामार्ग बंद आंदोलन!**

# 'अहं शून्य' अभंग ग्रंथाची लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डची नोंद

▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
प्रवीण हटकर यांनी रचलेल्या 'अहं शून्य' या अभंग ग्रंथाची लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याबद्दल त्यांचा पुण्यातील शिवाजीनगर येथील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात गौरव करण्यात आला.या कार्यक्रमास डॉ. अविनाश सकुंदे - इंडिया चेअरमन, लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लहुराज साबणे, सहायक संचालक, राज्य राखीव पोलीस बल, पद्मनाभ राणे महाराष्ट्र उपाध्यक्ष, मनसे चित्रपट कर्मचारी सेना, लायन राजेश अग्रवाल डिस्ट्रिक्ट गव्हर्नर, लायन्स क्लब यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. 'अहंकार' या विषयावर सलग अभंगरूपात रचलेले ३९० चरणांचे हे जगातील एकमेव पुस्तक असल्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे. 'अहं शून्य' हा अभंग संग्रह अहंकार या विषारी वृत्तीपासून मानवजातीला सावध करण्याचे आणि व्यक्ती सजग व समृद्ध व्हावी यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य करतो.

## थोडक्यात

### शनिवारी मास्टर्स ॲथलेटिक्स स्पर्धाची निवड चाचणी



**अकोला**-यंदाची मास्टर्स ॲथलेटिक्स असो.ची राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा - २०२५ वाशिम येथे दिनांक १९ ते २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेतून निवड झालेल्या स्पर्धकातून महाराष्ट्र राज्य संघाची निवड करण्यात येईल व हा संघ केरळ राज्याच्या तिरुवनंतपुरम येथे राष्ट्रीय आंतरराज्य स्पर्धेत सहभागी होईल. या अनुषंगाने अकोला जिल्हा संघाची निवड करण्यासाठी शनिवार दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी गोरक्षण संस्थान मागील मैदानावर सकाळी ८ ते १० या वेळेत निवड चाचणी घेण्यात येणार आहे.पस्तीस वर्षावरील ज्या स्त्री व पुरुषांना या चाचणीत सहभागी व्हायचे असेल त्यांनी आधार कार्डची छायांकीत प्रत घेऊन उपस्थित रहावे, असे आवाहन असो.चे सचिव अशोक ढेरे यांनी केले आहे.

### श्री स्वामी समर्थ केंद्रात अखंड नामजप यज्ञ सप्ताहाचे आयोजन

अकोट : स्थानिक यशोदा नगर येथे स्थित श्री स्वामी समर्थ सेवा आध्यात्मिक विकास व बाल संस्कार केंद्रात श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त २७ नोव्हेंबर ते ०५ डिसेंबर या कालावधीत अखंड नामजप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ नोव्हेंबर: ग्रामदेवता सन्मान, मंडप मांडणी व पूर्वतयारी, २८ नोव्हेंबर मंडळ स्थापना, स्थापित देवता हवन, अग्निस्थापना व नित्य स्वाहाकार, २९ नोव्हेंबर: श्री गणेशयाग व मनोबोध याग, ३० नोव्हेंबर: श्री स्वामी याग, ०१ डिसेंबर : श्री गीताई याग, ०२ डिसेंबर : श्री चंडीयाग, ०३ डिसेंबर : श्री रुद्रयाग व श्री मल्हारी याग, ०४ डिसेंबर: बलिपूर्णाहुती (दुपारी १२.३९ वाजता), श्री दत्त जन्मोत्सव, श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन आणि अखंड नामजप यज्ञ सप्ताहाची सांगता यासोबतच सप्ताहभर सामूहिक श्री गुरुचरित्र वाचन तसेच दररोजप्रश्नोत्तर कार्यक्रम करण्यात येणार आहे.

### ई झोन एसआयपी ॲबॅकस विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय स्पर्धेत यश

**अकोला** : चेन्नईत झालेल्या आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्पर्धेत स्थानिक ई झोन एसआयपी अबॅकसच्या ३२ पैकी तब्बल २९ विद्यार्थ्यांनी विजेतेपद मिळवत चमकदार कामगिरी केली. यामध्ये विजेते विद्यार्थी आदित्य गुप्ता, अमृता सुरे, हिरण्य तायडे, चिन्मय सावजी, गौरव आणि विराट तायडे, नमन पनपलिया, हृदय देवळे, आराध्या सरोदे, आदिनी अभिनंदन केले.

# हिवरखेड नगरपरिषदेत रूपांतरावर महायुतीत श्रेयवाद तापला पवारांचे 'ठेकेदार नगरसेवक नकोत' विधान चर्चेत

▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
अकोला जिल्ह्यात हिवरखेड ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रूपांतर होताच राजकीय वातावरण तापले आहे. भाजपच्या प्रचारसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवरखेड न.प. आम्ही दिले, हे गेल्या १० वर्षांतील मोठे पाऊल असा दावा करून श्रेय स्वतःकडे घेतले. फडणवीसांच्या या वक्तव्यानंतर स्थानिक राजकारणात मोठी चर्चा रंगली.

मात्र दुसऱ्या दिवशी अकोट येथील सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याला प्रत्युत्तर देत ङ्गहिवरखेड नगरपालिका व्हावी म्हणून आमदार अमोल मिटकरी यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्याच प्रयत्नांमुळे निर्णय झालाङ्ख असे सांगून श्रेयाचा दावा एनसीपीकडे खेचला. त्यामुळे महायुतीतील दोन मोठ्या नेत्यांमध्येच श्रेयवादाची ठिणगी पडून ती मोठी चर्चेची ठिणगी ठरली आहे.हिवरखेडच्या सभेत अजित पवार यांनी ङ्गठेकेदार नगरसेवक नकोत; लोककार्यक्षम, पारदर्शकतेने काम करणारे प्रतिनिधी हवेत असे तिखट वक्तव्य करून आणखी खळबळ उडवली. विकासकामात स्वच्छता आणि लोकहित हेच प्राधान्य असल्याचेही त्यांनी सांगितले.राजकीय पातळीवर दिलेले दावे-प्रतिदावे जिल्ह्यात मोठ्या चर्चेचा विषय ठरत असून स्थानिक जनता मात्र ङ्गखरे श्रेय कोणाचे? या संभ्रमात आहे. हिवरखेड न.प. रूपांतराचा विकासाचा मुद्दा मागे पडून आता श्रेयवादाचे राजकारण आघाडीवर येताना दिसत आहे.




# महापालिकेत संविधान उद्देशिकेचे वाचन



▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
आज दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. संविधान दिनाचे औचित्य साधून मनपाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे मनपा अधिकारी/कर्मचा-यांव्दारे संविधान उद्देशिकाचे सामुहिकरित्या वाचन करण्यात आले आहे.यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, मनपा उपायुक्त दिलीप जाधव, संतोष नायडू, मंगेश जाधव, सहा.अतिक्रमण निर्मुलन अधिकारी प्रवीण मिश्रा, मोहन दोर्वेकर, प्रशांत देशमुख, संतोष मोहोकार, निर्मला डहाके, संगीता ठाकुर, शेख सरफराज, सचिन राऊत यांचेसह मनपा अधिकारी/कर्मचा-यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# फॅन्सी नंबर प्लेट ३३८ वाहनांवर धडक दंडात्मक कार्यवाही

▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
मा. पोलीस अधीक्षक साहेब अकोला यांचे आदेशानुसार शहर वाहतुक नियंत्रण शाखा, अकोला मार्फत विशेष मोहीम दरम्यान शहरातील विना नंबर / फॅन्सी नंबर प्लेट वाहनांवर मोटार वाहन कायदया प्रमाणे कार्यवाही करण्याकरीता अकोला शहरात दिनांक १७/११/२०२५ ते २३/११/२०२५ पावेतो विशेष मोहीम राबवुन कारवाई करण्यात आली.

सदर विशेष मोहीम दरम्यान शहर वाहतुक नियंत्रण शाखे मधील अधिकारी व अंमलदार यांचे मार्फतीने शहरातील मुख्य चौकात व विविध परिसरामध्ये पेट्रोलींग करून विना नंबर / फॅन्सी नंबर प्लेट दोनचाकी, तिन चाकी व चारचाकी वाहन वाहतुक नियंत्रण शाखा, कार्यालय येथे ३३८ वाहन जप्त करून त्यांचेवर १,७४,००० /- रूपये दंड आकारण्यात आले त्यापैकी १०८ केसेस पेड करून ५४,००० रु दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच सबंधीत वाहन चालकांना वाहतुक नियमांची जाणीव करून देवुन व वाहतुक नियमा संबंधी समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात आले.



तरी शहर वाहतुक नियंत्रण शाखे मार्फत आवाहन करण्यात येत आहे की, वाहन चालकांनी विना नंबर / फॅन्सी नंबर प्लेट वाहन चालवु नये, वाहन चालवितांना वाहतुक नियमांचे उल्लंघन करू नये, तसेच वाहन चालवितांना सोबत वाहनांचे कागदपत्रे बाळगावे व वाहतुक नियमांचे तंतोतंत पालन करावे व आपले वाहनावर पेंडीग दंड ठेवु नये असल्यास त्वरीत वाहतुक पोलीस किंवा शहर वाहतुक कार्यालय येथे दंड भरावे.

# 'भारतीय संविधान':जगाचा सक्सेस पासवर्ड :प्रा राहुल माहुरे



स्थानिक सुधाकरराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय, अकोला येथे प्राचार्य डॉ भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत 'संविधान दिन' कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणुन बोलतांना प्रा. राहुल माहुरे यांनी वरील प्रतिपादन केले. याप्रसंगी विचारपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ अमोल मेश्राम होते. तसेचं कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षीका प्रा.सौ. सिमा उपासने उपस्थित होत्या.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पन करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहीक वाचन करण्यात आले.कु. आचल कांबळे या विद्यार्थीनीने भारतीय संविधानावर आधारित गीत सादर केले. प्रमुख वक्ते म्हणून पुढे बोलतांना प्रा राहुल माहुरे यांनी सांगितले की, जग वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान प्रगत झाले आहे. जीवनशैली बदलली आहे. पण या बदलाच्या काळातही आपल्याला एकत्र बांधून ठेवणारा धागा कोणता असेल, तर तो म्हणजे आपले 'भारतीय संविधान'. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिलेल्या भारतीय संविधानाच्या माध्यमातुन जगातील सर्व समस्यांचे आणी प्रश्नांचे उत्तर आपल्याला मिळते. जगाचा सक्सेस पासवर्ड कोणता असेल तर ते आहे 'भारतीय संविधान'संविधान आपल्याला 'भाषण स्वातंत्र्य' देते, पण सध्याच्या सोशल मीडियाच्या युगात त्याचा वापर आपण जबाबदारीने करत आहोत का? दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, ही लोकशाहीची खरी शिकवण आहे.

# गलीत प्रारब्ध बदलण्यासाठी भागवत श्रवण आवश्यक :पु.गोपाल महाराज

▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
दुःख हे राजाला व रंकाला सर्वांना समान रूपाने येत असतात.वैभव समोर असूनही दुःखे ही त्रासदायक येतात.यावर अक्सीर इलाज एकच आहे तो म्हणजे भागवत कथा श्रवण व सत्संग होय. सत्संग व भागवत श्रवण ने जीवनातील दुःखे नष्ट होऊन गलीत प्रारब्ध बदलुन जात असल्याचा हितोपदेश वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनी केला.



**जवाहर नगर येथील भागवत कथेस उत्स्फूर्त प्रतिसाद**

आशिष पवित्रकार मित्र परिवार व भागवत सेवा समितीच्या वतीने गुरुवर्य संत वासुदेव महाराज यांच्या स्मरणार्थ व स्व बाबुराव पवित्रकार यांच्या स्मृतीत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे मंगळवार पासून सुरू झालेल्या वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या श्रीमदब भागवत कथेत त्यांनी कथेचे प्रथम पुष्प गुंफले.ते म्हणाले सर्वप्रथम भागवत कथा ही देवर्षी नारदाने श्रवण केली. नारद हे अखंड ब्रह्मचारी असूनही त्यांना ही कथा का श्रवण करावी लागली याचा संगीतमय उहापोह पु गोपाल महाराज यांनी यावेळी केला.

ते म्हणाले,जर पापाची निर्मिती ही अगदी भक्तात झाली तरी सत्संगाच्या सानिध्यात असलेल्या भक्तांची ही अडचण भगवंत दूर करतात. म्हणून प्रथम भक्ती आवश्यक आहे. भक्तीने प्रेम निर्माण होते.जगाकडे पाहण्याची दृष्टी ही प्रेमाची होते. संतानी भक्ती करतांना प्रथम वात्सल्य व प्रेमाला प्रथम प्राधान्य दिले असल्याचे सांगितले.जिवाने प्रथम दास्य स्वीकारावे,या दास्य वृत्तीने भगवंत कृपा करीत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.सर्वप्रथम या कथा उत्सवाचा प्रारंभ हभप वासुदेवराव महल्ले यांच्या हस्ते व हभप संतोष महाराज पिसे, बाळासाहेब फोकमारे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. स्वागत माधवराव पवित्रकार, गणेशराव पवित्रकार, डॉ राम पागृत, शिवलाल बोर्डे,आशीष पवित्रकार, मीसुरकर, सुनील फोकमारे, राजेंद्र तरोळे, जीवनराव देशमुख आदींनी केले.आरतीने या सत्राचे समापन झाले. दि २ डिसेंबर रोजी साय ६ वाजता हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांच्या काल्याच्या कीर्तनाने या उत्सवाची पूर्णाहुती होणार आहे.दि १ डिसेंबर पर्यंत नित्य साय ७ ते रात्री १० वाजेपर्यंत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे आयोजित या भागवत कथेचा समस्त भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन भागवत सेवा समिती व आशिष पवित्रकार मित्र परिवारच्या समस्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले.

# जिल्हाधिकाऱ्यांचा संवेदनशील भागांवर सर्जिकल स्ट्राईकसारखा पाहणी दौरा!

## कायदा-सुव्यवस्थेचा धडाका; १००% मतदानाचा निर्धार पुन्हा अधोरेखित

■मुर्तिजापुर,दि २६ (प्रतिनिधी) :

आगामी २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुर्तिजापूर शहरात आज प्रशासनाचा तुफान हालचालींचा दिवस ठरला. आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या निर्धाराने मा. जिल्हाधिकारी वर्षा मीना आणि मा. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी मतदानपूर्व अत्यंत संवेदनशील भागांचा संयुक्त दौरा करून निवडणूक तयारीवर कसून नजर टाकली. शहरात कुठलीही ढिलाई चालणार नाही, निवडणूक निर्दोष पार पाडायचीचङ्ग असा स्पष्ट संदेश त्यांनी यावेळी दिल्याचे उपस्थित अधिकारी सांगतात.

जिल्हाधिकारी महोदया आगमन होताच त्यांचे स्वागत करण्यात आले आणि तत्काळ डतएएझ मोहिमेअंतर्गत सुरू असलेल्या जनजागृती उपक्रमांचे परीक्षण झाले. १००% मतदानाचे ध्येय गाठण्यासाठी जोरदार मोहीम शहरात सुरू असून याच अनुषंगाने जिल्हाधिकारी मीना व पोलीस अधीक्षक चांडक यांच्या हस्ते 'मतदार स्वाक्षरी अभियानास' सुरुवात झाली.

मुर्तिजापूर हायस्कूल आणि सेंट आन्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जबरदस्त पथनाट्य



सादर करत मतदार जनजागृतीला वेग दिला. विद्यार्थ्यांचे प्रभावी सादरीकरण पाहून जिल्हाधिकारी महोदयांनी त्यांचे भरभरून कौतुक केले.संविधान दिनाचे औचित्य साधून निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. त्यानंतर २६/११ च्या मुंबई हल्ल्यात शहीद झालेल्यांना उपस्थितांनी मौन श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या बलिदानास नमन केले.

यानंतर सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी क्षेत्रीय अधिकारी, नोडल अधिकारी यांचे कामकाज तपासले. आवश्यक तेथे सूचना देत, ङ्गजनतेचा विश्वास अबाधित राहील अशी निवडणूक घडवाङ्ग असा कडक आदेश दिला. बैठकीस जिल्हा उपआयुक्त डॉ. विश्वनाथ वडजे, सहा. एनडीओ निलेश जाधव, अतिरिक्त सहा. एनडीओ शिल्पा बोबडे, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे व पोलिस निरीक्षक अजित जाधव उपस्थित होते.दौऱ्याचा समारोप स्ट्राँग रूम, मतमोजणी कक्ष आणि शहरातील महत्त्वाच्या मतदान केंद्रांच्या बारकाईने पाहणीनंतर झाला. पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी मीना यांनी केलेल्या सूचनांमुळे यंत्रणेतील अधिकारी सज्ज दिसत होते.

# 'ओव्हरसीज फोरम' कृषि पदवीधरांच्या पंखाना बळ देणारं सशक्त माध्यम: डॉ. देवानंद पंचभाई

## उच्च शिक्षणातील संधीवर विद्यापीठात विचारमंथन, 'ओव्हरसीज फोरम'चा उपक्रम!

■अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :

अलीकडील काळात आपल्या व्याख्यानामध्ये मार्गदर्शन करताना नागपूर स्थित शाह ओव्हरसीज चे संचालक श्री. निकित शाह यांनी कृषि, उद्यानविद्या, कृषि अभियांत्रिकी, कृषि जैवशास्त्र, वनविद्या, कृषी प्रक्रिया, कृषी व्यवसाय व्यवस्थापन या विषयांमध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, नेदरलँड ,तसेच युरोपातील विविध देशातील असलेल्या नामांकित विद्यापीठांमध्ये उपलब्ध असलेल्या उच्च शिक्षणासाठीच्या संधीबद्दल सविस्तर माहिती दिली तसेच विविध नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक परीक्षा त्यासाठी करावी लागणारी तयारी ,आवश्यक असलेले दस्तऐवज ,प्रवेश घेतल्यानंतर उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्ती आणि शिक्षण पूर्ण केल्यानंतर उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधी याबाबत विस्तृत माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

सध्या जागतिक स्तरावर कृषि आणि संलग्न विषयातील शिक्षण आणि संशोधन क्षेत्रामध्ये



अमर्याद संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील विविध संस्थांमध्ये उच्च शिक्षणाच्या असणाऱ्या संधीबद्दल माहिती होऊन त्यांच्यामध्ये उच्च शिक्षण घेण्याची प्रेरणा निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला चे सन्माननीय कुलगुरू डॉ शरद गडाख यांचे संकल्पनेतून 'स्पर्धा परीक्षा फोरम' ची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात , याच शृंखलेमधे नुकतेच नागपूर स्थित शाह ओव्हरसीज चे संचालक श्री. निकित शाह यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, प्रसंगी उपस्थित कृषी पदवीधरांना संबोधित करताना ते बोलत होते. कृषी महाविद्यालय अकोलाच्या स्व. के.आर ठाकरे सभागृहात संपन्न झालेल्या या अतिशय महत्त्वकांक्षी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे अधिष्ठाता कृषि डॉ देवानंद पंचभाई होते. यापुढे

मार्गदर्शन करताना शाह यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी ची तयारी ही पदवी परीक्षेच्या दुसऱ्या वर्षापासूनच करण्याची आवश्यक असल्याचे विशद केले. सोबतच विविध देशांमध्ये असलेल्या विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आत्म विश्वास बळकट करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे यासाठीची गुरुकिल्ली सुद्धा प्रदान केली. सदर व्याख्यानामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देऊन उच्च शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन सुद्धा दिले.

# परमात्मा हा मायेचा अधिपती:पु.गोपाल महाराज

**अकोला:** सर्व सृष्टी ही मायेने व्यापलेली आहे. त्यातील सर्व प्राणीमात्रवर मायेची सत्ता आहे. या सत्तेच्या अनुषंगाने मनुष्य हा गोड,वाईट वृत्तीत असतो.या मायेच्या अधीन जीव असून जीव हा मायेच्या अधीन आहे. मात्र जो भगवंताच्या अधीन आहे.तो या मायेच्या जोखडातून कायमचा मुक्त होऊन माया त्याच्यावर वार करीत नाही. म्हणून भक्तीने भगवंताची प्राप्ती व अनुग्रह प्राप्त करून मायेच्या जोखडातून मुक्त होण्याचा हितोपदेश वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेड कर यांनी केला.

आशिष पवित्रकार मित्र परिवार व भागवत सेवा समितीच्या वतीने गुरुवर्य संत वासुदेव महाराज यांच्या स्मरणार्थ व स्व बाबुराव पवित्रकार यांच्या स्मृतीत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे सुरू असलेल्या वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेड कर यांच्या श्रीमद्‌ भागवत कथेत त्यांनी कथेचे द्वितीय पुष्प गुंफले.ते म्हणाले,सत्संगती ही भक्तीची परीचायक आहे. सत्संगतीतुन भक्तीची आस निर्माण होते.ही आस आपणास निरामय आरोग्य व शाश्वत सुख प्रदान करीत असते. म्हणून जीवनात सत्संगाला महत्व देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.या सत्रात त्यांनी शुकदासांची सारगर्भित संगीतमय कथा प्रतिपादित केली. त्यांनी यावेळी उर्वरित जीवनाची व्याख्या सांगितली.

ते म्हणाले,उर्वरित आयुष्य सत्संगतीत गेले पाहिजे. घरात शांती,हातात पोथी,प्रेमळ सुना, नातवंड, भजनाला पुरेसा शांत वेळ हीच यशस्वी जीवनाची फलश्रुती झाली पाहिजे. जेष्ठांनी या वाहिवाटीची कास धरली पाहिजे. घरीं देव वा सद्गुरू पाहुणा आला पाहिजे असे सुंदर व आत्मिक शांती असलेल्या घराची निर्मिती झाली पाहिजे असे त्यांनी यावेळी सांगून सत्राचे समापन केले. या सत्रात भक्तिमय भजनांनी वातावरण अधिकच भक्तिमय झाले होते.सर्वप्रथम पु गोपाल महाराज यांचे स्वागत पुष्पा गुलवडे, मनुताई गावंडे,विवेक शास्त्रीकर, जगदीश मुरूमकर, संजय देशमुख, प्रदिप खाडे ,पुष्पराज गावंडे, राजेंद्र देशमुख,सागर लोडम, राजेंद्र जैन,जया देशमुख, रश्मी घुगे,विद्या भांगे, वनिता पवार, अमोल भिलकर,प्रवीण मंडाले,पाथरीकर, गजानन घोंगे,हर्षद हेडा, पांडे,राम भिरड आदींनी केले.संचालन जीवन देशमुख यांनी केले.सखी मंच गोकुळ कालोनीच्या आरतीने या सत्राचे समापन झाले. दि २ डिसेंबर रोजी साय ६ वाजता हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांच्या काल्याच्या कीर्तनाने या उत्सवाची पूर्णाहुती होणार आहे.दि १ डिसेंबर पर्यंत नित्य साय ७ ते रात्री १० वाजेपर्यंत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे आयोजित या भागवत कथेचा समस्त भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा.

# श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन

■अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :

'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन जानेवारी महिन्यात नांदेड येथे करण्यात आले असल्याची माहिती 'हिंदी दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम' राज्यस्तरीय समितीने दिली आहे.श्री गुरू तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरू आहेत. मानवाधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंदी दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, २१ डिसेंबर रोजी नवी मुंबई येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तर, जानेवारीमध्ये नांदेड येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचा मुंबई येथील कार्यशाळेने शुभारंभ करण्यात आला होता. श्री गुरू तेग बहादूर यांच्या कार्याचा आणि हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोचविण्यात येणार आहे. तहसील, शहर जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात श्री गुरू तेग बहादूर यांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

या गौरवशाली इतिहासाच्या स्मृती सोहळ्यानिमित्त शिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाजाचे गुरुबंधुत्व नाते अधिक दृढ होणार आहे. समन्वय समितीच्या माध्यमातून प्रचार व प्रसाराचे कार्य यशस्वीपणे पार पाडणार आहे. श्री गुरू तेग बहादूर यांची शहादत व योगदान हे धर्म आणि मानवतेच्या रक्षणाचे तेजस्वी प्रतीक आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या शौर्याचा आणि श्रद्धेचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामुळे या सहा समाजाच्या गौरवशाली, पराक्रमी आणि धर्मनिष्ठ इतिहासाला नवे बळ मिळणार असून गुरुबंधुत्वाचा हा पवित्र वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

### गौरव काटोले पुरस्काराने सन्मानित

**अकोट :** शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त सुरू झालेल्या शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा आठवा वर्धापन दिन ठाणे येथील मातोश्री गंगुबाई सभागृहात पार पडला. या कार्यक्रमात अकोट तालुक्यात वैद्यकीय व सामाजिक क्षेत्राच्या कार्यात केलेल्या निःस्वार्थ योगदानाबद्दल गौरव काटोले यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## थोडक्यात

### ज्योती विद्यालयात स्काउट गाइड शिबिर

**अकोला :** स्थानिक ज्योती जानोळकर विद्यालयामध्ये स्काऊट गाईड मेळाव्याचे १ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराचे प्रथम दिवशी शिबिरातील परिसर स्वच्छ करून तंबूची उभारणी तर दुसर्या दिवशी मान्यवरांच्या हस्ते स्काऊट ध्वजारोहण करण्यात येते. सहभोजनासह शेकोटीचे आयोजन करण्यात आले होते. हस्तकला प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी विविध हस्तकला सादर केल्या काही विद्यार्थ्यांनी कचऱ्यातून कला निर्मिती तसेच विविध नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापिका प्रतिभा जानोळकर तर प्रमुख पाहुणे उपशिक्षणाधिकारी प्रमोद टेकाडे, स्काऊट संघटक किरण लहाने, गाईड संघटक जयमाला जाधव, संस्था सचिव प्रशांत जानोरकर, संचालिका स्मिता जानोळकर, मुख्याध्यापक डी. यु. लांडे उपस्थित होते. यावेळी प्रशांत जानोळकर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना स्काऊट शिक्षण हे स्वतःला जीवनामध्ये शिस्त व स्वावलंबी बनवते व एक उत्तम नागरिक घडविला जात असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या तंबूचे निरीक्षण करून सजावट असणाऱ्या तंबूतील विद्याथ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक देऊन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र चे वाटप करण्यात आले. संचालन नाचणे मॅडम तर आभार प्रदर्शन नरेंद्र गावंडे यांनी केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्काऊटर गावंडे, जितेंद्र राठोड, सतीश दहातोंड, गाईडर नाचणे मॅडम, शिदि मॅडम, औरंगपूरे मॅडम शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले,

### खंडेलवाल विद्यालयाचा संघ राज्यस्तरावर विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत विजेतेपद

**अकोला :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे आयोजित विभागीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत संघाची कर्णधार श्रद्धा टेरे व उपकर्णधार अक्षरा ताले यांच्या नेतृत्वात मोहरीदेवी खंडेलवाल संघाने खेळात आपले कौशल्य दाखवत विजेतेपद पटकावले. या यशासह संघाची संघाची राज्यस्तरीयस्पर्धेसाठी निवड झाली. राज्यस्तरीय स्पर्धा नागपूर येथे २६ ते २८ नोव्हेंबर होणार असून विजेत्या संघाला प्रशिक्षक भूषण गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी खेळाडू विद्यार्थिनींचे शाळेच्या अध्यक्षा डॉ. तारा हातवळणे, सचिव गोपाल खंडेलवाल, सदस्य नाना कुलकर्णी, मुख्याध्यापिका रसिका वाजगे, उपमुख्याध्यापक उमेश कुळमेथे, पर्यवेक्षक दादा वंजारे, क्रीडा शिक्षिका अर्चना मेतकर, प्रदीप चौखंडे, सुधीर मोरे तसेच शाळेतील शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी कौतूक केले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्यायासाठी अन्यायग्रस्त महिलेचे उपोषण

**अकोला :** खदान पोलिस स्टेशन हद्दीतील मलकापूर येथील रहिवासी आरोपीने व्यवसाय करून भागीदारीच्या व्यवसायाचे आमिष देऊन महिलेची तब्बल ४ लाख ८५ हजार रुपयांनी फसवणूक केली आहे. याबाबत तुषार देशमुख याच्याविरुध्द कठोर कारवाई करून न्याय देण्याची मागणी अन्यायग्रस्त महिला गंगा प्रदीप सोनोने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाच्या माध्यमातून सोमवारी केली आहे. देशमुख याने त्याच्या ओळखीचे एका व्यक्तीचे हॉटिल भाडेतत्त्वावर घेऊन भागीदारी व्यवसाय सुरू करण्याचे प्रलोभन दिले. त्याकरिता पैशांची आवश्यकता असल्याची महिलेकडे मागणी केली. देशमुख हा महिलेच्या घराशेजारी असल्यामुळे त्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांनी ४ लाख ८५ हजार रुपये टप्याटप्याने ऑनलाइन तसेच काही रोख रक्कम स्वरूपात दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# खून प्रकरणातील आरोपी पतीला एका दिवसाची पोलीस कोठडी

■अकोला,दि २६ (प्रतिनिधी) : अकोट फैल पोलीस ठाण्याच्या हदीत सोमवारी सकाळी घडलेल्या धक्कादायक खून प्रकरणात न्यायालयाने आरोपी शेख राजू शेख निजाम (४१) यास एका दिवसाची पोलिस कोठडी (पीसीआर) मंजूर केली आहे. राजू नगर परिसरात झालेल्या या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी शेख राजूने कौटुंबिक वादातून आपल्या पत्नी शेख शमीन शेख राजू (३६) हिचा गळा चिरून खून केला. घटनेनंतर अकोट फाईल पोलिसांनी तत्काळघटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि आरोपीला ताब्यातघेतले. प्राथमिक तपासात कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले असता, आरोपीचे वकील नजीब शेख यांनी असा युक्तिवाद मांडला की, 'पोलिसांनी हत्येत वापरण्यात आलेले शस्त्र तसेच इतर साहित्यजप्त केले असून तपासासाठी आवश्यक पुरावे गोळा झाले आहेत. त्यामुळे आरोपीला पोलिस कोठडीत ठेवण्याची गरज उरलेली नाही.'यावर सरकारी वकील तसेच तपास अधिकाऱ्यांनी प्रतिवाद केला.

# संविधान दिन व मतदान जागृती अभियानाचे आयोजन

■अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :

हिवरखेड सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात संविधान दिन व मतदार जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी महात्मा जोतीराव फुले व राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हारार्पन करून अभिवादन करण्यात आले.या दिनाचे औचित्य साधून संविधान दिनाचे महत्व व मतदान जनजागृती अभियान अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण नगर परिषद परिसर व चंडिका चौक या ठिकाणी करण्यात केले. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी दादाराव डोल्हारकर यांनी या पथनाट्य सादरीकरण करणाऱ्या




विद्यार्थ्यांसाठी गौरवोद्गार व्यक्त केले. हिवरखेड मधील जनतेला मतदान वाढीसाठी आवाहन केले.यावेळी भोपळे विद्यालयाचे प्राचार्य संतोषकुमार राऊत, हे उपस्थित होते.या पथनाट्य व्यतिरीक्त जिल्हा परीषद महात्मा गाधी विध्यालय जि प , ऊर्दुशाळा, तसेच सरस्वती मराठी शाळा, यांनी सूद्दा सविंधान दिन तथा मतदार जागृती मतदान वाढवा अभियान रॅली काढली तर पथनाट्य सादरीकरणासाठी शाळेचे विभाग प्रमुख स्नेहल भोपळे व पर्यवेक्षक गणेश खानझोडे यांच्या मार्गदर्शनात राज्यशास्त्र विषयाच्या विभाग प्रमुख प्रा. स्नेहा शुक्ला यांच्या नेतृत्वात केली.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या

## पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंध

■अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :

भारतीय सैन्यदल, नौदल, व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) या परीक्षेची पूर्व तयारी करून घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व युवतीसाठी दि. १५ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६४ आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन, आणि प्रशिक्षणाची निःशुल्क सोय करण्यात आली आहे. जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे दि. ८ डिसेंबर २०२५ रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग (डीएसडब्ल्यु) पुणे यांची वेबसाईट www. mahasainik.maharashtra. gov.in या संकेत स्थळावर सर्च करून त्यामधील एसएसबी - ६४ कोर्सेसाठी किंवा व्हॉटसअॅप क्र. ९१५६०७३३०६ वर संबंधीत प्रवेश पत्र व परीशिष्टांची चेक लिस्ट यांचे अवलोकन करून त्याची दोन प्रतीमध्ये प्रिंट काढून (किंवा प्रिंट कार्यालयाकडून घ्यावी) ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे. केंद्रामध्ये एस.एस.बी.कोर्स मध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमुद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येतांना सोबत घेवून यावेत.कंम्बाईड डिफफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन (सीडीएसई-युपीएससी) अथवा नॅशनल डिफफेंस अॅकेडमी एक्झामिनेशन (एनडीए-युपीएससी) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे, एनसीसी 'सी' सर्टिफिकेट 'ए' किंवा 'बी' ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्कार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. युनिर्व्हसिटी एन्ट्री स्किमसाठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे. अधिक माहीतीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेलआई डी- training.etenashik@gmail.com व दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉटसअॅप क्र. ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी (निवृत्त सेना मेडल) मेजर आनंद शरद पाथरकर यांनी केले आहे.

# भुसावळ विभागात १५ स्थानकांवर ४९ एटीव्हीएम

■अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :

प्रवाशांना तिकिटांसाठी रांगेत न थांबता जलद आणि सुलभ पद्धतीने तिकीट मिळावे, डिजिटल तिकीटिंगला प्रोत्साहन मिळावे आणि सेल्फ-टिकिटिंगची संस्कृती वाढीस लागावी या उद्देशाने रेल्वे प्रशासनाकडून विविध स्थानकांवर ऑटोमॅटिक टिकट व्हेंडिंग मशीन (एटीव्हीएम) उपलब्ध करून देण्यात आली आहेत.तसेच क्यूआर कोड आणि यूपीआय आयडीद्वारे डिजिटल पेमेंटची सुविधाही अधिक सक्षम करण्यात आली आहे. भुसावळ विभागात प्रवाशांच्या सुविधा लक्षात घेऊन एकूण १५ स्थानकांवर ४९ एटीव्हीएम बसविण्यात आले आहेत. या मशीनचा सहज उपयोग करता यावा यासाठी १२ प्रशिक्षित सहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली असून हे सहाय्यक स्थानक परिसरात प्रवाशांना एटीव्हीएमद्वारे तिकीट कसे काढायचे याबाबत मार्गदर्शन करत आहेत. भुसावळ विभागातील देवलाली, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, अमरावती, बुरहानपुर आणि खंडवा या प्रमुख स्थानकांवर एटीव्हीएमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एटीव्हीएमचा वापर, त्याचे फायदे आणि विशेषतांचा माहिती करून देणारी सूचना फलक स्थानकांवर लावण्यात आली आहेत.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

# भारतातील अवयवदानाची नैतिक आणि मानवी गरज

मानवी जीवन अमूल्य आहे. विज्ञान, वैद्यक आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे मानवी आरोग्यसेवा अधिक सक्षम, प्रभावी आणि जीवनरक्षक झाली आहे. आज अनेक गंभीर आजारांवर उपचार शक्य झाले आहेत; पण काही अवस्थांमध्ये औषधोपचार किंवा शस्त्रक्रिया पुरेशी ठरत नाही.

अशा स्थितीत अवयव प्रत्यारोपण हीच अंतिम आणि एकमेव उपचारपद्धती ठरते. मूत्रपिंड निकामी होणे, यकृताचे विकार, हृदय अपयश, कॉर्नियाचे आजार, फुफ्फुसांचे विकार अशा अनेक गंभीर आजारांमुळे हजारो रुग्ण जीव-मरणाच्या संघर्षात दिवसेंदिवस अडकत आहेत.

या पार्श्वभूमीवर २७ नोव्हेंबर रोजी पाळला जाणारा 'भारतीय अवयव दान दिन' हा केवळ दिनविशेष नसून मानवतेचे आणि करुणेचे स्मरण करून देणारा दिवस आहे. हा दिवस आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो तो प्रश्न म्हणजे मृत्यूनंतर देह थांबतो, पण त्यातील अवयवांनी इतरांचे जीवन पुन्हा सुरू होऊ शकते, मग आपण का मागे पडतो?ह्व

अवयवदान ही केवळ वैद्यकीय संकल्पना नसून ही संकल्पना समाजशास्त्रीय, सांस्कृतिक, नैतिक आणि भावनिक स्तरांशी जोडलेला प्रश्न आहे. भारतीय समाजात आजही मृत्युनंतर शरीराशी संबंधित संस्कार, धार्मिक श्रद्धा, आत्म्याबद्दलच्या कल्पना, कर्म-फलाची संकल्पना आणि जन्म-मृत्यूचे तत्वज्ञान यांचा माणसाच्या निर्णयांवर मोठा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे अनेक वेळा अवयवदानाबाबत अज्ञान, गैरसमज, अंधश्रद्धा आणि भावनिक विरोध आढळतो. विशेषतः ग्रामीण भागात आणि कमी सुशिक्षित समाजघटकांमध्ये अवयवदान म्हणजे ह्वशरीर अपूर्ण होणेह्व, ह्वपुनर्जन्मात शरीर अधूरं मिळणेह्व, ह्वशरीरावर अत्याचारह्व असे चुकीचे अर्थ आजही प्रचलित आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता या भीती, श्रद्धा आणि गैरसमजांच्या आड एक मोठा मानवी प्रश्न दबून राहतो तो प्रश्न म्हणजे ह्वजर माज्या मृत्यूनंतर माज्या एका निर्णयामुळे कोणाचे तरी जीवन वाचू शकते, तर तो निर्णय न घेणे योग्य आहे का?ह्व*

भारतात अवयव प्रत्यारोपणाची गरज मोठी आहे. सरकारच्या आणि वैद्यकीय संस्थांच्या अहवालानुसार दरवर्षी हजारो रुग्ण अवयवांच्या प्रतीक्षायादीतच मृत्युमुखी पडतात. पण दुसरीकडे दरवर्षी लाखो लोक असे मृत्यूला सामोरे जातात ज्यांच्यातील अवयव दानातून अनेकांचे जीव वाचू शकतात.

समाजशास्त्रीय विसंगती अशी की इच्छा असूनही प्रक्रिया, माहिती, नोंदणी आणि जागरूकतेचा अभाव हा अवयवदानाच्या प्रसारात मोठा अडथळा ठरतो. ही परिस्थिती पाहता सामाजिक संस्था, डॉक्टर्स, धोरणकर्ते, माध्यमे आणि नागरिक यांनी मिळून अवयवदानाची संस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे.



अवयवदान ही मूल्याधिष्ठित कृती आहे, त्यामध्ये समता, सहजीवन, मानवी एकात्मता आणि परोपकाराची सर्वोच्च पायरी असते. जेव्हा दाता आणि प्राप्तकर्ता एकमेकांना ओळखत नसतात, धर्म, जात, भाषा किंवा वर्ग फरक नसतो, तेव्हा हा कृतीसमूह मानवी समाजातील सर्वात सुंदर समानतेचा संदेश देतो. अवयवदान ही केवळ एका व्यक्तीची मदत नसून मानवी नात्यांची सीमा मिटवणारी आणि सामाजिक बांधिलकी मजबूत करणारी जोपासना आहे.

विशेष म्हणजे एका मृत व्यक्तीच्या अवयवांमुळे काही जीवनं वाचू शकतात आणि काही व्यक्तींना जीवनशक्ती, दृष्टी किंवा कार्यक्षम जीवन मिळू शकते.

भारतात कायदेशीर पातळीवर 'Human Organ Transplantation Act' हा कायदा अवयवदानाला वैध मान्यता देतो. हा कायदा अवयवांची देवाणघेवाण, विक्री किंवा शोषण टाळण्यासाठी अस्तित्वात आला.

परंतु कायदा पुरेसा नाही, सामाजिक बदल आवश्यक आहे. कुटुंबातील चर्चा, शाळांमधील मूल्यशिक्षण, धार्मिक आणि सामाजिक नेत्यांचे मार्गदर्शन, रुग्णालयांची तयारी, मेंदूमृत्यूची संकल्पना समजावणे आणि डिजिटल अवयवदान नोंदणी या प्रक्रिया जनजागृतीचा महत्त्वाचा भाग ठरतात.

आजही अनेक कुटुंबे भावनिक वेदनेत निर्णय घेऊ शकत नाहीत, कारण अवयवदानाची कल्पना त्यांना मृत्यूला वेगळ्या नजरेने पाहायला लावते. पण समाजशास्त्रीय अर्थाने पाहता अवयवदान मृत्यूचे अर्थनिर्माण करते, मृत्यूला निरर्थक न ठेवता जीवनाचा विस्तार बनवते.

अवयवदान ही सामाजिक जबाबदारी आहे. जर प्रत्येक व्यक्ती अत्यावश्यक ओळखपत्रांमध्ये जसे PAN, Aadhaar, Driving License तसेच Organ Donor Consent जोडून ठेवला तर भारत अवयवदानात पुढे येईल. तरुण पिढीत जागरूकता वाढत आहे, परंतु वृद्ध आणि ग्रामीण समाज घटकांमध्ये माहितीचा अभाव अजूनही आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

माध्यमांची भूमिका येथे खूप मोठी आहे. मृत्यूचा भीतीदायक चेहरा न दाखवता नवीन जन्मासारखी जीवनदानाची प्रतिमा समाजात पसरवणे आवश्यक आहे.

अवयवदान म्हणजे फक्त एक कृती नाही, ती एक वारसा आहे. एक पिढीकडून दुसऱ्या पिढीला मानवतेची साथ तेणे आवश्यक आहे.

२७ नोव्हेंबरचा हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की डॉक्टर, विज्ञान किंवा तंत्रज्ञान एकट्याने जीव वाचवू शकत नाही. तर त्यासोबतच त्या साखळीत सर्वात महत्त्वाची कडी म्हणजे आपण आणि आपला निर्णय होय.

जेव्हा शरीर भस्म होते, जमिनीत विलीन होते किंवा समुद्रात सोडले जाते तेव्हा काही शिल्लक राहत नाही. परंतु अवयवदान केले तर आपले हृदय कोणाच्यातरी शरीरात धडधडत राहते, डोळे कोणालातरी नवीन जग दाखवतात, फुफ्फुसे कोणाला स्वच्छ जीवन देतात आणि मूत्रपिंड कोणाला नवसंजीवनी देते. हे फक्त शरीरदान नाही, तर हे जीवनाचा विस्तार आहे, अस्तित्वाचा नवीनर्जन्म आहे.

आज २७ नोव्हेबर रोजी अवयव दान दिनानिमित्त एकच संदेश देता येईल की मृत्यू अनिवार्य आहे, पण अवयवदान हे अमरत्वाचे दार आहे. चलो, जागृत व्हा, नोंदणी करा आणि मानवतेच्या या अद्वितीय परंपरेचा भाग बनूया. अवयव दान करून दुसऱ्यांना जीवन द्या, कारण मृत्यूनंतरसुद्धा आपण कोणाच्यातरी श्वासांत जिवंत राहू शकतो.

# भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे संविधान




प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले
डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यरत्न पुरस्कार प्राप्त साहित्यिक
अमरावती. ८०८७७४८६०९

भारतीय संविधान हे लिखित स्वरूपातील जगातील सर्वात मोठे संविधान आहे. ते भारताला एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित करते.भारतीय संविधानाला दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने ते स्वीकारले, म्हणून या दिवसाला 'संविधान दिन' म्हणून ओळखले जाते.

भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीची तारीख २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. ज्याला आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो.

भारतीय संविधानाची निर्मिती संविधान सभेने केली. डॉ.राजेंद्र प्रसाद हे या संविधान सभेचे अध्यक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. संविधान तयार करण्यासाठी सुमारे दोन वर्षे, अकरा महिने आणि अठरा दिवस लागले. भारतीय संविधान तयार करण्यासाठी नेमलेल्या संविधान सभेची सुरुवातीची एकूण सदस्य संख्या ३८९ होती. भारताच्या फाळणीनंतर १५ ऑगस्ट १९४७ ला ही संख्या कमी होऊन २९९ झाली. या २९९ सदस्यांनीच संविधानावर स्वाक्षरी केली आणि ते तयार केले.

संविधानाची सुरुवात' प्रस्तावना' (उद्देशिका) पासून होते,जी संविधानाचे सार आणि उद्दिष्टे स्पष्ट करते. 'आम्ही भारताचे लोक' प्रस्तावना या शब्दांनी सुरू होते,ज्यातून संविधानाचा अधिकार हा भारताच्या जनतेकडून प्राप्त झाला आहे, हे स्पष्ट होते. मूळ संविधानात ३९५ कलमे , २२ भाग आणि आठ अनुसूची होत्या. सध्या संविधानात सुमारे ४७० हून अधिक कलमे, २५ भाग आणि बारा अनुसूची आहेत. भाग तीन मध्ये नागरिकांसाठी सहा मूलभूत हक्कांची (उदा. समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क) हमी दिली आहे.

भाग ४-अ मध्ये नागरिकांसाठी अकरा मूलभूत कर्तव्यांचा समावेश आहे. राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे भाग ४ मध्ये आहे.राज्याने धोरणे तयार करताना पाळावयाच्या तत्त्वांचा समावेश आहे. भारताने ब्रिटनच्या धर्तीवर संसदीय लोकशाही शासनप्रणालीचा स्वीकार केला आहे.

भारताने केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये अधिकारांचे वाटप करणारी संघराज्य प्रणाली स्वीकारली आहे. संविधानाने न्यायपालिकेला कायद्याचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार दिला आहे, ज्यायोगे ती संविधानाचे रक्षण करते.

भारतीय संविधानात अनेक तरतुदी विविध देशांच्या संविधानातून घेतल्या आहेत (उदा. अमेरिका, आयर्लंड, कॅनडा). १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने प्रस्तावनेत' समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष' आणि 'अखंडता' हे शब्द जोडले गेले. सरकार कोणत्याही एका धमार्ला 'राजधर्म' मानत नाही आणि सर्व धर्मांना समान वागणूक देते. धर्मनिरपेक्षता महत्वाची मानलेली आहे. संविधानाचे १८ वर्षे वयाच्या सर्व नागरिकांना कोणताही भेदभाव न करता मतदानाचा हक्क दिला आहे.

कलम ३६८ नुसार संविधानात बदल (घटनादुरुस्ती) करण्याची तरतूद आहे.भारतात सर्वोच्च न्यायालय हे शीर्षस्थानी असलेली एकात्मिक न्यायव्यवस्था आहे. संविधानाने नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, विश्वास, धर्म आणि उपासनेचे स्वातंत्र्य दिले आहे. भाग १८ मध्ये राष्ट्रीय आणि प्रादेशिक आणीबाणीच्या तरतुदी दिल्या आहेत. संविधानामुळे देशात द्विगृही संसद (लोकसभा आणि राज्यसभा) अस्तित्वात आहे.

संविधान राष्ट्रीय एकात्मता आणि विविधता जपण्याचे उद्दिष्ट ठेवते.भारताने नागरिकांसाठी 'एकल नागरिकत्वा'ची तरतूद केली आहे. हे एक गतिमान आणि 'जीवंत दस्तऐवज' आहे, जे बदलत्या काळानुसार घटनादुरुस्तीद्वारे विकसित होत राहते.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणतात. कारण ते संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते. या समितीवर भारताच्या संविधानाचा मसुदा तयार करण्याची महत्त्वाची जबाबदारी होती. मसुद्यावर झालेल्या प्रत्येक चर्चेत त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण, युक्तिवादात्मक आणि निर्णायक भूमिका घेतली.

मसुदा समितीतील अन्य सदस्यांच्या अनुपस्थितीमुळे मसुदा तयार करण्याची बहुतांश जबाबदारी त्यांनी एकट्याने समर्थपणे पार पाडली.त्यांनी मसुद्यातील प्रत्येक कलम,तरतूद आणि संकल्पना यावर सखोल चर्चा केली आणि अंतिम रूप दिले. त्यांनी जगातील अमेरिका, इंग्लंड, आयर्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया अशा अनेक देशातील संविधानांचा सखोल अभ्यास केला.

या अभ्यासातून त्यांनी भारतीय परिस्थितीसाठी उपयुक्त ठरतील अशा उत्कृष्ट तरतुदी आणि संकल्पना निवडल्या आणि त्यांचा समावेश भारतीय संविधानात केला.सामाजिक न्याय आणि समानतेवर त्यांचा ठाम विश्वास होता.

त्यांनी अस्पृश्यता निवारण, मागासलेल्या वर्गांसाठी आरक्षण, मूलभूत अधिकार आणि राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे यांसारख्या तरतुदींच्या समावेशावर विशेष भर दिला. या तरतुदींमुळे भारतीय संविधान सामाजिक बदल घडवून आणण्याचे एक प्रभावी साधन बनले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ?संविधानाच्या प्रत्येक भागावर झालेल्या वादविवादात तर्कशुद्ध आणि कायदेशीर दृष्टिकोन मांडला. त्यांच्या उत्कृष्ट बुद्धिमत्ता,कायद्याचे सखोल ज्ञान आणि दूरदृष्टीमुळे संविधानाची रचना मजबूत आणि चिरस्थायी बनली.

या सर्व योगदानामुळे, विशेषता संविधान मसुदा समितीचे नेतृत्व आणि सामाजिक न्यायावर आधारित संविधानाची निर्मिती केल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'भारतीय घटनेचे शिल्पकार' ही उपाधी यथार्थपणे प्राप्त झाली आहे.

■ ■ ■

# लपलेल्या नक्षल समर्थकांना ठेचून काढा

देशाच्या राजधानीत अत्यंत धक्कादायक प्रकार नुकताच घडला दिल्लीतील इंडिया गेटवर वायू प्रदूषणाविरुद्ध निदर्शने करणाऱ्या आंदोलनकाऱ्यांनी नुकत्याच नक्षल विरोधी चकमकीत खात्मा झालेला देशातील मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी कमांडर माडवी हिडमाचे पोस्टर झळकावले.

पोस्टरमध्ये हिडमाची तुलना आदिवासी स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांच्याशी करण्यात आली. त्याचे जल, जंगल आणि जमिनीचे रक्षक म्हणून वर्णन करण्यात आले.त्याच्या समर्थनार्थ जितने हिडमा मारोगे, हर घर से हिडमा निकलेगा... असे नारे लावून देशाच्या सुरक्षेला-शांततेला व एकात्मतेला धमकी देण्याची हिंमत करण्यात आली.

हेच ते लपलेले नक्षल समर्थक असा आरोप संपूर्ण देशात होऊ लागला, सोशल मीडियावर या आंदोलकांच्या विरोधात लाट उसळली. नुकत्याच घडलेल्या बॉम्बस्फोटाच्या धक्क्यातून दिल्ली सावरत असतांनाच असा धक्कादायक प्रकार घडल्याने चिंता वाढली. अर्बन नक्षलीझम आणि अर्बन समर्थक ही बाब पुन्हा स्पष्टपणे अधोरेखित झालेली दिसते. नक्षलवाद ही कीड कुठून कुठपर्यंत लागलेली आहे हे आता पुन्हा एकदा या घटनेने समोरे आले आहे.

देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी आधीच घोषित केल्याप्रमाणे ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार होणार असे घोषित केल्यापासून व प्रत्यक्षात यावर आक्रमक पणे कृती योजना सुरू असतांनाच अनेक नक्षलवादी शरणागती पत्करताना दिसत आहेत, ज्यांनी आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारला नाही त्यांना थेट गोळीनेच उत्तर मिळत आहे. हे सर्व सुरू असतांना कधी नव्हे तर युद्धबंदी करण्याचा व सरकारसोबत शांती वार्ता करण्याचा प्रस्ताव नक्षलवाद्यांकडून ठेवण्यात आलेला होता. परंतु गृहमंत्री अमित शहा यांनी शस्त्र हातात असणाऱ्यांसोबत चर्चा बिलकुल होणार नाही, जे आत्मसमर्पण करतील त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यास मदत केली जाईल अन्यथा सुरक्षा दलांच्या कारवाईला सामोरे जावे लागेल, असे ठणकावून सांगत प्रस्ताव नाकारत कठोर इशारा दिला होता.



वैभव बावनकर
नागपूर.
9545745580

गृह मंत्रालयाने २०२४ मध्ये ऑपरेशन कागर (ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट) सुरू केले. यात शरणागती किंवा मृत्यू या धोरणानुसार नक्षलवादाचे संपूर्ण निर्मूलन करण्याची योजना योजली आहे, ऑपरेशनमध्ये सुरक्षा दलांनी नक्षल नेत्यांची ठिकाणे उद्ध्वस्त करणे, शस्त्रसाठे आणि आयईडी युनिट्स नष्ट करणे, तसेच कट्टर माओवादी नेत्यांचा खात्मा करण्यावर या अभियानात भर देण्यात आला.

परिणामी, एकेकाळी देशभर पसरलेला नक्षलवाद आता दंडकारण्यातील मोजक्या ठिकाणापुरता सीमित झाला आहे.गेल्या पाच वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यातील एकही तरुण नक्षलवाद्यांसोबत सामील झाला नाही हे विशेष. २०१४ पासून आतापर्यंत १०,००० हून अधिक नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली आहे. मागील दीड वर्षात १६३६ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. २०२५ मध्येच १००० हून अधिक शरणागती घडल्या. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्रातील गडचिरोलीत माओवादी चळवळीचा सूत्रधार आणि प्रवक्ता मल्लोजुला वेणुगोपाल राव ऊर्फ सोनू उर्फ भूपती याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर ६० जणांसह आत्मसमर्पण केले.

त्याच दिवशी कंकेर जिल्ह्यात ५० आणि सुकम्यात २७ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले.१ कोटींचे बक्षीस असलेला कुख्यात नक्षलवादी हिडमा १८ नोव्हेंबर रोजी आंध्र प्रदेशातील एलुरु सीताराम राजू जिल्ह्यात सुरक्षा दलांनी केलेल्या चकमकीत मारला गेला. तो अडीच दशकांपासून छत्तीसगडमधील बस्तरमध्ये सक्रिय होता. बरं ज्या हिडमा बद्दल दिल्ली मध्ये जय जय काराचे नारे लावण्यात आले तो काही खूप थोर व्यक्तिमत्व नव्हताच.

तो नक्षलवाद्यांचा कुख्यात नक्षलवादी कमांडर! ज्याने हिंसात्मक व संविधान विरोधी मार्गाने हजारो आदिवासी नागरिकांना व सुरक्षारक्षकांना ठार करून कित्येक वर्ष दहशत निर्माण केली. गरीब आदिवासी समाजापर्यंत विकास पोहोचू दिला नाही. हिडमा हा सुमारे २६ मोठ्या हल्ल्यांसाठी जबाबदार होता.

गेल्या ३४ वर्षांत त्याच्यावर ३६७ खूनांचे आरोप होते, ज्यात सुमारे २६० सुरक्षा कर्मचारी आणि १०७ नागरिकांचा समावेश होता. त्याच्या प्रमुख हल्ल्यांमध्ये २०१० चा दंतेवाडा हल्ला होता, ज्यामध्ये ७६ सीआरपीएफ जवान शहीद झाले होते. हिडमाने छत्तीसगडमधील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या नक्षलवादी हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली होती.

ज्या कुख्यात हिडमा बद्दल दिल्लीमध्ये अमर रहे च्या घोषणा देण्यात आल्या जल जमीन आणि जंगल चा रक्षणकर्ता म्हणून मिरवण्यात आले त्या हिडमा च्या एन्काऊंटरनंतर तेथील स्थानिक सामान्य ग्रामीण जनतेने फटाके फोडून आनंद व्यक्त केला.

त्यावेळी नागरिकांनी नक्षलवाद मुर्दाबादच्या घोषणा देत फटाके फोडले. नक्षलवाद्यांचा सर्वात धोकादायक आणि अत्यंत क्रूर कमांडरचा खात्मा होताच छत्तीसगडमधील गावोगावी नागरिकांनी समाधान व्यक्त केला.

अश्या या क्रूर कमांडरचा खात्मा झाल्याने स्थानिक पीडित जनतेने सुटकेचा निःश्वास सोडला असतांना हजारो किलोमीटर वर असणाऱ्या सो कॉल्ड बुद्धीजीवींनी अशा संविधान विरोधी व देश विरोधी, हिंसक मार्ग अवलंबणाऱ्या नक्षलवाद्यांच्या समर्थनार्थ दिल्लीमध्ये घोषणा देणे म्हणजेच प्रदूषण विरोधी आंदोलनाच्या आडून देश विरोधी अजेंडा चालवणे हा स्पष्ट उद्देश दिसून येतो आहे, अश्यांना ठेचूनच काढायला हवे.

■ ■ ■

# घुसखोरांनी घेतला एसआयआरचा धसका!

पश्चिम बंगालमध्ये सध्या विशेष सखोल फेरतपासणी ( एसआयआर ) मोहीम सुरू आहे. या मोहिमेचा धसका घेतलेले काही बांगलादेशी घुसखोर आपल्या देशात परत जाण्यासाठी, भारत - बांगलादेश सीमेवर गर्दी करत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. अर्थात ही तर सुरुवात आहे.जसजशी विशेष सखोल फेरतपासणी मोहीम पुढे जात राहिल,तसं तशी बांगलादेशमध्ये परत जाणाऱ्या घुसखोरांची संख्या वाढत जाईल.

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेत अनेक अडचणी येत आहेत.ही मोहीम राबवणारे कर्मचारी हे राज्य सरकारचे (पश्चिम बंगाल सरकारचे) कर्मचारी असल्याने, त्यांच्यावर ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून, निरनिराळ्या बाबतीत दबाव येत असल्याचे बोलले जात आहे. विशेषतः बुथ लेव्हल ऑफिसर्सवर राज्य सरकारकडून दबाव येत असल्याची चर्चा आहे.

विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेत, हजारो बांगलादेशी घुसखोरांची नावे वगळली जाण्याची शक्यता असल्याने, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या अतिशय अस्वस्थ झाल्या आहेत.

बांगलादेशी घुसखोर हे ममता बॅनर्जी यांची व्होट बँक असल्याने, त्यांची नावे मतदार यादीतून मोठ्या प्रमाणात वगळली गेल्यास, पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत, त्याचा फटका तृणमूल काँग्रेसला बसण्याची शक्यता आहे.




त्यामुळेच या मोहिमेला ममता बॅनर्जी यांनी सुरुवाती पासूनच विरोध केला आहे. निवडणूक आयोगाकडून मतदार याद्यांची छाननी सुरू असताना बऱ्याच आश्चर्यकारक गोष्टी बाहेर येत आहेत.

मतदार याद्यांची छाननी करत असताना निवडणुक आयोगाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या लक्षात आलेली सर्वात मोठी गोष्ट म्हणजे, या याद्यांमध्ये मृत व्यक्तिंची नावे मोठ्या प्रमाणात आढळून आली आहेत. या मृत व्यक्तिंची संख्या ४० लाखांच्या आसपास असल्याचा अंदाज, ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला आहे.



अभय गोखले

पूर्वार्ध

याचाच अर्थ अस्तित्वात असलेल्या मतदार याद्या मोठ्या प्रमाणात सदोष आहेत.बुथ लेव्हल ऑफिसर्सनी जेंव्हा जनगणना फॉर्म्सचे वाटप केले तेव्हा, त्यांना ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली की अस्तित्वात असलेल्या मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मृत मतदारांच्या नावांचा समावेश आहे.

खरे पाहता मतदार याद्यांची समरी रिव्हिजन दरवर्षी केली जाते. परंतु सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार याद्यांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात मृत मतदारांची नावे आढळून आल्याने, पश्चिम बंगालमध्ये दरवर्षी जी मतदार याद्यांची समरी रिव्हिजन घेतली गेली, ती व्यवस्थितपणे घेतली गेलेली दिसत नाही.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे जनगणना फॉर्म्सचे वाटप करताना बुथ लेव्हल ऑफिसर्सच्या ही गोष्ट लक्षात आली की मतदार यादीमध्ये प्रत्येक बुथवर ५० ते १०० मृत मतदारांच्या नावांचा समावेश आहे. त्यामुळे ही नावे मतदार यादीतून ताबडतोब वगळण्याची सूचना, निवडणुक आयोगाकडून, बुथ लेव्हल ऑफिसर्सना देण्यात आली.

आपले राहण्याचे ठिकाण कायमचे सोडून गेलेल्या मतदारांची नावे, सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आली आहेत. ही नावे मतदार याद्यांमधून ताबडतोब वगळावी लागतील.एकंदरीत सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार याद्या मोठ्या प्रमाणात सदोष असल्याचे निवडणुक आयोगाच्या लक्षात आले आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मृत आणि आपले राहण्याचे ठिकाण कायमचे सोडून गेलेल्या मतदारांची नावे आढळून आल्याने, विरोधी पक्षांच्या या दाव्याला पुष्टी मिळू शकेल. विरोधी पक्षांनी असा दावा केला होता की वरील मतदारांची नावे वापरून, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसकडून प्रॉक्सी व्होटिंग केले जात होते.

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

## वाचक लिहितात

### सनबर्न फेस्टिवल मुंबईत होणे अयोग्य!

आज देशाचे भविष्य असलेली युवा पिढी नशेच्या संकटामध्ये सापडलेली आहे. त्यातच अमली पदार्थांचे भयंकर संकट युवा पिढी समोर आहे, नव्हे ते प्रत्येकासमोरच आहे. कारण एका नशेच्या आहारी गेलेल्या व्यसनी युवकामुळे संपूर्ण कुटुंबावर दुःखाची सावली पडते. मुंबईमध्ये १९ ते २१ डिसेंबर २०२५ या काळात सन बर्न फेस्टिवल होणार आहे.

या सनबर्नमुळे विदेशी संगीत, पॉप गायक, इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिक फेस्टिवल; याच्या नावाखाली अमली पदार्थांचा सर्रास वापर होतो. अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे कितीतरी तरुण मृत पावल्याचे आपल्याला माहितही आहे! तरुणांना नशेमध्ये ओढणाऱ्या या अतिशय वाईट विकृतीला मुंबापुरीत किंवा आपल्या सर्व पवित्र भारतभूमीतच काही स्थान असू नये!

■ सौ. आदिती देखणे, नवीन पनवेल.

### संविधान अंमलात यायला हवे!

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाला दिलेले संविधान म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या न्यायहक्काचे, अधिकाराचे कवच कुंडल आहे. संविधानाने प्रत्येक नागरिक समान आहे. परंतु, प्रत्यक्षात स्थिती अगदीच विपरीत दिसून येते. पदोपदी संविधानाचा अपमान आणि कुचेष्टा होत आहे. देशात महिलांवरील अत्याचारात कमालीची वाढ झाली आहे, भ्रष्ट राजकारणी देशाला लुटून खात आहेत, भ्रष्टाचार कमालीचा वाढला आहे, सर्वसामान्य लोकांना न्याय मिळेनासा झाला आहे. संविधानानुसार सर्व नागरिकांनी समान हक्क व न्याय मिळणे अपेक्षित असताना संविधानातील मुल्ये पायदळी तुडवली जात असल्याचे दिसते. यासाठी संसद आणि विधीमंडळात बसणारे लोकप्रतिनिधी आणि ब्युरोक्रेट्स जबाबदार आहेत. संविधानाच्या विरूद्ध अनेकदा काम होताना दिसते. संविधानाचे अवमुल्यन या देशाला रसातळाला घेवून जाईल.

■ श्रीकांत डेकाटे, नागपूर.

# तुम्हीही रोज मोमोज खाता?



आजकाल प्रत्येकजण बाहेरील जंकफूड जास्त प्रमाणात सेवन करतात. रस्त्याच्या कडेला अनेक फास्टफुडच्या गाड्या लागलेल्या असतात. त्यातील एक म्हणजे मोमोज. मोमोज हा इतका लोकप्रिय पदार्थ झाला आहे की मोमोज स्टॉल्समधून येणाऱ्या वाफेने आणि मसालेदार सुगंधाने अनेक तरूण पिढी मोहित होत आहे. हा छोटा, स्वस्त आणि स्वादिष्ट नेपाळी नाश्ता भारताच्या शहरी भागांचा अविभाज्य भाग बनला आहे.

मोमो स्टॉल्सच्या बाहेर तुम्हाला दररोज लोकांची गर्दी दिसेल. बरेच लोकं मोमोजचे इतके वेडे असतात की ते ते जवळजवळ दररोज खातात. पण दररोज मोमोज खाण्याच्या सवयीचा तुमच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो?

**पोटदुखी आणि पौष्टिक कमतरता :** मोमोजचा बाहेरील थर बहुतेकदा रिफाइंड मैद्याचा बनलेला असतो, ज्यामध्ये फारसे फायबर नसते. फायबरच्या कमतरतेमुळे अन्न आतड्यांमधून हळूहळू जाऊ शकते, ज्यामुळे बद्धकोष्ठता, अपचन आणि पोटफुगी होऊ शकते.

याव्यतिरिक्त, मोमोज हे प्रामुख्याने कार्बोहायड्रेट्स असले तरी, त्यात आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे आणि प्रथिने नसतात. म्हणून, दररोज मोमोज खाल्ल्याने तुम्हाला भरपूर कॅलरीज मिळतात परंतु तुमच्या शरीराला आवश्यक असलेले पोषक तत्व मिळत नाहीत, ज्यामुळे पौष्टिक असंतुलन होऊ शकते.

मोमोजसोबत वाढलेली चटणी ही एक मोठी चिंता आहे. या चटणीमध्ये अनेकदा मीठ आणि अस्वास्थ्यकर फॅटचे प्रमाण जास्त असते. जास्त सोडियममुळे पोटात पाणी साचू शकते आणि पचनसंस्थेवर ताण येऊ शकतो, तसेच यामुळे रक्तदाब वाढू शकतो.

**लठ्ठपणा आणि गंभीर आजारांचा धोका :** दररोज मोमोज खाण्याची सवय दीर्घकाळ राहिली तर त्याचे परिणाम आणखी गंभीर होऊ शकतात.

**वजन वाढणे :** मोमोजमध्ये रिकाम्या कॅलरीज असतात म्हणजेच अशा कॅलरीज असतात ज्या पोषण देत नाहीत. दररोज अतिरिक्त कॅलरीज घेतल्याने अगदी थोड्या प्रमाणात सर्व्हिंग करूनही, हळूहळू वजन वाढू शकते.

**रक्तातील साखरेचे चढउतार :** रिफाइंड पीठ हे एक रिफाइंड कार्बोहायड्रेट आहे जे शरीरात वेगाने साखरेत मोडते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते आणि नंतर वेगाने कमी होऊ शकते. कालांतराने या वारंवार होणाऱ्या चढउतारांमुळे शरीराची इन्सुलिन संवेदनशीलता कमी होऊ शकते, ज्यामुळे टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

**हृदयाच्या आरोग्यावर परिणाम :** जर मोमोज तळलेले असतील किंवा मोमोजच्या या आतील फिलिंग्स मध्ये ट्रान्स फॅट्स असतील तर ते शरीरात खराब कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवू शकतात. जे हृदयरोगाचे एक प्रमुख कारण आहे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### लोकशाहीचे दुर्दैव..!

ही लोकशाही व्हय की
घराणेशाही?
जो तो सुपुत्राला
प्रेझेंट करतोय
हाय की नाय नवलाई?

सुज्ञ मतदारांनो
कधी कराल ईचार
नाय तर आयुष्यभर
सतरंज्या उचलायले
रहा तुम्ही तयार . !!

# डीएसपी म्युच्युअल फंडातर्फे गुंतवणूकदारांसाठी चार योजनांचा शुभारंभ

**मुंबई, २६ नोव्हेंबर :** डीएसपी म्युच्युअल फंडाने गुंतवणूकदारांसाठी आज चार नवीन पॅसिव्ह फंड योजना आणल्या आहेत. डीएसपी निफ्टी मिडकॅप १५० इंडेक्स फंड, डीएसपी निफ्टी मिडकॅप १५० ईटीएफ फंड, डीएसपी निफ्टी स्मॉलकॅप २५० इंडेक्स फंड आणि डीएसपी निफ्टी स्मॉलकॅप २५० ईटीएफ फंड अशा या चार योजना आहेत.* या नव्या योजनांच्या शुभारंभामुळे पॅसिव्ह अर्थात अप्रत्यक्ष गुंतवणूक प्रकारात डीएसपीच्या गुंतवणूक योजनांचे विश्व आणखी विस्तारले आहे. मिड-आणि स्मॉल-कॅप गटातील कंपन्यांच्या रुपाने भारतातील उद्योगविश्वाचे व्यापक स्वरुपात चित्र उलगडते, तसेच गतिमान कॉर्पोरेट विश्वाचे ते एकत्रित प्रतिनिधित्वही करतात. त्यामुळे या फंडांच्या रुपाने मिड-आणि स्मॉल-कॅप गटातील कंपन्यांमध्ये नियमांवर आधारित निर्देशांकाच्या माध्यमातून अल्प खर्चात गुंतवणूकीची संधी गुंतवणूकदारांना प्राप्त झालेली आहे.

निफ्टी ५०० निर्देशांकातील १०१ ते २५० या क्रमांकादरम्यान असलेल्या कंपन्यांचा निफ्टी मिडकॅप १५० निर्देशांकात समावेश आहे, तर निफ्टी स्मॉलकॅप २५० निर्देशांकात निफ्टी ५०० मधील २५१ ते ५०० क्रमांकादरम्यानच्या कंपन्यांचा समावेश आहे. या दोन्ही निर्देशांकांनी संपुर्ण शेअरबाजाराच्या तुलनेत दीर्घकालात उत्तम परतावा प्रदान केलेला आहे, हे आकडेवारीतून सिध्द झालेले आहे. निर्देशांकाच्या ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंतच्या वाटचालीचे केलेल्या विश्लेषणानुसार गत दहा वर्षांच्या कालावधीत निफ्टी मिडकॅप १५० टीआरआयने निर्देशांकाने सरासरी १६.२ टक्के दराने सरासरी वार्षिक (रोलिंग) परतावा दिला आहे आणि तो निफ्टी ५०० टीआरआयच्या १२.६ टक्क्यांच्या परताव्यापेक्षा खूपच जास्त आहे. स्मॉल-कॅप निर्देशांकाने दीर्घकाळात गुंतवणूकदारांना उत्तम परतावा दिला आहे. निफ्टी ५०० टीआरआयच्या १२.६ टक्क्यांच्या तुलनेत निफ्टी स्मॉलकॅप २५० टीआरआयने दहा वर्षात सरासरी १३.५ टक्क्यांनी रोलिंग परतावा दिलेला आहे. संपुर्ण बाजारासाठीच्या निर्देशांकांच्या तुलनेत दोन्ही निर्देशांकांमध्ये अधिक घसरण होऊ शकते; तथापि, गुंतवणूक धारणेचा कालावधी वाढल्यास दोन्ही निर्देशांकातील नकारात्मक परताव्यांची शक्यता कमी होते**

लार्ज-कॅप कंपन्यांचा फारसा सहभाग नसलेली क्षेत्रे तसेच उद्योग यांचे प्रतिनिधीत्व प्रामुख्याने हे दोन्ही निर्देशांक करतात. स्मॉलकॅप २५० निर्देशांकात मुख्यतः भांडवली बाजार, औद्योगिक उत्पादने, आरोग्यसेवा उपकरणे, बांधकाम साहित्य, कापड आणि इतर विशिष्ट विभागांतील कंपन्यांना स्थान देण्यात आलेले आहे. हे निर्देशांक या अनेक विभागातील आघाडीच्या कंपन्यांचे प्रतिनिधीत्व करतात. आघाडीच्या २५० कंपन्यांव्यतिरिक्त झपाट्याने उदयास येत असलेल्या कंपन्यांचे विश्व किती विस्तृत आहे, ही बाब हा निर्देशांक अधोरेखित करतो. तर, मिडकॅप १५० हा निर्देशांक एकूण स्मॉल-कॅप विश्वाच्या तुलनेत याच विश्वातील आघाडीच्या दिडशे कंपन्यांच्या रुपाने कमाईच्या बाबतीत अधिक स्थिर चित्र गुंतवणूकदारांना प्रदान करतो. तसेच बाजारात व्यापक प्रमाणात गुंतवणूकीमध्ये लक्षणीय प्रमाणात असलेल्या संधी दर्शवितो.

अँक्टीव्ह गटातील फंडांच्या गुंतवणूकीच्या पध्दतीचा विचार करता हे दोन्ही निर्देशांक आपापल्या गटातील कंपन्यांवरच केंद्रीत झालेले असल्याने गुंतवणूकीत भौतिकदृष्ट्या भिन्नता मिळते आणि गुंतवणूकीत सरमिसळ टाळतात. मिडकॅप १५० निर्देशांकाची अँक्टीव्ह स्वरुपातील फंडांशी गुंतवणूकीत फक्त ३२ टक्के सरमिसळ झालेली आहे, तर स्मॉलकॅप २५० निर्देशांकामध्ये अँक्टीव्ह स्मॉलकॅप फंडांच्या पोर्टफोलिओसह १८ टक्के सरमिसळ झालेली आहे. या भिन्न संरचनेमुळे निर्देशांक-आधारित गुंतवणूक अँक्टीव्ह फंडाच्या गुंतवणूक धोरणांसोबत पूरक त्याचबरोबर वैविध्यपूर्ण आणि विशिष्ट (बिल्डिंग ब्लॉक) अशी गुंतवणूक म्हणून काम करू शकते, ही हमी मिळते.

# एशियन पेंट्सची भारतीय क्रिकेटचा अधिकृत रंग भागीदार म्हणून बीसीसीआयशी भागीदारी



**मुंबई, २६ नोव्हेंबर :** देशभरात क्रिकेटचे आकर्षण सर्वोच्च स्तरावर असताना, भारतातील आघाडीचा रंग आणि डेकोर ब्रँड असलेल्या एशियन पेंट्सला भारतीय क्रिकेट नियामक मंडळा (बीसीसीआय) सोबत भारतीय क्रिकेटसाठी अधिकृत रंग भागीदार या नात्याने भागीदारीची घोषणा करताना अभिमान वाटतो. तीन वर्षांच्या या सहभागात भारतात खेळल्या जाणाऱ्या सर्व पुरुष, महिला आणि देशांतर्गत, ११० पेक्षा अधिक सामन्यांची व्याप्ती असणाऱ्या मालिका समाविष्ट असतील. हा सहभाग एशियन पेंट्सचा क्रिकेटशी असलेला संबंध अधिक मजबूत करतो आणि क्रिकेटमधील प्रत्येक रंगाच्या १.४ अब्ज हृदयांना एकत्र आणतो.

भारतीय घरांमध्ये रंग, सर्जनशीलता आणि भावना अनेक दशकांपासून साजरे करणारा ब्रँड या नात्याने, एशियन पेंट्सने आता देशातील सर्वात मोठे आकर्षण - क्रिकेट क्षेत्रात आपली चैतन्यशील उपस्थिती विस्तारली आहे. हा मोठ्या प्रभावाचा सहभाग प्रेरणा आणि अभिव्यक्तीच्या पारस्पारिक भावनेवर आधारित आहे जो भारतातील चाहत्यांना एकत्र करत, रंग आणि क्रिकेटमध्ये नाते जोडतो. धाडसी निर्णय ते चैतन्यमय अभिव्यक्तींपर्यंत, एशियन पेंट्स आणि भारतीय क्रिकेट हे दोन्हीही खरे नेतृत्व कसे असते ते प्रदर्शित करतात. यामुळे अब्जावधी हृदयांना जोडणाऱ्या रंगांचा उत्सव साजरा करणारी एक सशक्त भागीदारी सजीव होते!

या भागीदारीबद्दल बोलताना, एशियन पेंट्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री. अमित सिंगल म्हणाले, क्रिकेट अब्जावधी हृदयांना एकत्र आणते आणि ती आसक्ती सजीव करणाऱ्या व्यासपीठावर बीसीसीआयसोबत भागीदारी करण्यास आम्हाला खूप आनंद होत आहे. एशियन पेंट्समध्ये, आम्ही नेहमीच लोकांचे जीवन, अनुभव आणि अभिव्यक्ती यावर रंगाच्या सामर्थ्याच्या प्रभावावर विश्वास ठेवला आहे आणि हा सहभाग त्या विश्वासाला बळकटी देतो. बीसीसीआयसोबतच्या आमच्या भागीदारीद्वारे एका रोमांचक नवीन अध्यायाची सुरुवात झाली आहे - जिथे आम्ही भारतास सर्वात जास्त आवडणाऱ्या खेळाच्या गाभ्यात रंगाचे विश्व निर्माण करतो. अधिकृत रंग भागीदार या नात्याने, आम्ही चाहते आणि ग्राहकांशी अर्थपूर्ण मार्गांनी सहभाग साधण्यास, क्रिकेटचे चैतन्य आणि ऊर्जा साजरी करण्यास आणि खेळाच्या प्रत्येक क्षणात अधिक थरार आणि आनंद जोडण्यास उत्सुक आहोत. एशियन पेंट्समध्ये, घरे केवळ वास्तव्याच्या जागा नसून त्यात १.४ अब्ज स्वप्ने एकच बनतात असा आमचा विश्वास आहे. या सामूहिक उत्कटतेमध्ये, आपल्याला रंगाचा खरा उद्देश = नातेसंबंध जोडणे, हा दिसतो. आमच्याकडे अनेक मनोरंजक एकीकरणे आहेत जी या क्रिकेटशी सर्वात रंगीत नातेसंबंध जुळवतील.

बीसीसीआयचे प्रवक्ता, श्री. देवजित सैकिया पुढे म्हणाले, भारतीय क्रिकेटचा अधिकृत रंग भागीदार म्हणून एशियन पेंट्सचे स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. लोकांच्या जीवनात रंग आणि भावना जोडण्याचा एशियन पेंट्सचा वारसा भारतीय क्रिकेटच्या भावनेला पूर्णतः पूरक आहे. एकत्रितपणे, आम्ही देशभरातील चाहत्यांसाठी संस्मरणीय अनुभव निर्माण करण्यास उत्सुक आहोत

आठ दशकांहून अधिक काळ, एशियन पेंट्स म्हणजे हे भारतातील रंग नेतृत्व आणि डिझाइन नवोपक्रमाचे असे मानले जाते. या भागीदारीतून, ब्रँडचे उद्दिष्ट क्रिकेट आणि त्यापलीकडे असलेल्या अब्जावधी भारतीयांशी भावनिक संबंध अधिक दृढ करणे हे आहे - म्हणजेच क्रिकेट प्रेरणा देणाऱ्या उत्कटतेच्या छटा, सर्जनशीलता आणि एकतेचे रंग साजरे करणे.

# फ्लेव्हर्ड मिल्क पश्चिम भारतात बनले आहे रोजच्या दिवसाचा दुग्धआहार

**मुंबई, २६ नोव्हेंबर :** गोदरेज जर्सी यांनी गोदरेज जर्सी इंडिया लॅक्टोग्राफ फाइंडिंग्ज आर्थिक वर्ष २५२६चे अनावरण केले आहे. हा अभ्यास देशभरातील दुधाच्या सेवनाच्या पद्धती, प्रसंग आणि प्रेरणा कशा बदलत आहेत याची निरीक्षणे नोंदवतो. हे संशोधन आठ प्रमुख शहरांमध्ये करण्यात आले असून दुधाचे दैनंदिन जीवनातील स्थान आणि नव्या जीवनशैलींनुसार होत असलेल्या बदलांचा मागोवा घेण्यात आला.

पश्चिम भारतातील निष्कर्ष देशातील इतर भागांपेक्षा वेगळा कल दाखवतात. फ्लेव्हर्ड मिल्क येथे रोजच्या दूध पिण्याच्या सवयीचा एक भाग बनले आहे. पश्चिम भागातील ८१% प्रतिसादकर्त्यांनी ते बहुतेक वेळा फ्लेव्हर्ड मिल्क पितात असे सांगितले आणि हा आकडा भारतात सर्वाधिक आहे. इतर प्रदेशांमध्ये फ्लेव्हर्ड मिल्क विशिष्ट प्रसंगी (पूर्व), ऋतूनुसार (उत्तर) किंवा कम्फर्ट इंडल्जन्स (दक्षिण) नुसार प्यायले जाते; मात्र पश्चिम भारतात नॉस्टॅल्जिया किंवा आठवणींपेक्षा वेगळ्या प्रेरणेने चवीने आणि पसंतीमुळे दैनंदिन डेअरी सेवनाचा भाग म्हणून स्वीकारले जात आहे.

पश्चिम भागामधील ग्राहक नव्या पिढीच्या एनर्जायझिंग स्वरूपातील पेयांकडेही सर्वाधिक आकर्षित असल्याचे दिसते: ६२% प्रतिसादकर्ते एनर्जायझिंग ड्रिंक म्हणून प्रोटीन शेक्स निवडतात आणि आणखी ६२% स्मूदीजना पसंती देतात. हे दोन्ही आकडे राष्ट्रीय पातळीवर सर्वाधिक आहेत. यासोबतच आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण वर्तन आढळले: पश्चिम भागामध्ये ५९% लोक ते दुधाकडे जेवणासाठीचा झटपट पर्याय म्हणून बघतात. हा आकडा इतर प्रदेशांच्या तुलनेत फार पुढे आहे. त्यायोगे दुधाला सर्वाधिक पसंतीचे आणि फिटनेस-ओरिएंटेड जीवनशैलीत योग्य पोषण म्हणून स्थान प्राप्त झाले आहे.

या निष्कर्षांवर भाष्य करताना गोदरेज जर्सीचे मार्केटिंग प्रमुख शंतनू राज म्हणाले, हा अभ्यास स्पष्टपणे दर्शवतो की दूध आपल्या जेवणातून निघून गेलेले नाही, ते फक्त वेगवेगळे रूप बदलून येत आहे. या माहितीतून दुधाबाबत जपली गेलेली परंपरा आणि बदलते प्रवाह सगळे समोर येत आहे. ६७% भारतीय अजूनही चहा या माध्यमातूनच दूध सर्वाधिक पितात. त्यातून दुधाशी जोडलेल्या आपल्या खोल सांस्कृतिक मुळांची पुष्टी होते; तर ४४% लोक आता प्रोटीन शेक्सद्वारे दूध आपल्या दिवसाच्या आहारात आणतात. फिटनेस प्रणीत एका नव्या जीवनशैलीची ही रीत आहे. गोदरेज जर्सीसारख्या ब्रँडसाठी ही गोष्ट जबाबदारी आणि संधी असे दोन्ही आहे. ग्राहकांना चव, सोय आणि पोषण यापैकी कुठल्याही बाबतीत तडजोड करावी लागू नये हे सुनिश्चित करणे हे आमचे ध्येय आहे.

पेयांपलीकडेही, डेअरी अजूनही देशभरातील घरांमध्ये मुख्य घटक म्हणून उपस्थित आहे. दही (८०%), पनीर (७६%) आणि बटर (७४%) जेवणाचा आधार आहेत. लॅक्टोग्राफ आर्थिक वर्ष २५२६ निष्कर्षांसह, गोदरेज जर्सी विश्वसनीय गुणवत्ता, पोषण-केंद्रित नवकल्पना आणि बदलत्या जीवनशैलींसाठी डिझाइन केलेल्या उत्पादनांद्वारे दुग्धउत्पादनांच्या भविष्यात सकारात्मक बदल घडवण्याच्या बांधिलकीला पुन्हा मजबूत करते.

# आयक्यू १५ लाँच: अँड्रॉइडचा नेक्स्ट-लेव्हल फ्लॅगशिप स्मार्टफोन



**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर :** उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आयक्यू ने आज या वर्षासाठी त्यांचा प्रीमियम फ्लॅगशिप स्मार्टफोन, आयक्यू १५ लाँच केला. उत्कृष्ट हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर वैशिष्ट्यांसह सुसज्ज, आयक्यू १५ हा एक शक्तिशाली फोन आहे जो विशेषतः तरुण व्यावसायिकांसाठी डिझाइन केलेला आहे जे त्यांच्या स्मार्टफोनकडून अधिक अपेक्षा करतात - मग ते कामासाठी असो, सामाजिकीकरणासाठी असो किंवा मनोरंजनासाठी असो.

भारतातील फ्लॅगशिप स्मार्टफोनसाठी मानक वाढवत, आयक्यू १५ मध्ये उद्योगातील सर्वोत्तम सॅमसंग २के एम१४ एलईडी ओएलईडी डिस्प्ले आहे, जो अँड्रॉइड स्मार्टफोनसाठी पहिला आहे. हा फोन भारतातील सर्वात तेजस्वी डिस्प्ले - २६०० निट्स (एचबीएम) आणि ६००० निट्स स्थानिक पीक ब्राइटनेस प्रदान करतो, जो घराबाहेर असो किंवा बाहेर, क्रिस्टल-क्लिअर आणि ब्राइट स्क्रीन रिझोल्यूशन सुनिश्चित करतो. भारतातील सर्वात वेगवान स्नॅपड्रॅगन ८ एलिट जेन ५ प्रोसेसर आणि आयक्यू च्या मालकीच्या सुपरकॉम्प्युटिंग चिप क्यू३ द्वारे समर्थित, ते अविश्वसनीय गती आणि कार्यक्षमता प्रदान करते. यात भारतातील सर्वात मोठी ८के सिंगल-लेयर व्हीसी कूलिंग सिस्टम देखील आहे, जी जास्त वापरात असतानाही फोन थंड ठेवते. आयक्यू १५ हा अँड्रॉइड १६-आधारित ओरिजिनओएस ६ वर चालतो, जो एक गुळगुळीत आणि स्मार्ट सॉफ्टवेअर अनुभव देतो. कॅमेरा सेटअपमध्ये ट्रिपल ५०एमपी कॅमेरा सिस्टम समाविष्ट आहे, ज्यामध्ये मोठा ५०एमपी सोनी आयएमएक्स९२१ व्हीसीएस मुख्य सेन्सर, ५०एमपी अल्ट्रा-वाइड लेन्स आणि फ्लॅगशिप ५०एमपी ३एक्स टेलिफोटो पेरिस्कोप कॅमेरा आहे, जो प्रत्येक क्षणाचे तपशीलवार कॅप्चर करण्यास अनुमती देतो. संपूर्ण दिवसाच्या कामगिरीसाठी, ते १००वॅट्स फ्लॅशचार्जसाठी सपोर्ट असलेली ७०००एमएएच सिलिकॉन एनोड बॅटरी आणि आयक्यू फ्लॅगशिपमध्ये प्रथमच ४०वॅट्स वायरलेस चार्जिंगद्वारे समर्थित आहे, जे ते प्रवासी व्यावसायिकांसाठी एक विश्वासार्ह साथीदार बनवते. आयक्यू १५ ची किंमत १२जीबी + २५६जीबी व्हेरिएंटसाठी ७२,९९९ (निव्वळ प्रभावी किंमत: ६४,९९९) आणि १६जीबी + ५१२जीबी व्हेरिएंटसाठी ७९,९९९ (निव्वळ प्रभावी किंमत: ७१,९९९) आहे. प्री-बुकिंग रिडेम्पशन २७ नोव्हेंबर दुपारी १२ ते २८ नोव्हेंबर पर्यंत उपलब्ध असेल. आयक्यू १५ ची विक्री एक्सएक्स वरून अमेझॉन.ईन आणि आयक्यू ई-स्टोअरवर होईल.

नवीन प्रीमियम फ्लॅगशिप आयक्यू १५ बद्दल बोलताना, आयक्यू चे सीईओ निपुण मरिया म्हणाले, आयक्यू १५ हे एक मोठे पाऊल आहे, जे कार्यरत व्यावसायिक आणि तडजोड न करणाऱ्या कामगिरीची अपेक्षा करणाऱ्या वापरकर्त्यांकडून मिळालेल्या खऱ्या ग्राहकांच्या अभिप्रायावर आधारित आहे. प्रत्येक हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर वैशिष्ट्य खरोखर प्रीमियम फ्लॅगशिप अनुभव देण्यासाठी आणि वेग, शक्ती आणि नाविन्यपूर्णतेच्या सीमा ओलांडण्यासाठी विचारपूर्वक डिझाइन केले गेले आहे - आयक्यू ला नेहमीच परिभाषित करणारे मूल्ये. आम्हाला विश्वास आहे की वापरकर्त्यांना आयक्यू १५ खरोखर प्रीमियम फ्लॅगशिप अनुभव मिळेल. त्यांना ते एक संपूर्ण पॅकेज म्हणून दिसेल, जे त्यांच्या वेगवान, आधुनिक जीवनशैलीला सहजतेने आधार देण्यासाठी डिझाइन केलेले आहे.



# एण्डटीव्हीच्या अभिनेत्रींचे हिवाळी फॅशन टिप्स आणि आवडते वॉर्डरोब स्टेपल्स

मुंबई, २६ नोव्हेंबर : हिवाळ्याची चाहूल लागताच उबदार आणि स्टायलिश लूकला प्राधान्य दिले जाते. एण्डटीव्हीवरील लोकप्रिय अभिनेत्री सीरत कपूर, सोनल पनवार आणि शुभांगी अत्रे यांनी त्यांच्या हिवाळ्यातील आवडत्या फॅशन टिप्स शेअर केल्या आहेत. घरवाली पेडवालीची सावी साकारणारी सीरत कपूर हिवाळी फॅशनला उबदार आलिंगन मानत असून तिला सॉफ्ट निट्स, लाँग कोट्स, टर्टलनेक आणि हाई बूट्स आवडतात.

हप्पू की उलटन पलटनची मलायका, सोनल पनवारला लेयरिंग अधिक प्रिय असून दिवसा स्वेटशर्ट आणि जॉगर तर संध्याकाळी क्रॉप स्वेटर, हाय-वेस्ट ट्राऊझर आणि लाँगलाइन कोट आवडतो. ब्लॅक लेदर जॅकेट तिचा फॅशन फेव्हरेट आहे.

भाबीजी घर पर हैतील अंगूरी भाबी, शुभांगी अत्रे यांना पेस्टल स्वेटर्स, हाताने विणलेल्या शाली आणि पश्मीना पसंत आहेत. पारंपरिक लूकसाठी त्या साडीसोबत टर्टलनेक परिधान करतात.

# कंतारच्या २०२५ मध्ये एचडीएफसी बँक ठरली १ल्या क्रमांकाची संस्था

**मुंबई, २६ नोव्हेंबर :** एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकेला देशातील सर्वाधिकि मुल्यवान ब्रॅन्ड म्हणून कंतार ब्रॅन्डझ टॉप १०० मोस्ट व्हॅल्युएबल इंडयिन ब्रॅन्ड्स रिपोर्ट मध्ये मानांकन प्राप्त झाले आहे. हे मुल्यांकन बँकेच्या डिजिटल नाविन्य आणि ग्राहकाभमिुख अशा योजनां वषियीच्या वचनबध्दते मुळे प्राप्त झाले आहे.

एचडीएफसी बँकेची ब्रॅन्ड व्हॅल्यू ही २०२४ मध्ये ३८.३ बिलियन डॉलर्स होती ती १८ टक्क्यांनी वाढून ४४.९ बिलयिन डॉलर्सवर पोहोचली आहे. २०१४ मध्ये पहिल्यांदा प्रकाशति करण्यात आलेल्या ब्रॅन्ड्स इंडिया रिपोर्ट च्या तुलनेत ३७७ टक्के इतकी आहे. बँकेला हे पहिल्या क्रमांकाचे मुल्यांकन १२ वर्षांपासून सातत्याने सुरु असलेल्या रिपोर्ट्स पैकी ८ वेळा मिळाले आहे.

कंतारच्या संपादकीय लेखात ते नमूद करतात एचडीएफसी बँकेची वाढ ही सातत्यपूर्ण नाविन्य आणि नवीन तंत्रज्ञानात गुंतवणूक करुन ग्राहकांचा अनुभव समृध्द केल्याने झाली असून यामध्ये व्हजिलि आंटी सारख्या सुपर हिरो स्टाईल व्यक्तीमत्वाचा समावेश आहे, ही व्यक्ती वापरकर्त्यांना वित्तीय फसवणूकीपासून बचाव करण्यासाठी प्रशक्षिति करते. डिजिटल बँकिंग ला वाहून घेतल्यामुळे एचडीएफसी बँक सातत्याने भारतातील ब्रॅन्ड लीडरशपि साठी नवनवीन उच्च स्तर निर्माण करते.

या रँकिंग विषयी बोलतांना एचडीएफसी बँकेचे ग्रुप हेड (ब्रॅन्ड,रिटेल मार्केटिंग न्ड कस्टमर नेलिटिक्स) आणि चीफ मार्केटिंग ऑफसिर श्री रवी संथानम यांनी सांगितले देशातील सर्वोत्कृष्ट ब्रॅन्ड म्हणून मान्यता मिळाल्या बद्दल आम्ही खूपच आनंदी आहोत. आमच्यासाठी आमच्या तत्वांशी खरे राहणे, ग्राहकांच्या समस्या सोडवणे आणि ग्राहकांचा अनुभव समृध्द करुन सुरक्षा आणि विश्वसनीयता निर्माण करणे हा आमचा मंत्र आहे. गेल्या तीन दशकांहून अधकि काळापासून आम्ही ग्राहकांना केंद्रस्थानी ठेऊन त्या सातत्याने बदलणाऱ्या गरजांवर लक्ष केंद्रित करण्यावर मार्गक्रमण केले आहे. आमच्या मोहिमासुध्दा ग्राहकांमध्ये सुरक्षति बँकिंग पध्दतींचा प्रसार आणि जागरुकता यां विषयी तयार केल्या आहेत. या मान्यतेतून बँकेच्या कर्मचाऱ्यांचे कष्ट अधोरेखति होतात.

कंतार ब्रॅन्डझ तर्फे ग्राहकाभमिुख दृष्टकिोनासह आर्थकि मुल्य (ब्रॅन्डच्या मालमत्तेला जोडलेले कॉर्पोरेट उत्पन्न) आणि ब्रॅन्डचे योगदान (मागणीची शक्ती, किंमतीची शक्ती आणि भविष्यातील शक्ती यांचे योगदान) यांचा वापर केला जातो. बँके विषयी माहिती देतांना रिपोर्ट मध्ये हे नमूद करतो एचडीएफसी बँकेने ग्राहकाभमिुख नाविन्यांचा वापर करुन आपले ब्रॅन्ड मुल्य वाढवले आहे. अगदी पेमेंट्स पासून ते पर्सनल बँकिंग ते घर खरेदी पर्यंत, एचडीएफसी बँकेने जीवनातील पैशां विषयीची कामे ही अगदी सोपी करण्यासाठी नवनवीन मार्ग शोधले आहेत. यातील अनेक नाविन्य ही सही आणि ब्रॅन्ड मालमत्तांशी संबंधति आहेत. उदाहरणार्थ बँकिंग करस्पॉन्डट सेंटर्स आणि ई मित्र किऑस्क्स मुळे एचडीएफसी बँकेची सेवा ही ग्रामीण आणि निमशहरी भागात तयार झाली आहेत. जिथे परंपरागत शाखा नसतात.

त्यांच्या डिजिटल एक्सप्रेस कार लोन सेवे मध्ये बाजारपेठेत प्रथमच ३० मिनिटांच्या गॅरंटीने काम होते. आणि ऑनलाईन एचडीएफसीच्या व्हिजिलंट आंटी व्यक्तीमत्वामुळे लोकांना सायबर सुरक्षा आणि सर्वोत्कृष्ट प्रक्रियांची माहिती लोकांना मिळून बँकेच्या सुरक्षा वैशष्ट्यिांची माहिती मिळते. याचा निष्कर्श म्हणजे सक्षम वाढ आणि योग्य लाभ होऊन भारतातील सर्वोत्कृष्ट डिफरंट फायनान्शयिल सर्व्हसिेस ब्रॅन्ड बनणे. असे रिपोर्ट मध्ये पुढे नमूद करण्यात आले.

हा रिपोर्ट वार्षकि असून संपूर्ण भारतातील ग्राहकांच्या संशोधनातून तयार करण्यात आलेला आहे.

## गुरूवार दि. २७ नोव्हेंबर २०२५

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| ३४४ | ४८० | ६९० | ११६ | १६७ | २४९ | १७८ | १२६ |
| २३६ | ५७० | ७८० | २२४ | ३५६ | ४५६ | ३५८ | ३६० |
| १३७ | ६६० | ५०० | ३५० | ४०० | ३३९ | २७७ | ४७८ |
| जोडी | | | | जोडी | | | |
| १० | २० | ५६ | ८६ | ४२ | ५२ | ६१ | ९१ |
| १९ | २९ | ५४ | ८४ | ४० | ५० | ६३ | ९३ |
| १७ | २७ | ५३ | ८३ | ४८ | ५८ | ६७ | ९७ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २७ नोव्हें. २०२५

## गुरूवार दि. २७ नोव्हेंबर २०२५

सर्व बाजार साठी

३५ - ६५ - ७२ - ०२
३९ - ६९ - ७८ - ०८
३८ - ६१ - ७४ - ०५
------------------
१२० - ४६६ - १६० - १४५
३०० - ७९० - ३४० - ३८९
२२९ - २६८ - २५० - ५५०

### सर्व बाजारासाठी

| गुरू. ते शनि. ओपन डे | | | गुरू. ते शनि. ओपन नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| ५८० | ६९० | १६० | ४५५ | ४५७ | १२४ |
| ३३७ **३** | ७८० **५** | २६९ **७** | ६९९ **४** | २५९ **६** | २७८ **७** |
| १२० | ५०० | ३६८ | ७७० | १५० | ४६७ |

| गुरू. ते शनि. क्लोज डे | | | गुरू. ते शनि. क्लोज नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| १११ | १२७ | १८० | १५६ | १६८ | १८९ |
| ३९९ **१** | २८० **०** | ३७९ **९** | ४८० **२** | २४९ **५** | ३७८ **८** |
| २९० | ५६९ | ४५० | ३९० | ३३९ | २२४ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

६ २ ४ ८ ०

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस थोडा गोंधळाचा आणि काळजीपूर्वक निर्णय घेण्याचा असेल. कोणतीही गुंतवणूक करताना किंवा आर्थिक निर्णय घेताना तज्ज्ञांचा सल्ला घेऊन पुढे जा.

**वृषभ :** जर तुम्ही मालमत्ता खरेदी करण्याचा विचार करत असाल तर तुमची ही इच्छा पूर्ण होण्याची दाट शक्यता आहे. भावनात्मक होऊन कोणताही निर्णय न घेता, विचारपूर्वक प्रत्येक पाऊल उचला.

**मिथुन :** तुम्हाला तुमच्या काही महत्त्वाच्या कामांवर किंवा प्रकल्पांवर सखोल चर्चा करावी लागू शकते. तसेच शिष्यवृत्ती मिळण्याची शक्यता आहे. कोणाशीही बोलण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करा.

**कर्क :** आजचा दिवस आनंदाचा आणि उत्साहाचा असेल. नोकरी करणाजया लोकांना त्यांच्या कामात अधिक मेहनत दाखवावी लागेल, तेव्हाच यश मिळेल. तुमचे कोणतेही प्रलंबित काम यशस्वीरित्या पूर्ण होईल.

**सिंह :** तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून एखादी अनपेक्षित भेटवस्तू मिळू शकते. तुम्हाला तुमच्या वाढत्या खर्चाचे योग्य नियोजन करावे लागेल, अन्यथा तुमचे बजेट बिघडू शकते. ताण आता कमी होईल.

**कन्या :** आजचा कठोर परिश्रम आणि प्रयत्नांचा असेल, पण त्याचे फळ गोड मिळेल. विद्यार्थी त्यांच्या कामात आणि अभ्यासात उत्कृष्ट यश मिळाल्याने खूप आनंदी आणि समाधानी असतील.

**तुळ :** तुमच्या आरोग्यात चढ-उतार येण्याची शक्यता आहे, त्यामुळे थकवा जाणवू शकतो. कामाच्या निमित्ताने तुम्हाला घरापासून दूरचा प्रवास करावा लागू शकतो. सरकारी योजनांचा पूर्ण लाभ मिळेल.

**वृश्चिक :** तुमच्या जोडीदाराच्या करिअरमध्ये प्रगती झाल्याचे पाहून तुम्हाला आनंद होईल. जर तुम्ही तुमच्या सासरच्या लोकांकडून आर्थिक मदत (कर्ज) मागितली असेल तर ती तुम्हाला सहज मिळेल.


**धनु :** तुमच्या प्रगतीतील सर्व अडथळे आणि समस्या दूर होतील, शब्दांवर नियंत्रण ठेवा. कामात आणि व्यवसायात सक्रियपणे आणि उत्साहाने सहभागी झाल्यास, ते तुमच्यासाठी खूप चांगले ठरेल.

**मकर :** आजचा दिवस धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचा आणि शांततेचा असेल. तुमचे प्रलंबित असलेले निधी किंवा अडकलेले पैसे तुम्हाला मिळाल्याने खूप आनंद आणि आर्थिक दिलासा मिळेल.

**कुंभ :** तुमच्या पालकांच्या आशीवार्दामुळे आणि सहकायार्मुळे कामे मार्गी लागतील. कुटुंबातील एखाद्या सदस्याला पुरस्कार किंवा मोठा सन्मान मिळाल्याने घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल.

**मीन :** तुम्ही तुमच्या कौटुंबिक जबाबदाजयांमध्ये दुर्लक्ष केले तर कुटुंबातील एखादा सदस्य तुमच्यावर नाराज होऊ शकतो. कोणतीही महत्त्वाची किंवा गुप्त माहिती शेअर करणे टाळा, अन्यथा मोठे नुकसान होऊ शकते.

## शब्दकोडे क्रमांक २२८०



**आडवे शब्द :-**
१) सिंह
४) एक प्रश्नार्थक शब्द
६) अमावस्या
१०) आकाश
११) नरमच्या विरुद्ध
१३) संगीतातील एक राग
१५) गंध
१६) किराणा व्यापारी
१७) बशीचा जोडीदार
१९) फळातील मगज
२०) वस्त्र
२२) टपाल
२४) पृथ्वी
२६) मानाला टोचणारे दुःख
२७) मीठ
३०) मनाची घालमेल, चदफड
३२) पंख
३३) दक्ष
३४) कोलकाताचे विमानतळ
३५) मोठी टोपली
३७) नशीला, कैफी
३९) एकटा
४१) रोग पसरवणारा किटक
४३) मुदतीचा करार
४५) चक्र
४७) उत्तीर्ण (इं.)
४८) दक्षता
५१) श्रीरामाचे राज्य सांभाळणारा
५३) भूषण, चिन्ह, कपाळावरचे चिन्ह
५५) हुक्की
५६) **** विचकट
५८) दिवा
६०) चामखीळ
६२) वर्षाच्या बोलीने नेमलेला शेतमजूर
६४) काळी मैना नावाचे बोरफळ
६६) जेवावयास न मिळाल्याने गेलेला जीव
६८) बसण्याची फळी
६९) आठवण
७२) मोठी उथळ वाटी
७३) अभिनेता
७४) चंद्राची कड
७६) उपविभाग, फांदी
७८) बागवान
७९) हिस्सा, भाग
८०) पुस्तकातील पाठ
८१) बूड

**उभे शब्द :-**
१) अरण्यवास
२) संताप
३) विश्व
५) विहीर
७) धनी
८) पूर्ण ऐक्य, पूर्ण भरती
९) बाज विणण्याची सुती पट्टी
११) दाणेदार
१२) पांढुरका रंग, कडक
१४) उबदार पांघरुण (इं.)
१८) परत
२०) आजच्या आधीचा दिवस
२१) *** बेडकाचे ओरडणे
२३) एक पालेभाजी
२५) रत्नाकर
२६) रंग बदलणारा प्राणी
२८) मधुमक्षिका
२९) रस्ता, पथ
३१) घेर, वेढा
३३) लहान
३६) बारीक मऊ केस
३८) घोडा
४०) भांड्याला पडलेला खड्डा
४१) नमुना
४२) किंमत
४३) यात्रेस जाणे
४४) पोते शिवण्याची सुई
४६) आवरण
४७) बदल
४९) चूकचा विरद्ध
५०) मद्य, शराब
५२) ठराविक पैसे, रक्कम
५४) प्रवासातील टप्पा
५६) शेवट, नाश
५७) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
५९) पुष्कळ
६१) आठवण
६२) विणकर
६३) हक्क सांगणारा, वैरी
६४) कापणे (इं.)
६५) करुणा, कीव
६७) थैलीचा एक प्रकार
६८) शिकार
७०) अवस्था, स्थिती
७१) एक श्वासरोग
७५) निमग्न, रममाण
७७) विशेष

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# निरामय

## वायू प्रदूषण हृदयासाठी धोकादायक



वाढते वायू प्रदूषण हे देश आणि जगाच्या आरोग्यासाठी धोक्याचे बनले आहे. हिवाळ्यात, तापमानात घट, जड हवा आणि जमिनीजवळ धूर आणि धुळीचे कण जमा झाल्यामुळे हवेची गुणवत्ता खराब होते. वाहतूक, फटाके, कारखान्याचा धूर आणि कचरा जाळणे यामुळे ही परिस्थिती आणखी बिकट होते. हवेत असलेले पीएम २.५५ आणि पीएम १० सारखे कण इतके बारीक असतात, की ते श्वासोच्छवासाद्वारे थेट फुफ्फुसांमध्ये आणि रक्तप्रवाहात पोहोचतात.

प्रदूषणाचा थेट हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी प्रणालीवर परिणाम होतो. विषारी कण रक्तवाहिन्यांमध्ये जळजळ वाढवतात. त्यामुळे हृदय पंपिंग कार्यक्षमता कमी होऊ शकते. उच्च रक्तदाब, नाडीची असामान्यता, छातीत घट्टपणा आणि धाप लागणे यासारख्या समस्या नेहमीपेक्षा लवकर उद्भवू शकतात. ब्लॉकेज, अँजायना, एचएफ किंवा ॲरिथमियासारखे आजार असलेल्या लोकांसाठी, वायू प्रदूषणाच्या संपर्कात आल्याने अचानक झटका येण्याचा धोका वाढतो. शिवाय, कमी झोप, वारंवार थकवा, डोकेदुखी आणि चिंता यामुळे हृदयावर ताण येतो. म्हणजे, प्रदूषित हवा केवळ फुफ्फुसांवरच नाही, तर थेट हृदयावरदेखील परिणाम करते.

**हृदयरुग्णांनी काय काळजी घ्यावी?**

* सकाळी आणि संध्याकाळी घरात फिरा. हवेची गुणवत्ता चांगली असेल, तेव्हाच बाहेर पडा.
* एन ९५ आणि एन ९९ मास्क घाला
* जास्त रहदारी असलेल्या ठिकाणी जाणे टाळा
* घरी एअर प्युरिफायर वापरू शकता आणि अधूनमधून खिडक्या उघडून थोडी हवा आत येऊ द्या.
* दररोज तुमच्या रक्तदाब, हृदय गती आणि दैनंदिन भावना/नमुने यांचे निरीक्षण करा.
* छातीवर दाब, जलद हृदयाचे ठोके, अस्वस्थता, घाम येणे, श्वास लागणे किंवा अचानक थकवा जाणवत असेल तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.
* धूम्रपान पूर्णपणे सोडा
* नेहमीच आपत्कालीन औषधे सोबत ठेवा.

आरोग्य धोके
डॉ. गोवर्धन हुसळे



## फॅट्सच्या प्रकारांविषयी...

शरीराला चरबीयुक्त घटकांची आवश्यकता असते. चरबीमध्ये विरघळणारी ए, डी, ई आणि के सारखी जीवनसत्त्वं शोषून घेण्यासाठी चरबी म्हणजे फॅट्स गरजेचे असतात. तसंच चरबीमुळे पोट भरल्यासारखं वाटतं. त्यामुळे आपल्या सर्वांगीण आरोग्यासाठी आरोग्यदायी चरबीयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करायला हवा. चरबीमुळे शरीराला ऊर्जा मिळते. पेशी बळकट करण्यासाठी, रक्ताच्या गुठळ्या होऊ न देण्यासाठी, सांध्याच्या सुरळीत हालाचालीसाठी तसंच दाह कमी करण्यासाठी शरीराला चरबीयुक्त पदार्थांची गरज असते. चरबी वेगवेगळ्या प्रकारची असते. सॅच्युरेटेड फॅट, अनसॅच्युरेटेड फॅट आणि ट्रान्स फॅट्स हे चरबीचे तीन प्रमुख प्रकार आहेत. अर्थात प्रत्येक प्रकारची चरबी आरोग्यदायी नसते. अनसॅच्युरेटेड फॅटची गणना चांगल्या किंवा आरोग्यदायी चरबीमध्ये केली जाते. प्रक्रिया केलेल्या अन्नात असलेले ट्रान्स फॅट आरोग्यदायी नसतात. चरबीयुक्त पदार्थांच्या अतिसेवनामुळे वजन वाढणं तसंच इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. त्यामुळे आहारात चरबीयुक्त पदार्थांचा समावेश करताना विशेष काळजी घ्यायला हवी. म्हणूनच आपण या फॅट्सबद्दल जाणून घ्यायला हवं.

**सॅच्युरेटेड फॅट म्हणजे काय?**

सॅच्युरेटेड फॅट्स प्राणीजन्य पदार्थांमध्ये आढळतात. दूध, चीज, बटर आणि मांस यात हे फॅट्स असतात. खोबरेल तेल, पाम तेल आणि कोका बटर यातही सॅच्युरेटेड फॅट्स असतात. हे फॅट्स सर्वसामान्य तापमानाला घट्ट असतात. बटर आणि मार्गारिनयुक्त पदार्थांमध्ये भरपूर प्रमाणात सॅच्युरेटेड फॅट्स असतात. सॅच्युरेटेड फॅट्सच्या अतिसेवनामुळे कोलेस्टेरॉलचं प्रमाण वाढून हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. त्यामुळे या प्रकारचे फॅट्स मर्यादित प्रमाणात खायला हवेत. चिकन आणि सुक्या मेव्यातही सॅच्युरेटेड फॅट्स असतात. पण चीज आणि आईसक्रीमच्या तुलनेत त्यांचं प्रमाण खूप कमी असतं. त्यामुळे सॅच्युरेटेड फॅट्सयुक्त पदार्थ खाताना स्वत:वर नियंत्रण ठेवणं गरजेचं आहे.

**अनसॅच्युरेटेड फॅट्स म्हणजे काय?**

हे फॅट्स सर्वसामान्य तापमानाला द्रवरूपात असतात. वनस्पतींपासून मिळणाऱ्या स्निग्ध पदार्थांत ते आढळतात. त्यामुळे हे फॅट्स खाण्यावर भर द्यायला हवा. मोनो अनसॅच्युरेटेड फॅट्स आणि पॉलि अनसॅच्युरेटेड फॅट्स असे या फॅट्सचे दोन प्रकार आहेत. या फॅट्समुळे कोलेस्टेरॉलचं प्रमाण कमी होतं. दाह कमी व्हायला मदत होते. हृदयाचं आरोग्य राखलं जातं. तसंच याचे इतरही बरेच लाभ असतात. वनस्पती तेल, ॲव्होकॅडो, अक्रोड, सुरमई, ऑईव्ह यात हे फॅट असतं.

**ट्रान्स फॅट म्हणजे काय?**

ट्रान्स फॅट्स हे द्रवरूपातले फॅट्स असतात. पण प्रक्रियेदरम्यान त्यांचं रूपांतर घन फॅट्समध्ये होतं. हायड्रोजेनेशन या प्रक्रियेद्वारे या फॅट्सचं मूळ रूप बदललं जातं. या प्रक्रियेमुळे या फॅट्सचं आयुष्य वाढतं आणि सर्वसामान्य तापमानाला हे फॅट्स घनरूपात राहू शकतात. ट्रान्स फॅट्समुळे तुमचं कोलेस्टेरॉल वाढू शकतं. वेफर्स, कुकीज, तळलेले पदार्थ, डोनट्स, काही प्रकारचे मार्गारिन आणि सॅलड ड्रेसिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये हे फॅट्स असतात. काही प्रकारचं मांस तसंच दुग्धजन्य पदार्थांमध्ये अल्प प्रमाणात ट्रान्स फॅट्स असतात. पण प्रक्रिया केलेल्या पदार्थांमध्ये त्यांचं प्रमाण बरंच जास्त असतं. त्यामुळे असे अन्नपदार्थ टाळायला हवेत.

आरोग्यतंत्र

## वेळेआधी का येतं वार्धक्य?



माणसाचं वय वाढणारच, वार्ध्यक्याच्या खुणा दिसणारच. सुरकुतलेली त्वचा, पांढरे केस, डोळ्याखालची काळी वर्तुळं ही सर्व वाढत्या वयाची लक्षणं असतात. पण वय वाढण्याची ही प्रक्रिया व्यक्तीगणिक बदलत जाते. काही लोक वयापेक्षा जास्त थोराड दिसतात तर काहीजण वय वाढूनही तरुणच भासत असतात.

प्रत्येकाला तरूण रहायचं असतं, दिसायचं असतं. वाढतं वय ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी चुकीच्या जीवनशैलीमुळे आपण वेळेआधीच म्हातारे दिसू लागतो. वेळेआधीच वार्धक्याच्या खुणा दाखवणाऱ्या चुका कोणत्या? जाणून घेऊ या.

* जंक फूड तसंच गोड पदार्थांचं अतिसेवन घातक ठरू शकतं. ताण आल्यावर किंवा दमल्यावर आपण गोड पदार्थ खातो. साखरेचं अतिसेवन शारीरिक आरोग्याला मारक आहे. शिवाय यामुळे तुमचं शारीरिक वय जास्त दिसू लागतं. गोड पदार्थ सतत खात राहिल्याने त्वचा सुरकुतलेली दिसते. तसंच चेहरा सुजल्यासारखा वाटतो.
* केस पांढरे झाले, चेहऱ्यावर सुरकुत्या आल्या, डोळ्यांखाली काळी वर्तुळं आली की ती लपवण्यासाठी आपण सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतो. या सौंदर्य प्रसाधनांमध्ये घातक रसायनं असतात.

आपण कुठे चुकतो?

## महिलांना झोपेची गरज अधिक!



आयुष्यात माणसाला रात्रीची चांगली झोप आणि थकून घरी परतल्यावर शांत जेवणाची गरज असते. झोप ही अन्न आणि पाण्याइतकीच आवश्यक असते. तुम्ही नीट झोपला नाही तर नंतर सर्व प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात. 'पुरुषांपेक्षा महिलांना जास्त झोपेची गरज आहे का?' हा प्रश्न बऱ्याच काळापासून लोकांच्या मनात आहे. आता अनेक आंतरराष्ट्रीय अभ्यासांमध्ये महिलांना पुरुषांपेक्षा थोडी जास्त झोपेची आवश्यकता असू शकते हे सिद्ध झाले आहे.

'अमेरिकन स्लीप फाउंडेशन' आणि 'क्लीव्हलँड क्लिनिक'च्या मते महिला सरासरी पुरुषांपेक्षा १० ते १५ मिनिटे जास्त झोपतात. हा फरक लहान वाटत असला, तरी त्यामागे वैज्ञानिक कारणे आहेत. २०२१ मध्ये 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'ने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार, महिला रात्री जास्त वेळा जाग्या होतात आणि त्यांची झोप पुरुषांपेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे. म्हणूनच त्यांना पूर्णपणे ताजेतवाने वाटण्यासाठी थोड्या जास्त झोपेची आवश्यकता असते.

**महिलांना जास्त झोपेची आवश्यकता का आहे?**

महिलांना जास्त झोपेची आवश्यकता आहे. याची विविध कारणे आहेत. प्रथम, हार्मोनल बदल. महिलांच्या शरीरात हार्मोनल बदल होतात. त्यामुळे त्यांना जास्त झोपेची आवश्यकता असते. 'क्लीव्हलँड क्लिनिक'च्या अहवालात असे म्हटले आहे, की मासिक पाळीपूर्वीचे सिंड्रोम आणि हार्मोनल असंतुलन ही झोपेचा त्रास आणि अस्वस्थतेची सामान्य कारणे आहेत. दुसरे कारण म्हणजे झोपेचा त्रास. महिलांना वारंवार जागे होण्याची किंवा हलकी झोप घेण्याची शक्यता जास्त असते. तिसरे कारण म्हणजे मानसिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या. महिला दिवसभर घरातील कामे, काम आणि मुलांची काळजी घेणे अशी अनेक कामे करतात. या सततच्या मल्टीटास्किंगमुळे मेंदू थकतो आणि मानसिक ऊर्जेचा वापर वाढतो. परिणामी, मेंदूला रिचार्ज होण्यासाठी अधिक विश्रांती किंवा झोपेची आवश्यकता असते.

नवे संशोधन
डॉ. मेघा दळे

## सर्दी आणि फ्लू एकत्र?



आदल्या दिवशी शिंक आल्यानंतर दुसऱ्या दिवशी तुम्ही तापाने फणफणत असता. सर्दी आणि फ्लूची लागण होण्याचा काळ आता सुरू झाला आहे. आपल्यापैकी कोणीही तो टाळू शकत नाही. तसंच कितीही घरगुती उपचार केले, डॉक्टरांकडून औषधं घेतली तरी व्हायरल जंतूसंसर्ग पूर्णपणे बरा होण्यासाठी काही कालावधी जावाच लागतो. व्हायरल जंतूसंसर्गाला एकत्रितपणे सर्दी आणि फ्लूचा हंगाम असं म्हटलं जातं. सर्दी आणि ताप यांचा संसर्ग एकत्रितपणे होऊ शकत नाही, असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात गळकं नाक, सर्दी आणि तीव्र स्वरूपाचा ताप अशी लक्षणं एकत्रितपणे दिसू लागतात. यासोबतच अशक्तपणा आणि अंगदुखीही असते. सोप्या शब्दात सांगायचं तर फ्लू आणि सर्दी एकाच कुटुंबातल्या विषाणूंमुळे होत असले तरी एका विषाणूचा प्रतिकार करताना आपली प्रतिकारशक्ती दुसऱ्या विषाणूविरोधात तिच सुरक्षा देऊ शकत नाही. सर्वसाधारणपणे सर्दी ही सर्वसामान्यपणे आढळणाऱ्या ऱ्हिनोव्हायरसमुळे होते तर फ्लूचा प्रसार इन्फ्लूएंझा विषाणूंमुळे होतो. हे विषाणू वेगवेगळ्या प्रकारचे असतात. या विषाणूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर रोगप्रतिकारक शक्ती वेगळ्या पद्धतीने प्रतिसाद देते. पहिल्यांदा रोगप्रतिकारक पेशी विषाणूची ओळख पटवतात. मग त्यांचा प्रसार थांबवण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्या टप्प्यात रोगप्रतिकारक शक्ती आपल्या सुरक्षा प्रणालीचा वापर करून प्रत्यक्ष विषाणूला लक्ष्य करायला बघते.

आरोग्य चर्चा



## मधुमेहाचा कमी झोपेशी निकटचा संबंध

मधुमेहामध्ये शरीर इन्सुलिन हार्मोनचा योग्य वापर करू शकत नाही किंवा पुरेसे इन्सुलिन तयार करू शकत नाही. यामुळे रक्तातील ग्लुकोजची पातळी वाढते आणि शरीराच्या पेशी योग्यरित्या ऊर्जा वापरण्यास असमर्थ असतात. मधुमेहाचा आणि झोपेचा निकटचा संबंध आहे.

मधुमेहाचे दोन मुख्य प्रकार आहेत, प्रकार १ आणि प्रकार २. प्रकार १ मध्ये, शरीराची रोगप्रतिकारक शक्ती स्वादुपिंडाच्या इन्सुलिन उत्पादक पेशींना नुकसान पोहोचवते. टाइप २ मधुमेहात, शरीर इन्सुलिनला प्रतिरोधक बनते किंवा इन्सुलिनचे उत्पादन कमी होते. हे लठ्ठपणा, खराब जीवनशैली, चरबी जमा होणे, अस्वास्थ्यकर खाण्याच्या सवयी, शारीरिक हालचालींचा अभाव, अनुवंशशास्त्र आणि ताण यासारख्या घटकांमुळे होते. मधुमेह आणि झोपेचा एकमेकांवर थेट परिणाम होतो. रक्तातील साखरेची पातळी वाढल्याने वारंवार तहान, निर्जलीकरण आणि वारंवार लघवी होऊ शकते. त्यामुळे नीट झोप येत नाही. रक्तातील साखरेत अचानक घट झाल्याने अस्वस्थता, चिंता, घाम येणे, हृदयाची गती वाढणे आणि झोपेचा त्रास होऊ शकतो.

जाणून घ्या
डॉ. दिलीप सिरसाट

## प्रतिजैविकांचा अति वापर घातक!

डोकेदुखी, खोकला, ताप किंवा सर्दी यासारखी सौम्य लक्षणे जाणवत असतील आणि डॉक्टरांचा सल्ला न घेता वारंवार औषधे घेत असाल तर आत्ताच सावध व्हा. स्व-औषधोपचार आणि अँटीबायोटिक्सच्या वारंवार वापरामुळे औषधे कुचकामी ठरतात. याला अँटीबायोटिक रेझिस्टन्स म्हणतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या नवीन अहवालानुसार, २०२३ मध्ये प्रत्येक सहापैकी एक जिवाणू संसर्ग अँटीबायोटिक्सना प्रतिरोधक असल्याचे आढळून आले.



म्हणजे, सामान्य औषधे या जिवाणू संसर्गांवर काम करत नाहीत. ही समस्या मूत्रमार्ग आणि रक्तप्रवाह संक्रमणास कारणीभूत असलेल्या जीवाणूंमध्ये सर्वाधिक प्रमाणात आढळते. 'ग्लोबल अँटीबायोटिक रेझिस्टन्स सर्व्हिलन्स रिपोर्ट' २०२५ नुसार, भारतासह आग्नेय आशियाई प्रदेशात अँटीबायोटिक रेझिस्टन्सचे प्रमाण सर्वाधिक आहे. अहवालानुसार, भारतातील रुग्णांच्या रक्तातील ७० टक्के संसर्ग आणि ७८ टक्क्यांहून अधिक ई. कोलाय संसर्ग अँटीबायोटिक्सना प्रतिरोधक असल्याचे आढळून आले आहे. याचा अर्थ असा, की सामान्य औषधे आता प्रभावी नाहीत. त्यामुळे उपचार अधिकाधिक कठीण होत आहेत.

**धोका का वाढत आहे?** – तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार लोक डॉक्टरांचा सल्ला न घेता अँटीबायोटिक्स खरेदी करतात आणि कोर्स अपूर्ण ठेवतात. यामुळे केवळ हानिकारक बॅक्टेरियाच नाही, तर फायदेशीर बॅक्टेरियादेखील मरतात.

आरोग्य वेध
डॉ. कुंदन गायकवाड

## चहा-टोस्ट खाणे धोकादायक



बहुतेक भारतीयांसाठी गरमागरम चहा आणि टोस्ट हे दिवसाची सुरुवात करण्याचा एक आवश्यक भाग आहेत. ते लवकर तयार होतात, चविष्ट असतात आणि दिवसाच्या धावपळीपूर्वी विश्रांतीचा क्षण देतात. तथापि, अलिकडच्या संशोधनातून असे दिसून आले आहे, की ही सवय दिसते तितकी आरोग्यदायी नाही. चहा आणि पांढऱ्या ब्रेड टोस्टचे हे दररोजचे मिश्रण हळूहळू तुमच्या शरीरावर वाईट परिणाम करू शकते.

संशोधनातून असे दिसून आले आहे, की भरपूर प्रमाणात रिफाइंड कार्बोहायड्रेट्स तसेच दूध आणि साखरेचे प्रमाण जास्त असलेले चहा यासारखी गोड पेये पांढऱ्या ब्रेड टोस्टबराबर सेवन करणाऱ्या लोकांमध्ये इन्सुलिन प्रतिरोध आणि चयापचय सिंड्रोमचा धोका वाढतो. याचा अर्थ असा, की शरीराच्या पेशी हळूहळू इन्सुलिनला योग्यरित्या प्रतिसाद देणे थांबवतात. त्यामुळे साखरेची पातळी वाढते आणि लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयरोगाचा धोका वाढतो. असे स्नॅक्स वारंवार खाल्ल्याने रक्तातील साखर लवकर वाढते आणि नंतर अचानक कमी होते. यामुळे काही तासांतच पुन्हा भूक लागते. त्यामुळे तुम्हाला थकवा जाणवतो आणि ऊर्जेचा अभाव जाणवतो. दीर्घकाळात ही सवय तुमचे चयापचय मंदावू शकते.

**सकाळच्या चहाचे धोके**

चहा सर्वांचा आवडता बनला आहे. जर तोच चहा पूर्ण चरबीयुक्त दूध आणि दोन ते तीन चमचे साखरेसह बनवला गेला, तर तो आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. अशा चहाच्या एका कपमध्ये अंदाजे १५०-२०० कॅलरीज असतात आणि तुम्ही दिवसातून दोन ते तीन वेळा चहा प्यायलात तर या कॅलरीज हळूहळू वजन वाढवण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. चहामधील टॅनिन काहीसे फायदेशीर आहे. ते मनाला ताजेतवाने करते आणि लक्ष केंद्रित करते. जास्त प्रमाणात कॅफिनमुळे चिंता, झोपेची समस्या आणि निर्जलीकरण होऊ शकते. काळ्या चहामधील टॅनिन लोह शोषणातदेखील व्यत्यय आणतात. त्यामुळे अशक्तपणाचा धोका वाढतो.

**कर्करोगाला निमंत्रण**

दररोज चहासोबत व्हाईट ब्रेड टोस्ट खाल्ले तर तुम्ही नकळत दररोज सकाळी उच्च-कार्ब, कमी-पोषण नाश्ता घेत आहात. याने काही तासांसाठी ऊर्जा मिळते, परंतु नंतर तुम्हाला आळस वाटू लागतो. पांढऱ्या ब्रेडचे टोस्ट वाटते तितके आरोग्यदायी नाही. बहुतेक लोक पांढऱ्या ब्रेडचा वापर करतात. प्रक्रिया करताना त्यातील फायबर आणि आवश्यक पोषक घटक काढून टाकले जातात. म्हणजे पांढऱ्या ब्रेडमध्ये फक्त रिक्त कार्बोहायड्रेट्स असतात. ते लवकर पचतात आणि रक्तातील साखर लगेच वाढवतात. यामुळे थोड्याच वेळात परत भूक लागू शकते आणि तुम्ही जास्त खाता. याव्यतिरिक्त, पांढऱ्या ब्रेडमध्ये व्हिटॅमिन बी, लोह आणि मॅग्नेशियम सारख्या आवश्यक पोषक घटकांची कमतरता असते. जास्त टोस्टिंग, अर्थात ते खूप कुरकुरीत किंवा जळलेले बनवण्याने ॲक्रिलामइड नावाचे रसायन तयार होते. त्यामुळे दीर्घकाळात कर्करोग होऊ शकतो. बटर, जॅम, मार्जरीन किंवा गोड पदार्थांसारखे टॉपिंग्ज चव वाढवतात, परंतु त्यात लपलेले साखर आणि ट्रान्स फॅट्स तुमच्या शरीरासाठी आणखी हानिकारक असतात.

**चहा आणि टोस्ट निरोगी कसे बनवायचे?**

काही योग्य बदलांसह, तुम्ही हे संयोजन निरोगी बनवू शकता.

* **तुमच्या चहामध्ये बदल करा:** साखरेचे प्रमाण हळूहळू कमी करा आणि फुल फॅट दुधाऐवजी टोन्ड किंवा वनस्पती-आधारित दूध वापरा. चव वाढवण्यासाठी वेलची, आले आणि दालचिनीसारखे मसाले घाला. हे केवळ चविष्टच नाहीत, तर त्यात अँटीऑक्सिडंट गुणधर्मदेखील आहेत. दिवसातून दोन कपपेक्षा जास्त चहा पिऊ नका.
* **टोस्ट सुधारा:** पांढरा ब्रेड वगळा आणि संपूर्ण धान्य, मल्टीग्रेन किंवा ओट ब्रेड निवडा. यामध्ये फायबर आणि कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स जास्त असतात, जे पचन मंदावतात आणि भूक उशिरा लागते. टोस्ट जास्त शिजवू नका.

हे टाळा
डॉ. आकांक्षा वरखडे

नवसंशोधन

### ताणामुळे कमी होते स्मरणशक्ती!



मध्यमवयातल्या ताणामुळे भविष्यात विस्मरणाचा धोका उद्भवू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. ताणामुळे मेंदूचा आकारही कमी होतो, असं संशोधकांचं म्हणणं आहे. ताणाशी संबंधित कॉर्टिसोल या हार्मोनच्या अतिप्रमाणामुळे असं होत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. कॉर्टिसोलचं प्रमाण जास्त असलेल्या लोकांची स्मरणशक्ती इतरांच्या तुलनेत मंदावली होती, असं शास्त्रज्ञांना आढळून आलं. तसंच इतर कामं करतानाही त्यांना त्रास होत असल्याचं दिसून आलं. त्यामुळे मध्यमवयातल्या ताणामुळे बरेच दुष्परिणाम होऊ शकतात, असंच यातून दिसून येतं.

दंतारोग्य

### तोंडाचं आरोग्य आणि रक्तदाब

दात आणि तोंडाचं आरोग्य यांचा संबंध रक्तदाबाशी असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. तोंडाच्या आरोग्याची नीट काळजी घेणाऱ्या लोकांचा रक्तदाब नियंत्रणात असल्याचं शास्त्रज्ञांना आढळून आलं आहे. तसंच रक्तदाब कमी करणाऱ्या औषधांना त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचंही दिसून आलं आहे. पण गंभीर स्वरूपाचा हिरड्यांचा जंतूसंसर्ग असलेल्यांमध्ये रक्तदाब जास्त असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे तोंडाचं आरोग्य राखणं किती गरजेचं आहे हे आपल्या लक्षात येईल.



डोळ्यांचं आरोग्य

### लेझी आयकडे लक्ष आहे का?



लहान मुलांमध्ये लेझी आयची समस्या असते. यात मुलांचा एक डोळा योग्य पद्धतीने विकसित होत नाही. यावर वेळीच उपचार केले नाहीत तर मेंदूला त्या डोळ्यासमोर दिसणाऱ्या प्रतिमेकडे दुर्लक्ष करायची सवय लागते. यामुळे मुलांच्या दृष्टीला कायमस्वरूपी धोका निर्माण होऊ शकतो. या विकाराला ॲंब्लिओपिया असं म्हटलं जातं. लेझी आयमुळे मुलांना एका डोळ्याने अंधूक दिसतं. तर दुसऱ्या डोळ्याने स्पष्ट दिसतं. अशा वेळी अंधूक प्रतिमेकडे दुर्लक्ष करण्याची सवय मेंदूला लागते. यावर उपचार झाले नाहीत तर दृष्टी अधू होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आजीबाईचा बटवा

### पोटाच्या समस्यांवर रामबाण उपाय



सणासुदीचे दिवस, लग्नसराई म्हणजे भरपूर खाणंपिणं. यामुळे पोटाचे विकार उद्भवू शकतात. काही आयुर्वेदिक उपायांनी या तक्रारी बऱ्या करता येतात. बडिशेप, तुळस आणि लवंगांच्या एकत्रित सेवनामुळे आम्लपित्ताच्या तक्रारी दूर होऊ शकतात. ताकामुळे आम्लाची तीव्रता कमी होते. बद्धकोष्टतेसाठी सव्वा कप गरम पाण्यात एक चमचा शुद्ध तूप घाला. अर्धा चमचा मीठ घाला. नीट हलवून घ्या. हे पेय हळूहळू प्या.

# एनडीपीएसची कारवाई की षडयंत्र ?

## पत्रपरिषदेत कुटुंबियांनी केला पर्दाफाश
## पोलीस आयुक्तांनी घेतली गंभीर दखल
## पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाईचे संकेत

**भाग १**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

कधी एमडी तर कधी गांजा पकडून अंमली पदार्थाच्या विक्रीवर प्रतिबंध लावणाऱ्या एनडीपीएस अर्थात अंमली पदार्थ प्रतिबंधक पथकाने एक बनावट कारवाई केल्याचा पर्दाफाश झाला आहे. या प्रकरणातील कथित आरोपी आणि त्याच्या कुटुंबियांनींच सर्व पुरावे सादर करीत एनडीपीएस पथकाच्या या बोगर कारवाईचे बिंग फोडले.

दरम्यान, या प्रकरणात नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनाही पुराव्यासह तक्रार सादर करण्यात आली असून, त्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. परिणामी, एनडीपीएसचे संपूर्ण पथक आणि गुन्हा दाखल करून घेणाऱ्या संबंधित पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी चौकशीच्या फेऱ्यात सापडले आहेत.

एनडीपीएस पथकाने ३० मे २०२५ रोजी केलेली (दाखवलेली) कारवाई आणि त्याआधारे गणेशपेठ पोलीस स्टेशनमध्ये दाखल एफआयआर (क्र. ०२२८) नुसार, एनडीपीएसचे पोलीस निरीक्षक गजानन गुल्हाणे, उपनिरीक्षक नागेश पुन्नावाड, हवालदार शैलेश दाबोले, मनोज नेवारे, विवेक अढावू, अरविंद गेडेकर, पवन गजभिये, गणेश जोगेकर, रोहित काळे, अनुप यादव आणि वाहन चालक नितीन साळुंके हे अंमली पदार्थ विरोधी कारवाईसाठी शासकीय आणि एका खासगी वाहनाने गस्त घालत होते.

त्यावेळी, एका तरूणाने पार्सल घेतले असून, तो संशयीत वाटत असल्याची माहिती खबऱ्याने पथकाला दिली. त्यानुसार, पथकाने अर्पण मनिष गोस्वामी (वय २८), रा. बेला, भंडारा, या तरूणाला गणेशपेठ बसस्थानक नजिकच्या राहुल कॉम्प्लेक्स जवळून ताब्यात घेतले. त्याच्या सुझुकी ॲक्सेस मोपेडची झडती घेतली असता ४२.५२ ग्रॅम एमडी ड्रग सदृष्य क्रिस्टल मिळून आले. या तरूणाकडून २ लाख १२६०० रूपयांचे ड्रग, ८० हजार रूपये किमतीची मोपेड आणि ५०० रूपये किमतीचा ईलेक्ट्रानिक वजन काटा असे ३ लाख ६०० रूपयाचे साहित्य जप्त करण्यात आल्याचे तसेच ही कारवाई दुपारी १२.१५ ते दु. २.४५ दरम्यान करण्यात आल्याचे एफआयआरमध्ये नमूद आहे.

भंडारा येथील खैबर जाफरी (वय २५), शादाब पठाण आणि साद जमा हे त्याचे साथीदार आहेत, जाफरी याने मुंबई येथून ड्रग पार्सल मागविले असून, ते घेण्यासाठी आपल्याला नागपूरला पाठविल्याचे अर्पण गोस्वामी याने सांगितल्याचाही एफआयआरमध्ये उल्लेख आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाने दिलेल्या तक्रारीच्या आधारे अर्पण गोस्वामी या तरूणावर गणेशपेठ ठाण्यात ३० मे रोजी एनडीपीएस ॲक्ट १९८५ च्या कलम ८ (क), २२ (ब), २९ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांच्या मते या प्रकरणातील खैबर, शादाब आणि साद हे तिघेही फरार असून, शोध सुरू आहे. अर्पण गोस्वामी हा तरूण पुढे अनेक महिने कारागृहात होता.

दरम्यान, अर्पणच्या मोपेडमधून एमडी ड्रग्ज जप्त करण्याचे हे संपूर्ण प्रकरण पूर्णतः बनावट असून, पद्धतशीररित्या षडयंत्र रचण्यात आल्याचे त्याचे व कुटुंबियांचे म्हणणे आहे. यासंदर्भात, त्यांनी १५ नोव्हेंबर रोजी नागपूर येथे पत्रकार परिषद घेत सर्व पुरावे सादर केलेत. त्यावरून अंमली पदार्थ विरोधी पथकाची ही धाड पूर्णतः बनावट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

अर्पण गोस्वामी याचे वडील मनिष गोस्वामी स्वतः पोलीस खात्यात असून, अनेक वर्षे त्यांनी एटीस, एसीबी, एलसीबी, गोपनीय विभागात काम केले आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या या धाडीविषयी त्यांनी पुरावे आणि सीसीटीव्ही फुटेज गोळा केले.

३० मे २०२५ रोजीच एमएच ४०/सीए ६७८८ क्रमांकाच्या मारूती ब्रिझा कारमध्ये भंडाराकडे निघालेले एनडीपी पथक, टोल नाक्यावर दाखवलेले ओळखपत्र, सॅन्डी हॉटिलजवळून अर्पण गोस्वामीला ताब्यात घेणे, भंडारा शहरात फिरस्ती, दोन शिपायांनी त्याची मोपेड नागपूरच्या दिशेने आणणे, त्यांचा परतीचा प्रवास, मोपेडमध्ये पॅकेट टाकणे, हे सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. यावरून एनडीपीएसच्या या कारवाईची बोगसगिरी पूर्णतः स्पष्ट होते.

(क्रमशः)

# आयआयटी बॉम्बेचे नाव मुंबई आयआयटी करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :



आयआयटी बॉम्बेचे नामकरण आयआयटी मुंबई असे करावे, अशी विनंती करणारे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मानव संसाधन विकास मंत्र्यांना पाठवणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी उमरेड येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

मुबंईत राज ठाकरे यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेकडे फडणवीस यांच्याकडे लक्ष वेधले असता फडणवीस म्हणाले, बॉम्बेचे मुंबई करण्यात भाजप नेते राम नाईक यांचा सर्वात मोठा वाटा आहे, आमच्यासाठी मुंबईच आहे.

बॉम्बे आयआयटीचे नामकरण मुंबई आयआयटी असे करावे म्हणून मी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मानव संसाधन विकास मंत्र्यांना पत्र पाठवणार आहे. मात्र ज्यांची मुले इंग्रजी शाळेत शिकतात त्याचे नामकरण करा, असे मी म्हणनार नाही, असा टोला त्यांनी राज ठाकरे यांचे नाव न घेता हाणला.

निवडणुकीत लोकांना मतांचा जोगवा मागणे यालाच लोकशाही म्हणतात, त्यामुळे आम्ही लोकांमध्ये जातो. कोणी लोकांकडे जात नसेल तर तो त्यांचा प्रश्न आहे, लाडकी बहीण योजना ही सरकारची योजना आहे, आणि सरकार हे तीन पक्षाचे आहे, त्यामुळे तीनही पक्ष या योजनांवर दावा करतात, असे ते म्हणाले.

# ५०% आरक्षणाचा डाव ओबीसींना शून्यावर नेईल

## बबनराव तायवाडेंनी व्यक्त केली भीती

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :



सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा लागू करण्याचा निर्णय दिला तर राज्यातील ओबीसी समाजाचे आरक्षण संपुष्टात येईल, असे मत ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी व्यक्त केले. राज्यात आरक्षणाला ५० टक्केची अटक लागली तर एक दिवस ओबीसींचे आरक्षण शून्यावर येईल.

बबनराव तायवाडे म्हणाले की, जेव्हा आरक्षण लागू झाले तेव्हा अनुसूचित जातील १३ टक्के व अनुसूचित जमातीला ७ टक्के असे एकूण २० टक्के आरक्षण दिले जात होते. ५० टक्क्यांची मर्यादा राखून ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षण लागू झाले होते.

तायवाडे म्हणाले की, सध्या राज्यात अनुसूचित जमाती व अनुसूची जमाती या दोन्ही समाजाची लोकसंख्या वाढल्यामुळे त्यांच्या आरक्षणाची एकत्रित टक्केवारी २० टक्क्यांवरून २८ टक्के झाली आहे. तायवाडे यांच्या मते, जर न्यायालयाने ५० टक्क्यांची अट कायम ठेवली, तर आजच्या घडीला ५०टक्क्यांच्या मयार्देत ओबीसींसाठी फक्त २२ टक्केच आरक्षण शिल्लक राहील.

**.. तर ओबीसींचे आरक्षण संपुष्टात**

तायवाडे म्हणाले की, भविष्यात याच प्रमाणात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या आणि त्यांचे आरक्षण वाढत गेल्यास, सध्या २८ टक्के असलेले हे आरक्षण ४० टक्के, नंतर ५० टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत, ५० टक्क्यांच्या मयादिमुळे ओबीसींना मिळणारे आरक्षण पूर्णपणे संपुष्टात येऊन शून्य टक्के होईल, असे गंभीर मत तायवाडे यांनी मांडले.

५० टक्के आरक्षणाची मर्यादा लागू करायची की नाही, या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी सुनावणी पार पडली. राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

राज्यात लवकरच २४६ परिषद आणि ४२ नगरपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिकांच्या निवडणुकाही बाकी आहेत.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाचा अंतिम निकाल जाहीर होईपर्यंत जिल्हा परिषद व महानगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर न करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहेत, ज्यामुळे न्यायालयीन निर्णयाचे महत्त्व अधोरेखित होते.

# पुण्याचा मनीष रायते ठरला विजेता



■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २६ :

स्वातंत्र्यसंग्राम सेनानी जवाहरलाल दर्डा उपाख्य बाबूजी यांच्या स्मृती दिनानिमित्त यवतमाळ येथील हनुमान आखाड्याच्या लाल मातीच्या हौदात रंगलेल्या पंधरा लाख रुपयाच्या इनामी काटा कुस्त्यांच्या दंगलीत पुणे येथील मनीष रायते पहिलवान अव्वल ठरला. तो एक लाख रुपयांच्या बक्षिसाचा मानकरी ठरला.वाशिमच्या विजय शिंदे पैलवानाला उपविजेतेपद मिळाले.

जिल्हा कुस्तीगीर संघाचे मार्गदर्शक, यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते आणि जितेंद्र मोघे, प्रशांत बाजोरिया, महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर परिषद पुणेचे विभागीय सचिव अनिल पांडे आदींच्या हस्ते विजेत्या मल्लांना बक्षीस देण्यात आले. माजी खासदार डॉ विजय दर्डा, माजी मंत्री राजेंद्र दर्डा, आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी आमदार कीर्ती गांधी, हनुमान आखाड्याचे विश्वस्त किशोर दर्डा यांच्या मार्गदर्शनात ही स्पर्धा घेण्यात आली.

# एकतर्फी प्रेमातून तरुणाची हत्या

## मैत्रिणीच्या प्रियकराने चाकूने भोसकले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

एकतर्फी प्रेमातून एका तरुणाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. भांडणानंतर मैत्रिणीच्या प्रियकराने त्याच्यावर चाकूने हल्ला करीत रक्ताच्या थारोळ्यात लोळवले.

ही थरारक घटना गणेशपेठ पोलिस ठाण्यांतर्गत गाडीखाना परिसरात घडली. अमन मेश्राम (२४) रा. गंगाबाई घाट चौक असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली आहे. अमित रामराव शिवरकर (रा. बाबुळगाव, यवतमाळ) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

अमनची गाडीखाना परिसरात राहणा?्या तरुणीशी मैत्री होती. तो तिच्यावर एकतर्फी प्रेम करीत होता, मात्र तरुणी त्याला भाव देत नव्हती. आरोपी अमित हा हिंगणाच्या गुमगाव परिसरातील एका ढाब्यावर काम करतो. तेथेच काम करणाऱ्या हेमंतशी त्याची मैत्री होती.

हेमंतची प्रेयसी अमनच्या मैत्रिणीची मैत्रिण आहे. त्यामुळे अमितसोबतही तिची चांगली मैत्री झाली होती. अमनला याबाबत समजले आणि त्याने तरुणीला धमकावण्यास सुरूवात केली. तो दोघांच्या भेटीगाठीमुळे नाराज होता.

मंगळवारी रात्री १० वाजताच्या सुमारास त्याने चिडून तरुणीला फोन केला. तिला अमितसोबत गाडीखाना परिसरात भेटायला बोलावले. रामकुलरजवळील मैदानात सर्व बोलत उभे होते. या दरम्यान अमनने ४-५ वेळा तरुणीच्या कानशिलात लगावल्या.

यामुळे अमित चिडला. त्याने चाकू काढून अमनच्या पोटात भोसकला. अमनला रक्ताच्या थारोळ्यात लोळवून अमित पसार झाला. घटनेची माहिती मिळताच गणेशपेठ पोलिस घटनास्थळी पोहोचले.

अमनला उपचारार्थ रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी तात्काळ अमितचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. रात्री उशिरापर्यंत पोलिसांचा तपास सुरू होता.

# अनाथ बालकांचा आधार निवारा बालगृह

**लोकजागर**




एकीकडे शाळा-महाविद्यालयांत शिक्षणाचे धडे गिरविणारे विद्यार्थी.. दुसरीकडे मात्र याच समाजात राहणारे पण पोटाची भूक भागविण्यासाठी दारोदारी भीक मागणारे, चोरी करणारे तर कधी हातात गलोल घेऊन रानात पक्ष्यांच्या मागे फिरणारे भटक्या-विमुक्त कुटुंबातील मुले.

या मुलांना ना स्वतःच्या आरोग्याची भ्रांत, ना शिक्षण, ना संस्कार. समाज व्यवस्थेतील ही विदारक परिस्थिती ॲड. डॉ. अरुण जाधव यांनी बालपणापासून पाहिली आणि स्वतःही अनुभवली. वंचित घटकातील या मुलांना समाज प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना चांगले भविष्य देण्याच्या उद्देशातून जाधव यांनी २६ जून २०१५ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीदिनी जामखेड येथे आपल्या राहत्या घरी निवारा बालगृहाची स्थापना केली.

सुरुवातीला ८ मुले दाखल झालेल्या या बालगृहात आज ६५ मुले-मुली वास्तव्यास आहेत. अरुण जाधव यांचा जन्म भटक्या विमुक्त कुटुंबात झाला. त्यामुळे बालपणापासून त्यांनी वंचितच जीनं काय असते हे अनुभवले.

समाजात वावरत असताना जेव्हा काही अनाथ, निराधार, गोरगरीब, ऊसतोडणी कामगार, वीटभट्टी कामगार, घिसाडी, वडारी, कैकाडी, वासुदेव, पिंगळा, मदारी, भिल्ल, पारधी आदी वंचित कुटुंबातील मुले शिक्षण न घेता रस्त्यावर किंवा दारोदार भीक मागताना पहायचे. तेव्हा या मुलांसाठी आपण काहीतरी करावे असे जाधव याना नेहमी वाटायचे.

जाधव यांनी उच्च शिक्षण घेतल्यानंतरही कुठे नोकरी न करता पूर्णवेळ स्वतःला सामाजिक कार्यात वाहून घेतले. त्यांनी 'ग्रामीण विकास केंद्र' या संस्थेची स्थापना करत दलित, आदिवासी, भटके-विमुक्त माज्यातील निराधार महिला व मुलांसाठी काम सुरू केले. सुरुवातीला निवारा बालगृहात केवळ ८ मुले दाखल झाली. या कार्यात जाधव यांना साथ दिली त्या त्यांच्या मातोश्री ज्येष्ठ लोककलावंत हिराबाई जाधव, त्यांच्या पत्नी उमाताई, भगिनी अलकाताई जाधव व संस्थेचे संचालक बापू ओहोळ यांनी. बालगृहातील आठ मुलांचा निवास, भोजन आणि शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली.

या कार्यात जाधव यांना बाळू कदम, बाबासाहेब डोंगरे, शोभा कुंवर, रोहिणी जाधव, सोजरबाई जाधव, कल्पना जाधव या स्वयंसेवकांनी सुरुवातीच्या काळात मदत केली. वर्षभरातच निवारा गृहात मुलांची संख्या १४ झाली. मुलांना राहण्यासाठी जागा अपुरी पडू लागली म्हणून जाधव यांनी आपल्या कुंभारतळे येथील स्वमालकीच्या जागेत मोठा हॉल बांधला. याठिकाणी विद्यार्थ्यांसाठी लागणारे आवश्यक साहित्य खरेदीसाठी जाधव यांनी जामखेड शहरातील काही दानशूर व्यक्तींची मदत घेतली.पुढे विद्यार्थ्यांचा खर्च वाढत गेला. संस्थेला कुठलेही शासकीय अनुदान नसल्याने जाधव यांना या वंचित मुलांसाठी समाजातून मदत गोळा करणेशिवाय पर्याय नव्हता. या कार्यात जाधव यांना अनेकांनी मदत केली तर काहींनी नाकारली. त्यांनी मात्र आपल्या कार्यात खंड पडू दिला नाही.निवारा बालगृहात येणाऱ्या मुलांची संख्या जसजशी वाढू लागली तशा अडचणीही येऊ लागल्या. वाढता खर्च भागवण्यासाठी जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दररोज नवीन दाते शोधावे लागले. प्रत्येक अडचणींवर मात करत वस्तीगृहातील मुलांच्या गरजा पूर्ण केल्या. या शैक्षणिक वर्षात निवारा बालगृहातील मुला-मुलींची संख्या १०० च्या वर पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे समाजातील दानशूर व्यक्तींनी निवारा बालगृहासाठी मदत करावी, असे आवाहन ग्रामीण विकास केंद्राचे संस्थापक अध्यक्ष अरुण जाधव यांनी केले आहे.

■ ■ ■

# ९७ वर्षांच्या 'तरुण उद्योजक' हरभजन कौर



पंजाबमधील तरण तरण या छोट्या शहरातील ९७ वर्षीय हरभजन कौर यांनी हे सिद्ध केले आहे की स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी कधीही उशीर होत नाही. तिच्या कुटुंबाच्या अढळ पाठिंब्यामुळे, ती एक उत्साही घरगुती स्वयंपाकी बनून एका भरभराटीच्या अन्न व्यवसायाचा चेहरा बनली, आणि त्याचबरोबर तिच्या कलेबद्दल दृढनिश्चय आणि प्रेमाची भावनाही मूर्त रूप देत होती.

हरभजनचा प्रवास तिच्या बालपणीच्या स्वयंपाकघरात सुरू झाला, जिथे तिने तिच्या आईकडून स्वयंपाकाची कला शिकली आणि वडिलांकडून मिळालेल्या पाककृतींचे पालनपोषण केले.

खास प्रसंगी बनवलेल्या तिच्या वडिलांच्या मिठाईंनी कायमची छाप सोडली आणि ती त्यांच्या स्वयंपाक कौशल्याची पुनरावृत्ती करण्याची आकांक्षा बाळगू लागली. गेल्या काही दशकांमध्ये, तिचे स्वयंपाकघर तिच्या घराचे हृदय बनले, तिचा पती तिचा सर्वात मोठा चाहता आणि प्रेरक होता. चहाच्या वेळी तिची मुलगी रवीना सुरी हिच्याशी झालेल्या गप्पा दरम्यान हा निर्णायक क्षण आला. रवीना सुरीने हरभजनला विचारले की तिचे काही अपूर्ण स्वप्न आहे का?

हरभजनने स्वतःचे पैसे कमवण्याची इच्छा व्यक्त केली, जे स्वप्न प्रेम आणि आदराने भरलेले आयुष्य असूनही तिला कधीही पूर्ण झाले नव्हते. यामुळे तिच्या आवडीचे व्यवसायात रूपांतर करण्याचे कुटुंबाचे ध्येय निर्माण झाले. परंपरेने परिपूर्ण असलेल्या रेसिपीनुसार बनवलेली तिची बेसन बर्फीची पहिली बॅच पेस्ट्री बॉक्समध्ये पॅक करण्यात आली आणि त्यावर हाताने रंगवलेले स्टिकर्स लिहिले गेले ज्यावर बचपन आठवण आ जाये टॅगलाइन होती. लहान भांड्यांमध्ये टोमॅटो चटणीचा समावेश असलेली उत्पादने सेंद्रिय बाजारात विकली गेली. हरभजनच्या बर्फी लगेचच लोकप्रिय झाल्या, लवकर विकल्या गेल्या आणि तिला २००० रुपये इतका पगार मिळाला.

एका छोट्या उपक्रमाच्या रूपात सुरू झालेला हा उपक्रम लवकरच एका मान्यताप्राप्त ब्रँडमध्ये रूपांतरित झाला, ज्यामध्ये केवळ बेसन बर्फीच नाही तर लाडू, पंजिरी आणि गोबी शालगम गाजर का आचार (फुलकोबी, सलगम आणि गाजराचे लोणचे) आणि अमृतसरी आंब्याचे लोणचे देखील उपलब्ध होते. हरभजनचा नातू, शेफ मानव सुरी त्याच्या क्लाउड किचनमध्ये उत्पादन व्यवस्थापित करत होता आणि तिची नात, मल्लिका सुरी लॉजिस्टिक्स आणि ब्रँडिंगची देखरेख करत होती, त्यामुळे ऑर्डरचे प्रमाण हळूहळू वाढत गेले. हरभजनच्या पाककृतींमध्ये अंतर्भूत असलेल्या सत्यतेशी आणि प्रेमाशी तडजोड न करता कुटुंबाने घरगुती उपक्रमापासून मोठ्या प्रमाणात ऑपरेशनमध्ये संक्रमण सुनिश्चित केले.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# १५ तोळ्याचे दागिने लंपास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

ऑटोतून प्रवास करीत असताना ऑटोतील तीन तरुणांनी एका महिलेच्या बॅगमधील १५ तोळ्याचे दागिने चोरून नेले.

गोंदिया येथील वैशाली हरिश आठवले (४७) या पतीसोबत नातेवाईकाच्या लग्नाला आल्या होत्या. ईश्वरनगर येथे जाण्यासाठी हे दाम्पत्य एका ऑटोत बसले. अशोक चौकात ऑटो बंद पडला. ऑटोचालकाने त्यांना दुसऱ्या ऑटोत बसविले. ऑटोत आधीपासूनच तीन तरुण बसले होते. चालकाने वैशाली यांना मागील सिटवर बसविले तर, त्यांच्या पतीला चालकाने आपल्याजवळ बसविले. प्रवासादरम्यान ऑटोतील तरुणांनी त्यांच्या बॅगमधील १५ तोळ्याचे सोन्याचे दागिने काढून घेतले. माहेरी गेल्यानंतर त्यांनी बॅग उघडली असता त्यात दागिने नव्हते. याप्रकरणी नंदनवन पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# केक ऐवजी पपई कापून साजरा केला वाढदिवस

■ महासागर प्रतिनिधी
मेहकर, दि. २६ :





विदेशी संस्कृतीला फाटा देत भारतीय संस्कृतीची जोपासणा आणि त्या माध्यमातून देशी फळांना चालना देण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ साहित्यिक, कवी तथा महासागरमधील अशोकायन या वात्रटिकेचे लेखक प्रा. अशोक सारडा यांनी केक ऐवजी पपई फळ कापून वाढदिवस साजरा केला.

भारत कृषीसंस्कृती प्रधान देश आहे भारतात विविध प्रकारची फळे व इतर देशांपेक्षा नानाविध मिठायांचे प्रकार आहेत. आमची तरुणाई भारतिय संस्कृतीला कमी लेखून पाश्चांताचे अंधानुकरण करण्यात धन्यता मानते. आज समाजात कोणतेही सेलीब्रेशन करावयाचे असले की केक हवाच असा पगडा जाहिरातबाजी व व्यावसायिक फंडयाने आपल्यावर बसवला आहे. त्यामुळे दररोज केकपायी कोटयावधींची उलाढाल देशात होत आहे, असे ते म्हणाले. महाराष्ट्रात एकीकडे शेतकऱ्यांचे आत्महत्या सत्र सुरु आहे. आपण ' माझी माती माझा देशला प्राधान्य देऊन पपई, टरबुज, सेफ आदि फळे किंवा भारतीय मिठाईचा वापर केक ऐवजी केला तर स्वदेशीचा वापर होईल, बळीराजाचे उत्पन्न वाढेल व कृषी व्यवस्थेला बळकटी येईल. हे पदार्थ केक पेक्षा शेकडोपट आरोग्यदायी असल्याचे त्यांनी सांगितले.

या जनजागृतीसाठी कविवर्य तडकाकार लेखक व बालाजी जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. अशोक सारडा मेहकर हे मागील दहा वर्षापासून १२ नोव्हेंबर हा त्यांचा वाढदिवसाला केक ऐवजी फळांचा वापर करून साजरा करतात. यावर्षी पपई कापून व दिप प्रज्वलन करून हा संदेश दिला.

याप्रसंगी जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य रा. ल.राजेगावकर, पां मा गायकवाड, न.अ. मिनासे, द्वा. क. शर्मा, गिरी, अंभोरे, प्र. पि. अंभोरे, म. पा. निकम, न.अ. पनाड, श्री. सु. निकम, मो. प्र. पवार सा. गो नागरीक व साहित्यीक उपस्थित होते. उपस्थितांनी सिजनल फळे कापुन वाढदिवस साजरा करण्याचा निर्धार या वेळी केला हे विशेष.

# दीक्षाभूमीवर संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :



डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी आणि अखिल भारतीय धम्मसेना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधानदिन साजरा करण्यात आला. स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्राचार्या दीपा पान्हेकर यांनी दीक्षाभूमी येथील संविधान स्तंभाजवळ प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी संविधानाचे पालन करण्याची ससाई यांनी उपस्थितांना शपथ दिली.

भदंत सुरेई ससाई यांच्या उपस्थितीत दीक्षाभूमी येथे बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित अनुयायांनी स्तुपाच्या आत बाबासाहेबांच्या अस्थिला वंदन केले. यावेळी ससाई यांनी संविधान स्तुपाजवळ मार्गदर्शन करून संविधानाच्या सुरक्षेसाठी उपस्थितांना शपथ दिली.

ते म्हणाले, संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र भारतात राहण्याचा समान अधिकार दिला आहे. देशातील तरुणांमध्ये संविधानाची मूल्ये रुजवणे हा संविधानदिन साजरा करण्यामागचा एकमेव उद्देश आहे. तत्पूर्वी ससाई यांनी इंदोरा बुद्ध विहाराच्या प्रांगणातील बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बाबासाहेबांचा जयघोष करण्यात आला. त्यानंतर इंदोरा चौकातील बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

याशिवाय संविधान चौक, विमानतळ येथील बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पमाला अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. भदंत ससाई यांनी चारही ठिकाणी संविधानच्या सुरक्षेसाठी मार्गदर्शन केले. या प्रसंगी भंते नागसेन, भंते धम्मविजय, भंते महानाग, भंते नागवंश, भंते कश्यप, भंते अश्वजीत, भंते बद्धघोष, भंते धम्मप्रकाश, भंते संघ, भंते शांतीनाग, भंते धम्मशील, भंते धम्मदीप, कुंडलिका, अनोमा, चित्ताबोधी, धम्मानंदा, सुमेधा, बोधीआर्या, सुपवासा, करुणादीप, शीलानंद, विशाखा, संघप्रिया, संघशीला, गौतमी, पुणिका यांच्यासह उपासक शैलेश सवाईथुल, नन्हा सवईथुल, अशोक गोवर्धन, आतिश शेंडे, मितेश सवाईथुल, जसवीन पाटील, अविनाश सवाईथुल, आर्यन सवाईथुल, अथर्वा सवईथुल, प्रविण रंगारी, अमोल मेश्राम, नितीन मेश्राम, गोलू मेश्राम, श्रेयस गेडाम, यांच्यासह नागपूर शहराच्या विविध भागातील उपासक, उपासिका मोठ्या संख्येत उपस्थित होत्या.